# भगवद्गीतामध्ये ईश्वराचे आदेश

**लेखक : ॲड. निलेष चंद्रभूषण ओझा**
B.E (Electronics & Telecommunication), LL.B
(Author of “How to prosecute the judges.”)

**क्यू. एस. खान**
B.E (Mech)

**अनुवाद : शाहजहान मगदुम**

**Printed by**
**Farid Book Depot (Pvt.) Ltd.**
**2158-59, M.P Street, Pataudi House, Darya Ganj, New Delhi-2**
**Phone-011-23289786, 23280786, Fax- 011-23279998**
**E-mail- farid@ndf.vsnl.net.in**

**Website:- faridexport.com. / faridbook.com**

No Copyrights

या पुस्तकाचे कॉपीराइट्स क्यू. एस. खान यांच्याकडे आहेत. या पुस्तकातील मजकुरात कसलाही फेरबदल न करता हे पुस्तक पूर्वपरवानगीशिवाय कोणीही छापू शकतो.

जर आपणास या पुस्तकामध्ये एखादी चूक किंवा त्रुटी आढळयास ती कृपया आम्हाला अवश्य कळवा जेणेकरून ती पुढील आवृत्तीमध्ये दुरुस्त करता येईल.

भगवद्गीतामध्ये ईश्वराचे आदेश

ISBN No-978-93-80778-30-3
First Edition :

Price: ₹ 00/-

Tanveer Publication
Hydro Electric Machinery Premises
A-13, Ram Rahim Udyog Nagar, Bus stop lane,
L.B.S. Marg, Sonapur, Bhandup (West)
Mumbai- 400078
Phone - 022-25965930 Cell- 9320064026
E-mail- hydelect@vsnl.com, khanqs1961@gmail.com
Website- www.freeeducation.co.in

# मनातील गोष्ट

● आम्ही जेव्हा एखाद्या शब्दाचा अर्थ एखाद्या शब्दकोशात (Dictionary) पाहतो तेव्हा आपणास डझनभर अर्थ सापडतात.

लेखक त्या डझनभर अर्थांपैकी केवळ त्याच्या स्वत:च्या विचारसरणी, श्रद्धा व कल्पनेनुसार असलेल्याच अर्थाची निवड करतो.

म्हणूनच भगवद्गीता, पवित्र कुरआन, बायबल इत्यादी ग्रंथ आपल्या मूळ भाषेत एक आहेत. मात्र त्यांच्यावर करण्यात आलेले भाष्य (व्याख्या) यात फार मोठा फरक आहे. याचे कारण असे की भाष्य करणाराची स्वत:ची विचारसरणी इतरांपेक्षा काही प्रमाणात वेगळी असते.

● केवळ श्री कृष्णच निराकार ईश्वर आहेत अशी हिंदू धर्माच्या अधिकांश विद्वानांची आस्था, श्रद्धा अथवा विश्वास आहे. आणि मनुष्याला आपल्या पापांची शिक्षा वारंवार याच धरतीवर जन्म घेऊन भोगावी लागेल. म्हणून असे विद्वान भगवद्गीतेवर भाष्य करताना आपल्या श्रद्धेनुसारच श्लोकांचा अर्थ लिहितात.

● पवित्र कुरआनची एक आयत अशा प्रकारे आहे,

''ईश्वराने (हे मुहम्मद स.) तुमच्यासाठी धर्माची तीच पद्धत आखून दिली जी त्याने नूह (मनु) यांना पाळावयास लावली, जे (हे मुहम्मद स.) आम्ही तुम्हांस अनुभूती (Revelation) ने दिले आणि इब्राहीम (अबी राम), मूसा आणि इसा यांनाही त्याच धर्मास प्रस्थापित करण्यास सांगितले. आणि त्यामध्ये फूट पाडू नका (वेगवेगळे होऊ नका), असा ताकिदी (Instruction) सह आदेश दिला.''(पवित्र कुरआन, सूरह क्र. ४२, आयत क्र. १३)

● मुस्लिम बांधवांचे धर्मगुरू आदरणीय मुहम्मद (स.), ज्यू बांधवांचे धर्मगुरू आदरणीय मूसा (अ.), ख्रिस्ती बांधवांचे धर्मगुरू आदरणीय इसा (अ.) आदरणीय नूह (अ.) ज्यांना हिंदू बांधवांच्या धर्मग्रंथांमध्ये मनु म्हटले गेले आहे, या सर्वांना एक ईश्वराने मानवजातीच्या कल्याणासाठी पाठविले होते आणि सर्वांना समान शिकवणींसह पाठविले होते; अशी आस्था, श्रद्धा किंवा विश्वास बाळगणारे विद्वान जेव्हा भगवद्गीताचे पठण करतात तेव्हा त्यांना भगवद्गीतामध्येदेखील तीच शिकवण आढळते जी शिकवण ईश्वराने सर्व धर्मगुरूंना देऊन पाठविले होते.

ती शिकवण अशा प्रकारे आहे :

- ईश्वर एक आहे.
- स्वर्ग व नरक अस्तित्वात आहेत.
- एके दिवशी प्रलय येईल.
- प्रलयाच्या दिवशी ईश्वर सर्वांकडून कर्मांचा हिशोब घेईल.
- प्रलयानंतरदेखील एक अनंत जीवन आहे.

इत्यादी.

● डॉ. साजिद देखील अशाच विद्वानांपैकी एक आहेत. आणि मी हे पुस्तक त्यांच्या भगवद्गीताचे भाष्य वाचून लिहिलेली मनातील गोष्ट आहे. त्यामुळे आपणास वर उल्लेखित शिकवणीसारखीच शिकवण या पुस्तकातदेखील आढळून येईल.

हे पुस्तक मी उर्दू आणि हिंदी अशा दोन्ही भाषांमध्ये लिहिले आहे जेणेकरून

मुस्लिम आणि हिंदू बांधव या दोन्ही समुदायांनी हे उदार भाष्य आणि ईशज्ञान वाचून ईश्वराचे मूळ आदेश संपूर्ण मानव-जातीकरिता एकसमान आहेत, ही गोष्ट त्यांच्या लक्षात यावी. परंतु प्रत्येक धर्मात आणि एकाच धर्मातील वेगवेगळ्या समुदायांदरम्यान असलेला मतभेद आमच्या अदूरदर्शीपणामुळे आहे. आणि हा मतभेद ईश्वरी धर्मग्रंथांद्वारा देण्यात आलेल्या ईशज्ञानामुळे नाही.

● पवित्र कुरआनमधील एका आयतीचा भावार्थ अशा प्रकारे आहे :

''धर्माच्या बाबतीत सक्ती नाही, आणि रास्त मार्गापासून वाममार्ग वेगळा केला गेला आहे.'' (पवित्र कुरआन, सूरह क्र. २, आयत क्र. २५६)

● अर्थात, एका मुस्लिमावरदेखील कुरआन आणि ईश्वराच्या आदेशांचे पालन करण्याची सक्ती नाही, आणि इतर कोणत्याही धर्माच्या लोकांवरसुद्धा नाही. वाटेल त्याने त्यांचे पालन करावे अथवा करू नये. एवढे मात्र खरे की योग्य मार्ग आणि चुकीचा मार्ग ईश्वराने सांगितला आहे. आणि सत्यमार्गाचा अवलंब करण्यास सांगितले आहे. म्हणून प्रलयाच्या दिवशी मानवजातीसाठी स्वर्ग व नरकाचा निवाडा ईश्वर त्यांच्या श्रद्धा आणि कर्मांच्या आधारावरच करील.

● यजुर्वेदातील एका श्लोकाचा अर्थदेखील असाच आहे. तो श्लोक असा :

*दृष्ट्वा रूपे व्याकरोत्सत्या नृते प्रजाततिः ।*
*अश्रद्धा मनृतो अदधाच्छ्द्धाँ सत्ये प्रतापतिः ।।*

(यजुर्रवेद १९:७७)

परमेश्वराने सत्य आणि असत्याला आपल्या ज्ञानदृष्टीने वेगवेगळे केले आहे आणि आदेश दिला आहे की सत्यावर आस्था बाळगा आणि असत्याचा इन्कार करा.

● धर्माची गोष्ट मान्य करण्यासाठी कोणावर कसलाही आग्रह नाही. मनाला वाटले तर मान्य करावे अथवा मान्य करू नये. होय, असे आवर्जून सांगण्यात आले आहे की तुम्ही सत्यज्ञानाचे अवश्य पठण करा, जाणून घ्या आणि मनात बाळगा. आणि ईश्वरापाशी सत्यामार्गाकडे मार्गदर्शनासाठी अशा प्रकारे प्रार्थना करीत राहा की,

*इन्द्र ऋतु न आ भर पिता पुत्रेभ्या यथा।*
*शिक्षाणो अस्मिन पुरुहूत यामनि जीवा*
*ज्योतिरशीमहि ।।* (अथर्ववेद १८:३:६७)

''हे परमेश्वरा, या (सत्य) मार्गात आम्हाला शिकवण (ज्ञान) दे. आम्हाला जागृत प्रकाश लाभावा.''

● ईश्वराकडे सत्यमार्ग दाखविण्यासाठी प्रार्थना करणे आमच्यासाठी अनिवार्य आहे कारण ऋग्वेदात म्हटले आहे की,

*ऋतस्य पन्था न तरन्ति दुष्कृतः*

(ऋग्वेद ८-७३-६)

दुष्कर्मींना सत्यमार्ग पार पाडता येत नाही. ऋग्वेदात हेदेखील म्हटले आहे की,

*उत त्व पश्यन्त ददर्श वाचमृत त्वः श्रृण्वन्न*
*श्रृणोत्ये नाम ।* (ऋग्वेद १०-७१-४)

बुद्धिहीन लोक ग्रंथ पाहताना पाहात नाहीत आणि ऐकताना ऐकत नाहीत.

● आपण स्वत:ला सत्कर्मी आणि बुद्धिमान समजत असतो. परंतु हे ईश्वरालाच ठाऊक की आम्ही काय आहोत.

● म्हणूनच आम्ही धर्मग्रंथांची सर्व प्रकारच्या भाष्यांचे पठण केले पाहिजे आणि ईश्वरापाशी प्रार्थना करावी की त्याने आम्हाला सत्यमार्ग प्राप्तीसाठी मार्गदर्शन

करावे. जेणेकरून सत्य ज्ञान आमच्या मनात उतरावे. मला आशा आहे की आमच्या प्रार्थनेच्या उत्तरादाखल ईश्वर आम्हाला अवश्य सत्यमार्गाची समज देईल.

मृत्यूनंतरदेखील अनंत जीवन आहे. आणि सत्य ज्ञान, योग्य श्रद्धा आणि सत्कर्मांमुळेच आम्हाला मुक्ती मिळेल. म्हणून आम्ही पारलौकिक जीवनाबाबतदेखील गांभीर्य बाळगले पाहिजे. ईश्वर आम्हा सर्वांना मुक्ती प्रदान करो. आमच्या समाजात शांतता, प्रेम आणि सद्भावनेचे वातावरण निर्माण करो. आणि आमच्या देशाची उन्नती होवो जेणेकरून सर्वांना सुखात जीवन व्यतीत करता यावे.

● मी हे पुस्तक डॉ. साजिद यांच्या भगवद्‌गीताचे भाष्य वाचून लिहिले आहे. डॉ. साजिद स्वत:देखील संस्कृतचे विद्वान आहेत आणि त्यांनी भगवद्‌गीताचे भाष्य स्वामी रामसुखदास महाराज यांच्या साधक संजीवनी, (गीता प्रेस, गोरखपूर), ए. सी. भक्ती वेदान्त स्वामी प्रभुपाद यांची श्रीमद्‌भगवद्‌गीता, यथारूप आणि एस. टी. व्ही. अप्पलाचारी यांचे ‘नगमए इलाही’ (गीता प्रेस, गोरखपूर) चे पठण करून लिहिले आहे. आणि त्यांचे भाष्य संस्कृतच्या विद्वानांना खूप आवडले आहे. म्हणून मी डॉ. साजिद यांचे भाष्य प्रमाणित (खरे) समजतो. आपल्या माहितीकरिता मी त्या विद्वानांचे प्रशंसापत्र या प्रस्तावनेनंतर आपणांसमोर सादर करीत आहे. आपणदेखील त्या पत्रांना वाचून या पुस्तकाचे भाष्य प्रमाणित (खरे- Authentic) असल्याचे मान्य कराल आणि याच्या पवित्र ज्ञानाचा लाभ घ्याल, अशी मला आशा आहे.

● मी अब्दुल्ला तारिक साहेब आणि डॉ. साजिद सिद्दीकी यांचा आभारी आहे. त्यांच्या पुस्तकांतून मला जे मार्गदर्शन लाभले त्यापासून हे पुस्तक लिहिण्यात मला खूप मदत झाली. ईश्वर मानवसेवेच्या भावनेने कार्य करणाऱ्या सर्व लोकांवर कृपा करो आणि या जीवनात आणि यानंतरच्या अंतकालीन जीवनात यशस्वी करो आणि त्यांना सुखशांती प्रदान करो.

धन्यवाद!

आपला बंधू

क्यू. एस. खान

khanqs1961@gmail.com

# प्रस्तावना

## -डॉ. रेखा व्यास

(चारी वेदांच्या अनुवादक आणि अठरा प्रकाशित पुस्तकांच्या लेखिका)

# आरंभ- अद्‌भुत उदाहरण आणि मशाल

''माझ्या परिचयाचे लोक मला म्हणतात, आमच्यासारखे तुम्हीदेखील परिचितांचे काम करीत जा त्यामुळे बरे वाटते.'' मी त्यांना म्हणते की मी ज्यांचे काम करते ते परिचितच बनतात, कामाच्या माध्यमातून झालेला परिचय अतिशय दृढ, आत्मीय आणि पक्का असतो. डॉ. साजिद यांच्याशीदेखील परिचय अति विशाल कार्याच्या माध्यमाने झाला आणि इतका दृढ झाला की हा माझ्या वेदांच्या अनुवादाच्या प्रशंसेप्रित्यर्थ आलेल्या त्यांच्या दूरध्वनीद्वारे प्रतिक्रियेचा सुपरिणाम आहे आणि नवीन परिचय आहे, असे वाटतसुद्धा नाही.

कर्मप्रधान विश्वरचि रक्षक

कर्म सृष्टीचे मूळ आहे आणि गीतेचे मूळ हेच कर्म आहे. साजिदजींनी याच कर्मग्रंथ गीता म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीताचा अनुवाद करून यात निपुणतेचा आणखी एक नवीन अध्याय रचला आहे. अनेक ग्रंथांपैकी जर त्यांनी या ग्रंथाची निवड केली आहे म्हणजे निश्चितच त्यांच्या मनमस्तिष्कावर त्याच्या दर्शनाची छाप असणारच.

डॉ. साजिद यांनी अतिशय सोप्या, सामान्य बोलीभाषेत आणि आत्मियतेने हा अनुवाद केला आहे. ही या अनुवादाची सर्वांत सशक्त आणि बोलकी बाजू आहे. उर्दूच्या आच्छादनाची यास लक्षावधी लोकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होईल. डॉ. साजिद गीतेच्या मूलतत्त्वापर्यंत (हृदयापर्यंत) पोहोचले आहेत, हीदेखील अनुवादाची शक्ती आहे, केवळ शब्दानुवाद असेल तर ती गोष्ट येत नाही.

हा अनुवाद नुसता अनुवाद किंवा भाषांतर नाही, एखाद्या ग्रंथाचे केवळ भाषांतरण नाही, तर संस्कृतींचा संगम, राष्ट्रीय एकतेचे उदाहरण आहे जे आमची सर्वांत मोठी आवश्यकता आहे. जर हे पारस्परिक वैमनस्य आणि विघटनाची भावना समाप्त झाली तर आज भारत पुन्हा विश्वगुरू आणि महाशक्ती म्हणून उदयास येईल.

दुर्भाग्य असे की आम्हाला महान ग्रंथांना धर्माच्या संदर्भानुसार पाहण्याची सवय जडली आहे, मात्र हे आचारशास्त्र आहेत यांचे कोणीही आचरण करू शकतो. हे सर्वांचे आहेत सर्व यांचे आहेत. डॉ. साजिद यांच्या अनुवादामुळे समाजातील अनेक भ्रम नाहीसे होतील. गीता कर्तव्यकडे केंद्रित करणारा ग्रंथ असताना तिच्या बाबतीत अल्पज्ञानी जण यास युद्धग्रंथ समजण्याची चूक करतात. खरे तर हा स्व-वरील भेद नष्ट करणारा आणि आत्म्याचा फरक सांगणारा ग्रंथ आहे. आजच्या भटकलेल्या, भरकटलेल्या भोगवादाकडे मार्गक्रमण करणाऱ्या समाजासाठी डॉ. साजिद यांचा अनुवाद ''अद्‌भुत उदाहरण आणि मशाल'' है।

**-डॉ. रेखा व्यास**
(दिल्ली)

# प्रस्तावना
# प्रा. हेमंत दत्तात्रेय खैरनार

एम.ए. संस्कृत, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ.
बी.एड्. संस्कृत-इंग्लीश, कवि कुलगुरु कालिदास विद्यापीठ रामटेक, नागपूर.
एम.एड्. संस्कृत, मुंबई विद्यापीठ.
वेद विषयात विद्यापीठात प्रथम क्रमांक (गोल्ड मेडल) प्राप्त.

'श्रीमद्‌भगवद्‌गीता' मानवी संस्कृतीची एक अमूल्य भेट आहे. गीता केवळ एक धार्मिक ग्रंथच नसून हा मानवी जीवनाला योग्य मार्ग दाखविणारा पवित्र ग्रंथदेखील आहे. मानवी जीवनातील सर्व समस्यांचे निराकरण या ग्रंथात आहे. आरोग्य संस्थेचे संस्थापक श्री. पांडुरंगशास्त्री आठवले म्हणतात,

*"Geeta is not only Bibles of Hindusim, but geeta is a Bible of Humanity."*

''गीता केवळ हिंदुत्वाचेच बायबल नसून गीता संपूर्ण मानवजातीचे बायबल आहे.''

जीवनातील प्रयत्नामध्ये मनुष्याने कशा प्रकारे वागावे हे सांगताना मानवजीवनाच्या श्रेष्ठ उद्देशांना गीता दर्शविते. पुरुषोत्तम योग, भक्तियोग, स्तितप्रज्ञदर्शन, कर्म, मीमांसा या विषयांवर विस्तारपूर्ण चर्चा पवित्र ग्रंथ गीतामध्ये करण्यात आली आहे. म्हणजे मानवजीवनाच्या उत्तम विकासाचे मार्गदर्शन आहे.

आदरणीय डॉ. साजिद सिद्दीकी साहेबांनी गीताचे अध्ययन करून मुस्लिमांचा पवित्र ग्रंथ कुरआन शरीफच्या धार्मिक दृष्टिकोनास एकमेकांच्या समान बनविण्याचा जो प्रयत्न केला आहे, त्याची प्रशंसा करताना शब्द अपुरे पडतात.

ईश्वर एकच आहे आणि आम्ही सर्व त्या एकमेव ईश्वराची संतती आहोत. ही भावना व्यक्त करण्यासाठी आदरणीय साजिद सिद्दीकी साहेबांनी लिहिलेला संस्कृत भाग तपासण्याचे सौभाग्य मला लाभले, मी स्वत:ला धन्य समजतो.

डॉ. साजिद सिद्दीकी साहेबांच्या पुस्तकाचे अध्ययन केल्यानंतर हिंदू व मुस्लिम समाजांमध्ये एकतेचे वातावरण निर्माण करण्यात निश्चितच मदत होईल. ईश्वर त्यांच्या या प्रयत्नांना यशस्वी करो, हीच माझी शुभेच्छा!

**-प्रा. हेमंत दत्तात्रेय खैरनार**
(संस्कार संस्कृत क्लासेस, मालेगाव कॅम्प)

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. महाभारत युद्धाची वास्तविकता ........................................ | ०९ |
| २. मानवसेवेचे महत्त्व .................................................... | १२ |
| ३. ईशज्ञानाचे महत्त्व................................................... | १३ |
| ४. ईश्वराला प्रिय कोण?.................................................... | १४ |
| ५. ईश्वराला अप्रिय कोण?................................................. | १५ |
| ६. ईश्वर किती महान आहे?................................................. | १७ |
| ७. ईश्वर कोण आहे?......................................................... | १८ |
| ८. ईश्वर जन्म घेतो काय?............................................... | २४ |
| ९. श्री कृष्णजी कोण आहेत? .................................................. | ३१ |
| १०. श्री रामचंद्रजी कोण आहेत? ............................................... | ३४ |
| ११. देवता कोण आहेत?.......................................................... | ३८ |
| १२. महाप्रलय होईल काय?.................................................... | ४२ |
| १३. अन्य लोकाचे महत्त्व.................................................... | ४४ |
| १४. मुक्ती कशी मिळेल?...................................................... | ४६ |
| १५. कुणाचा विनाश होईल?.................................................. | ४८ |
| १६. पुण्य करणारे नरकात का जातील?................................... | ५० |
| १७. ईश्वराची प्रार्थना कशी करावी?............................................ | ५२ |
| १८. पुनर्जन्म म्हणजे काय?......................................................... | ६० |
| १९. सूर्य उत्तरेला असण्याचा काय अर्थ आहे?............................... | ६२ |
| २०. महाभारतात पुनर्जन्माचा उल्लेख......................................... | ६४ |
| २१. छान्दोग्य उपनिषदात पुनर्जन्माचा उल्लेख................................. | ६७ |
| २२. बृहदारण्यक उपनिषदात पुनर्जन्माचा उल्लेख............................. | ७१ |
| २३. भगवद्गीतामध्ये पुनर्जन्माची शिकवण आहे काय?....................... | ७४ |
| २४. महाभारत आणि उपनिषदामध्ये कोणी हस्तक्षेप केला?.................. | ७७ |
| २५. असे प्रश्न ज्याचे पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे उत्तर देऊ शकत नाहीत. | ७८ |
| २६. गीता सार............................................................... | ८० |
| २७. गरुड पुराण............................................................... | ८२ |

# १. महाभारत युद्धाची वास्तविकता

**पृथ्वी मनुष्याच्या वास्तव्यास योग्य कधी बनली?**

● या ब्रह्मांडाच्या निर्मितीची सुरूवात १३०० कोटी वर्षांपूर्वी झाली.

● ४५० कोटी वर्षांपूर्वी आमची धरती लाव्हाच्या स्वरूपात होती.

● आमची धरती वास्तव्यास योग्य ५० कोटी वर्षांपूर्वी झाली.

● सहा कोटी वर्षांपूर्वी एक धुमकेतू (Comet) धरतीला थडकल्यामुळे धरतीवरील सर्व डायनासोरस मरण पावले आणि सर्व जंगले धरतीमध्ये गाडली गेली.

● १८ लाख वर्षांपूर्वी धरतीचे वातावरण पुन्हा या धरतीवर प्राणी जिवंत राहण्यायोग्य बनले.

● या धरतीवर मानवी अस्तित्व केवळ १२ हजार वर्षे जुने आहे. यापूर्वी मानव धरतीवर राहात होते याचा कसलाही पुरावा नाही.

**श्रीकृष्णजी :-**

● श्रीकृष्णजी २८ जुलै ३३३८ इ.सन पूर्व (BC) मथुरेत वासुदेव यांच्या घरी जन्मले. त्यांच्या आईचे नाव देवकी होते. ते त्या दोघांचे आठवे पुत्र होते. त्यांचा वर्सनी वंश आणि यादव परिवाराशी संबंध होता. त्यांना वासुदेवदेखील म्हटले जाते. त्यांचा मामा राजा कंस फार अत्याचारी होता. कंसाचा वध त्याच्या भाचाच्या हातून होईल अशी ज्योतिषांनी भविष्यवाणी केली होती. त्यामुळे त्याने श्रीकृष्णजींच्या सात भावंडांना जन्मानंतरच ठार केले होते. आदरणीय मूसा (अ. स.) यांच्याप्रमाणेच श्रीकृष्णजी देखील दैविक संरक्षणात जन्मानंतर आपल्या मातापित्यापासून अलिप्त राहून वाढले. आणि जसे आदरणीय मूसा (अ.स.) यांच्यामुळे फिरऔनचे राज्य संपुष्टात आले आणि त्याचा मृत्यू झाला, अगदी तसेच कंसालादेखील ठार करण्यात आले आणि त्याचे राज्य श्रीकृष्णजींना मिळाले.

श्रीकृष्णजींना महाभारताच्या युद्धात भाग घेण्याशिवाय गत्यंतर नव्हते. आणि कौरव व पांडव दोघेही त्यांचे जवळचे नातेवाईक असल्यामुळे त्यांनी आपले सैन्य कौरवांना दिले आणि स्वत: अर्जुनाला साथ दिली. युद्धात त्यांनी कधीही शस्त्राचा वापर केला नाही. परंतु त्यांच्या नीती आणि आदेशांमुळेच पांडवांचा विजय सुकर झाला.

● महाभारत युद्धानंतर त्यांचे स्वत:चे राज्य मथुरेतच वास्तव्य होते. जाराह नामक शिकाऱ्याचा बाण चुकून त्यांना लागला होता, त्यामुळे त्यांचा मृत्यू १७ किंवा १८ फेब्रुवारी ३१०२ इ.सन पूर्व (BC) रोजी झाला.

**महाभारताचे युद्ध :-**

● महाभारताचे युद्ध आजपासून सुमारे ८ लाख ४६ हजार वर्षांपूर्वी द्वापर युगात लढले गेले.

● हे युद्ध २ चुलत भावंडांदरम्यान लढले गेले. कौरव १०० सख्खे भाऊ आणि तत्कालीन राजा धृतराष्ट्रचे पुत्र होते. धृतराष्ट्राचा भाऊ पांडू यांच्या पुत्रांना पांडव

म्हटले जाते. कौरव बंधु पांडव बंधुंना आपल्या सम्राज्यात कोणताही हिस्सा देऊ इच्छित नव्हते आणि कौरव स्वत:देखील चुकीचे मार्गक्रमण करीत होते. त्यामुळे हे युद्ध लढले गेले.

● या युद्धात कौरवांच्या बाजूने ११ अक्षौहिणी आणि पांडवांच्या बाजूने ७ अक्षौहिणी सैन्य होते. एक अक्षौहिणी मध्ये २१८७० रथ, २१८७० हत्ती, ६५६१० घोडे, १०९३५० पायदळ सेना असते. म्हणजे या युद्धात सुमारे ४० लाख लोकांनी भाग घेतला होता.

● धृतराष्ट्र अंध होता. संजय धृतराष्ट्राचा मंत्री आणि सारथी होता. आणि संजयनेच युद्धाच्या सद्यस्थितीचे प्रत्यक्ष वर्णन धृतराष्ट्राला सांगितले होते.

● श्रीकृष्णजींनी या युद्धात आपल्या हाती कधीही शस्त्र घेतले नाही. परंतु ते अर्जुनाचे सारथी आणि गुरू होते.

● १८ दिवसांच्या युद्धानंतर ज्यात एक अब्ज आणि ६६ कोटी लोक मारले गेले होते. या युद्धात पांडवांचा विजय झाला होता.

**भगवद्गीताचा एक श्लोक असा आहे :-**

श्रीकृष्णजी म्हणाले, (हे अर्जुना) परंतु वास्तव (Fact) तर हे आहे की कोणतेही असे युग असे झाले नाही की ज्यात मी नव्हतो, तू नव्हतास आणि मानवांवर अत्याचार करणारे ते (दुष्ट लोक) नव्हते. आणि (नि:संदेह) पुढे वर्तमानातही यापुढेदेखील असे घडणार नाही जेव्हा आम्ही सर्व असणार नाही. (२:१२)

● भगवद्गीताच्या २:१२ श्लोकाचा अर्थ आहे की, सत्य आणि असत्याचे युद्ध या धरतीवर नेहमी होत राहील. जसे महाभारतात कौरवांची संख्या मोठी होती, तशीच दुष्टांची संख्या नेहमी अधिक असेल. आणि जसे पांडवांची संख्या कमी होती, तसेच ईश्वराचा आदेश मानणारे आणि सत्याची लढाई लढणारे नेहमी अल्प संख्येत असतील. मात्र जसे महाभारताच्या युद्धात सत्याचा विजय झाला, तसाच प्रत्येक युद्धात केवळ सत्याचा विजय होईल.

● विसाव्या शतकातील महाभारताच्या युद्धात पांडव आणि कौरव कोणत्या रूपात या देशात वास्तव्य करीत आहेत हे तुम्ही सांगू शकता काय? मी तुम्हाला सांगतो. कौरव या देशावर अत्याचार करणारे इंग्रज होते. ज्यांची संख्या फार मोठी होती. पांडव हे या देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणारे क्रांतिकारी होती, जे अत्यंत अल्प संख्येत होते. विसाव्या शतकातील महाभारताचे युद्ध इ.सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य आणि पांडवांच्या (क्रांतिकारींच्या) विजयानंतर समाप्त झाले.

● या काळातदेखील महाभारताचे युद्ध सुरू आहे. कौरव हे याच स्वतंत्र देशाचे लुटारू आणि सांप्रदायिक दंगली घडविणारे राजकीय पुढारी आहेत ज्यांची संख्या जास्त आहे आणि त्यांनी देशावर ताबा मिळविला आहे आणि त्यास लुटत आहेत.

पांडव सेक्युलर, प्रामाणिक आणि न्यायप्रिय सरकार बनविण्यासाठी लढणारी सामान्य जनता आणि एन.जी.ओ. आहेत. या युद्धातदेखील सत्य आणि सामान्य जनतेचाच विजय होईल.

**शाळेत शिकविली जाणारी एक गोष्ट :-**

● ससा आणि कासवाची एकदा धावण्याची शर्यत लागली. ससा काही क्षणांत खूप पुढे निघून गेला. जेव्हा त्याने मागे वळून पाहिले तर कासव खूपच मागे राहिल्याचे त्याला दिसले. त्याच्या मनात विचार आला की काही काळ विश्रांती घेऊ आणि मग धावत लक्ष्य गाठू. सशाचा डोळा लागला आणि तो झोपी गेला आणि कासव एकसारखा चालत राहिला आणि विजयी झाला.

ससा आणि कासवाची अशी गोष्ट कधी झाली असण्याची शक्यता आहे काय? नाही! तरीही ही गोष्ट विश्वातील प्रत्येक देशात शिकविली जाते. या गोष्टीद्वारे मुलांना एक गोष्ट समजाविली जाते की सरतेशेवटी तोच यशस्वी होतो जो एकसारखी मेहनत करतो, मग त्याची गती हळू का असे ना!

**महाभारत युद्धाच्या कथेचे महत्त्व :-**

ससा आणि कासवाच्या गोष्टीवरून ''एकसारखे श्रम केल्यास सफलता प्राप्त होते'' हा बोध (Moral) मुलांच्या मस्तिष्कात दृढपणे बसविला जातो. जर फक्त बोध दिला गेला असता तर बालकाला त्याचा लवकर विसर पडला असता. मात्र गोष्टीच्या माध्यमाने त्याला तो लक्षात राहतो.

अशा प्रकारे महाभारताची कथा लोकांच्या मस्तिष्कात ही गोष्ट चांगल्या प्रकारे बसविण्यासाठी लिहिली गेली आहे की ईश्वराला मानणाऱ्यांचा आणि सत्याची साथ देणाऱ्यांचा नेहमी विजय होईल, मग ते अल्पसंख्यक का असेनात. आणि हेच ज्ञान (Moral) भगवद्‌गीता आहे.

● हिंदू धर्मात शंभर (१००) हून अधिक पुराण आहेत. मात्र फारच कमी हिंदू बांधवांना त्यांची नावे पाठ आहेत. अशा प्रकारे जर भगवद्‌गीता केवळ एक बोधप्रद पुस्तक असते तर जसे पुराणांची स्थिती आहे की कोणाला त्यांची नावेसुद्धा पाठ नाहीत, तशीच भगवद्‌गीताची स्थितीदेखील झाली असती. भगवद्‌गीताला महाभारताच्या मनोरंजक कथेच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. म्हणून प्रत्येक हिंदू बांधवाला कमीतकमी याचे नाव तरी माहीत आहे.

● जर शाळेतील विद्यार्थ्यांच्या फक्त ससा आणि कासवाची गोष्टच लक्षात राहिली आणि त्यात असलेला बोध (Moral) विसरले तर काय होईल?

असेच भगवद्‌गीताच्या बाबतीत झाले. लोकांनी महाभारतातील प्रत्येक पात्र ध्यानात ठेवले आणि त्यांना अमर (Immortal) बनविले. मात्र दुर्दैव असे की भगवद्‌गीताचे ज्ञान खूपच कमी लोकांना परिचित आहे.

भगवद्‌गीताच्या सत्य ज्ञानाला सामान्य लोकांपर्यंत सोप्या शब्दांत पोहोचविण्यासाठी हा पुस्तकप्रपंच.

************

# २. मानवसेवेचे महत्त्व

● श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो, खरे तर माझी भक्ती करताना जो प्रचारक माझ्या भक्तांना या सर्वांहून श्रेष्ठ व दिव्य, अदृश्य ज्ञान समजावून सांगतो, नि:संदेह तो माझ्या सर्वांत श्रेष्ठ व दिव्य (स्वर्गातील) निवास प्राप्त करतो. (१८:६८)

**(अर्थात, सत्यधर्माच्या प्रचारकाला स्वर्ग प्राप्त होईल.)**

● या धर्मप्रचारकाच्या तुलनेत ज्यावर मी प्रेम करतो असा या विश्वातील मानवांमध्ये दुसरा कोणीही नाही. आणि (भविष्यातदेखील) याच्या तुलनेत दुसरा कोणीही मला याच्यापेक्षा अधिक प्रिय नसेल. (१८:६९)

**(अर्थात, सत्यधर्माचे प्रचारक ईश्वराला प्रिय आहेत.)**

● जो मनुष्य या (ईशआदेश व नियमांवर आधारित) धर्माच्या बाबतीत बाबतीत देण्यात आलेल्या संदेशावर विचार करील आणि हळू हळू याचा प्रत्येक भाग समजून घेईल, तो ज्ञानाद्वारे ईशप्रसन्नता प्राप्त करील, आणि मी त्याच्या सर्व इच्छा पूर्ण करीन. असा हा माझा निर्णय आहे. (१८:७०)

**(अर्थात, सत्यधर्माचे अध्ययन व अध्यापन करणाऱ्यांच्या सर्व इच्छा ईश्वर पूर्ण करील.)**

● नि:संदेह जो मनुष्य एका ईश्वरावर श्रद्धा बाळगून आणि ईश्वराशी ईर्ष्या न करता, (हे ज्ञान) ऐकून घेईल, तो विश्वातील भय व दु:खापासून मुक्त होईल, आणि मृत्यूनंतर स्वर्गात सत्कर्म करणाऱ्यांचे पवित्र व उत्तम निवासदेखील प्राप्त करील. (१८:७१)

● हे पार्थ! माझ्या मित्रा, सत्य असे आहे की मानवजातीचे कल्याण म्हणजे सत्कर्मांना पूर्णत: करणारा कोणीही मनुष्य वाईट निवासात (नरक) जात नाही. नि:संदेह या (पूर्णत: सत्कर्म करणारे मनुष्य) चा नाश या विश्वात नाही की त्या विश्वात (अन्य लोकात) देखील होणार नाही. (०६:४०)

**(अर्थात, मानवसेवा करणाऱ्या व्यक्तीचा विनाश तर होणारच नाही तसेच तो नरकातदेखील आगीचे भक्ष होणार नाही.)**

************

**(समूद नामक समुदायाच्या ध्वस्त झालेल्या घरांचे चित्र)**





# ३. ईशज्ञानाचे महत्त्व

● श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो, अशा प्रकारे हे पार्थ (अर्जुना)! (वेदांमध्ये सांगितलेल्या) ईश्वरी निसर्गचक्राबरोबर जो पुढे जात नाही (अर्थात, जो ईश्वराच्या आदेशांचे पालन करीत नाही), त्याचे हे जीवन पापांनी भरते कारण तो इच्छांचे पालन करणे आणि भोगांमध्ये बुडून राहण्यासाठी जगत असतो. (३:१६)

**(अर्थात, जो ईशआज्ञेचे पालन करीत नाही तो सत्यमार्गापासून दूर जातो.)**

● ही पापांकडे अधिक प्रेरित करणारी इच्छा वा भावना, हे आपल्या इच्छाभक्तीचे शिर्क (पाप) आहे. (हेच पुढे) क्रोध (आणि हिंसेमध्ये परिवर्तित होते.) हा दुर्गुणापासून जन्म घेतो. या विश्वात या इच्छाभक्तीसारख्या शिर्क (पाप) ला सर्वांत मोठा शत्रू समजा, (इतकेच नव्हे तर) हे सर्वांत मोठे पाप आणि सर्वांत मोठी हानी व विनाशदेखील आहे. (३:३७)

**(मनाप्रमाणे जीवनशैली अंगीकारणे सर्वांत मोठे पाप आहे. ईश्वराच्या आदेशानुसार जीवन व्यतीत करण्यानेच सफलता मिळेल.)**

● शांती व सुखमय धर्माचे हे ज्ञान (१) सर्व ज्ञानांचा राजा आहे. (२) गोपनीय ज्ञानांचा राजा आहे आणि (३) अत्यंत पवित्र ज्ञान आहे. हे ज्ञान सर्वश्रेष्ठ आणि अविनाशी निर्माता (ईश्वराकडून) थेट आणि अत्यंत स्पष्टपणे आलेले आहे. (९:२)

● हे अर्जुना! (ईश्वर म्हणतो) या शांती व सुखमय धर्मावर श्रद्धा न बाळगणारे मनुष्य वारंवार मृत्यू ओढवणाऱ्या विश्वात म्हणजे नरकाच्या मार्गातच जन्म व मृत्यूच्या फेऱ्यात अडकलेले असतात, त्यामुळे ते मला कधीही प्राप्त करू शकत नाहीत. (९:३)

**Summery :-**

१) जो मनुष्य ईश्वराच्या आज्ञेनुसार जीवन व्यतीत करीत नाही, तो आपल्या मनाप्रमाणे जीवन जगतो आणि मन मानेल तसे जीवन व्यतीत करणारे नेहमी नष्ट होतात.

२) सत्यधर्माचे ज्ञान या ब्रह्मांडाच्या मालका (ईश्वरा) कडून उतरले आहे. जो यावर विश्वास ठेवत नाही तो निरंतर नरकात राहील. तो कधीही ईश्वरास प्राप्त करू शकत नाही.

**नोट:-**

**'शिर्क'चा अर्थ:-**

शिर्क असे पाप आहे ज्यात आपण ईश्वराच्या प्रार्थनेसारखीच कोणा दुसऱ्याची प्रार्थनादेखील करतो. शिर्क महापाप आहे. जेव्हा व्यक्ती मनाला मानेल तशी जीवनशैली अवलंबतो तेव्हा ती व्यक्ती जशी ईश्वराच्या आज्ञेचे पालन करावयास हवे तसे मनाच्या आज्ञेचे पालन करते. म्हणून मनाला मानेल तशा जीवनशैलीच्या अवलंबनास शिर्कसारखे पाप केल्यासम वाईट म्हटले गेले आहे.

'इच्छाभक्ती' अर्थात व्यक्तीच्या मनाला जसे वाटेल तसे ती करते. मग ते काम चुकीचे का असेना.

************

# ४. ईश्वराला प्रिय कोण?

**श्रीकृष्णाजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :**

● नि:सन्देह (१) घृणा व ईर्ष्येशिवाय जगणारा, (२) सर्व प्राण्यांशी मैत्री व प्रेम बाळगणारा, (३) दया करणारा, (४) अपेक्षेशिवाय राहणारा, (५) अहंकारापासून दूर राहणारा, (६) सुख व दु:खात धैर्य राखणारा, (७) क्षमा करणारा, या सर्वांवर मी प्रेम करतो. (१२:१३)

● (८) संतुष्ट राहणारा, (९) सदा भक्तीत मग्न असणारा, (१०) मनावर नियंत्रण ठेवणारा, (११) दृढ संकल्प बाळगणारा, (१२) जो मनुष्य आपले मन व बुद्धी मला समर्पित करतो आणि जो माझा भक्तही आहे, तो मला अत्यंत प्रिय आहे. (१२:१४)

● (१) ज्याच्यामुळे लोकांना त्रास होत नाही (२) लोकांद्वारे (इतरांना) त्रास देतसुद्धा नाही आणि जो खुशी, शोक, भय आणि चिंतामुक्त आहे, तो मला अत्यंत प्रिय आहे. (१२:१५)

● (१) एखाद्या निर्मित वस्तूपासून अपेक्षा न करणारा, (२) पवित्र शरीर, हृदय व बुद्धी असणारा, (३) इमानदार, (४) निरपेक्ष, (५) भय व शोकमुक्त, (६) ज्याने संपूर्ण (विश्व भक्तीच्या) प्रयत्नांना सोडून दिले आहे, तो माझा खरा भक्त आहे आणि तो मला अत्यंत प्रिय आहे. (१२:१६)

● (१) जो एखादी वस्तू मिळाल्यास फार आनंद व अहंकार बाळगत नाही तसेच एखादी वस्तू न मिळाल्यास त्याबाबत शोक व्यक्त करीत नाही आणि न पश्चात्ताप बाळगतो, (२) ज्याला कसलीही इच्छा नसते, (३) आणि जो शुभ-अशुभ (जसे अंधविश्वासांना) सोडून देतो, आणि ज्या (केवळ माझ्यात एक ईश्वराच्या) भक्तीत अभिमान वाटतो, तो मला अत्यंत प्रिय आहे. (१२:१७)

● (१) जो मित्र व शत्रूशी समान व न्यायपूर्ण व्यवहार करतो आणि (२) जो सन्मान, अपमान, थंडी, उन्हाळा, सुख व दु:खात धैर्य अर्थात संयम बाळगतो, (३) ईश्वरात भागीदारांना (अनेकेश्वरवाद) सोडणारा आहे. (तो मला अत्यंत प्रिय आहे.) (१२:१८)

● (ज्याच्याकरिता) निंदा व स्तुती दोन्ही समान आहेत, (४) जो मौन बाळगतो, (५) आणि जो सद्यपरिस्थितीत समाधानी व सुखी आहे, (६) घरदार नसूनदेखील बुद्धीला एक ईश्वराच्या श्रद्धेवर दृढपणे स्थिर ठेवून, त्याच्या भक्ती करण्यात प्रतिष्ठा अनुभवतो, असा मनुष्य मला अत्यंत प्रिय आहे. (१२:१९)

● (१) परंतु जो (मुनी अथवा मोमिन) (१) हे विश्व आणि निर्मित वस्तूंच्या बाबतीत (२) धर्माच्या बाबतीत, (३) मृत्यू नसलेले निवास - स्वर्गाच्या बाबतीत, ईश्वराने जसे म्हटले आहे, तसेच पूर्णत: श्रद्धा बाळगून माझ्या- सर्वश्रेष्ठ व दिव्य ईश्वराच्या भक्तीत मग्न असतो, तो मला सर्वाधिक प्रिय आहे. (१२:२०)

नोट :- (निर्मित वस्तू- ईश्वराने निर्माण केलेले सर्व जीवजंतू, धरती, आकाश.)

# ५. ईश्वराला अप्रिय कोण?

**श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :**

● आसुरी गुणाचे लोकांना हे माहीत नसते की विकास (स्वर्गात जाणारे कर्म) काय आहे? आणि मागासलेपण (नरकात जाणारे कर्म) काय आहे? आणि (शरीर व मनाचे) पावित्र्यसुद्धा माहीत नाही आणि त्यांच्या सदाचरण नसते आणि त्यांच्यात सत्यतादेखील नसते. (१६:७)

● (१) ते म्हणतात की, या विश्वाची प्रणाली ईश्वाची महिमा अथवा निर्मितीशिवाय, उद्देशाशिवाय आणि चुकीच्या आधारांवर स्थित आहे. (२) या विश्वाचा ईश्वर नाही, (३) हे विश्व विनाकारण अस्तित्वात आले आहे, (४) इच्छाशक्ती वा यौन-इच्छेव्यतिरिक्त (या विश्वातील जीवनाचे) दुसरे लक्ष्य काय असू शकते? (१६:८)

● अशा प्रकारचा विनाशकारी दृष्टिकोन अवलंबून, हे तुच्छ बुद्धी बाळगणारे स्वत:ला निर्माता समजून या विश्वाला विनाशक असलेले अनुपयोगी, अनावश्यक आणि हानी व त्रास देणारे कर्म करू लागतात. (१६:९)

● (१) (ईश्वराचा आधार आणि त्याच्या नियम व आदेशांचे पालन न करता) कधीच पूर्ण न होणाऱ्या इच्छांचे पालन करीत त्यांचाच आधार घेऊन (२) धोकाधडी, (३) लोभ, (४) खोट्या मानसन्मानाच्या मस्तीत बुडून ईशज्ञान, उद्देश व योजनेच्या उल्लंघनास आपले लक्ष्य बनवून, अपवित्र संकल्पांचा स्वीकार करून, मनाला आकर्षित करणाऱ्या भौतिक वस्तू प्राप्त करून विश्वाच्या विकास व प्रगती करण्यात मग्न असतात. (१६:१०)

● (ईश्वराचा आधार सोडून) इच्छांच्या आधारे भौतिक वस्तूंच्या उपयोगास जीवनाचे लक्ष्य बनविणारा मनुष्य, "सध्या माझ्याकडे एवढेच आहे." अशा प्रकारचा निश्चय करीत असतो आणि जीवनाच्या अंत म्हणजे मरेपर्यंत असीम भय, शोक व चिंतेत गुरफटलेला असतो. (१६:११)

● (आसुरी गुण बाळगणारे) शेकडो प्रकारच्या मिथ्या अपेक्षांच्या फेऱ्यात अडकून इच्छभक्ती (जसे- शिर्क) धारण करतात (आणि मग इच्छांचे पालन करून) चुकीच्या पद्धतीने यौनसंबंध पूर्ण करण्यात आणि सदैव भौतिक लाभ व उपभोग्य वस्तूंच्या शोधात असतात (आणि जेव्हा इच्छा पूर्ण होत नाहीत) क्रोध वा तणावाच्या जाळ्यात अडकून, अन्यायाद्वारा चुकीच्या पद्धतीने सांसारिक लाभ व धन गोळा करण्यात मग्न राहतात. (१६:१२)

● (आसुरी गुण असलेल्या मनुष्याचा दृष्टिकोन असा असतो की) (१) आज हे जे काही मला लाभले आहे, ते माझ्या स्वकर्तृत्वामुळे आहे. (२) माझ्या या शोधणाऱ्या मनाने या सर्व वस्तू प्राप्त केल्या आहेत. (३) हे माझे धन भविष्यात पुन्हा दुसऱ्यांदा आणखी (अधिक होईल.) (१६:१३)

● ही गोष्ट सिद्ध झाली आहे की मी (१) सर्वाधिक भौतिक वस्तूंचा उपभोग घेत आहे. (२) मी शक्तिशाली आणि प्रसन्न

आहे. नि:संदेह मी ईश्वर किंवा शासक आहे, म्हणून तो माझा शत्रू, माझ्या शक्तीनेच मारला गेला आहे, इतरांनाही मीच मारीन. (१६:१४)

● अज्ञानाने भरकटून तो अशा प्रकारचा विचार करतो की (१) माझ्या सभोवती श्रीमंत आप्तेष्ट आहेत. (२) माझ्याद्वारेच (मोठमोठे) ईशप्रसन्नतेची कार्ये केली जातात. (३) मी खूप अधिक दान देणारा आहे. मी मौजमजा करणारा आहे. आता सांगा की माझ्यासारखा दुसरा कोण आहे? (१६:१५)

● (असे भरकटणारे लोक) इच्छाभक्तीमुळे (संपूर्ण जीवन) भौतिक वस्तूंचा उपभोग घेण्यात मग्न असतात आणि लोभाच्या जाळ्यात अडकून अनेक संकटे व समस्यांमुळे भरकटतात (आणि मग मेल्यानंतर) प्रदूषणाने भरलेल्या नरकात पडतात. (१६:१६)

● असे (भरकटलेले लोक) ईश्वरी आदेश व नियमांच्या उल्लंघनासह लोकांना धोका देण्यासाठी सत्कर्म करतात. (हे सत्कर्म) त्यांच्या स्वत:च्या विचारानुसार रचलेल्या (बनविलेल्या) गोष्टी असतात, (नवीन पद्धत असते) जी भक्तीच्या नावाखाली त्यांची स्वत:ची फुशारकी, सन्मान, धनदौलत, गर्व आणि विलासातील वाढीशी संलग्न असते. (१६:१७)

● (१) अहंकार, (२) बल व हट्ट, (३) घाई, (४) इच्छाभक्ती आणि (५) क्रोध, घृणा व हिंसेच्या आधारे हे लोक माझ्याशी- (आत्मा व शरीररहित ईश्वराशी) ईर्ष्या बाळगतात, (म्हणून त्यांची माझ्यावर) दोषदृष्टी असते. (१६:१८)

● श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो, या (ईश्वराशी) ईर्ष्या बाळगणारे, क्रूर आणि विश्वातील तुच्छ मनुष्यांना नि:संदेह मी अपवित्र आसुरांच्या पिढीत सदैव राहण्यासाठी (नरकात) खाली फेकून देतो. (१६:१९)

● मनुष्यांचा विनाश करणाऱ्या आणि नरकाचे हे तीन दरवाजे आहेत, (१) इच्छाशक्ती, (२) क्रोध आणि (३) लोभ, म्हणून या तिन्हींचा त्याग केला पाहिजे. (१६:२१)

● हे कुंतीपुत्र (अर्जुना)! या मार्गभ्रष्ट करणाऱ्या तिन्ही दरवाजांपासून मुक्त होणारा मनुष्य, ईश्वराचा आधार व त्याचा आश्रय घेऊन आपल्या आचरणात सुधारणा करतो, मग तो मृत्यूनंतर स्वर्गाचे सर्वश्रेष्ठ व दिव्य लक्ष्य गाठतो. (१६:२२)

************

# ६. ईश्वर किती महान आहे?

● प्रकाशाची किरणे एका सेकंदात ३ लाख किलोमीटरचे अंतर पार करतात. म्हणजे एका सेकंदात आपण राहात असलेल्या पृथ्वीला ७ वेळा पदक्षिणा घालू शकतात.

● आपला सूर्य पृथ्वीपासून इतका दूर आहे की त्यापासून निघालेल्या एका प्रकाशकिरणाला पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी ८ मिनिटे लागतात.

● सूर्य पृथ्वीपेक्षा १३ लाख पटीने मोठा आहे. मात्र सूर्य हाच या ब्रह्मांडाचा सर्वांत मोठा तारा नसून (Etacarinae) इटाक्रिना नामक तारा सूर्यापेक्षा ३० कोटी पटीने मोठा आहे. (V. Y. Canismajoris) वी. वाय. कॅनीस्मेजोरिस नामक तारा सूर्यापेक्षा १ अब्ज पटीने मोठा आहे. आपण असलेल्या 'मिल्की वे गॅलॅक्सी' या आकाशगंगेत आपल्या सूर्यासारखे ३०० अब्ज सूर्य आहेत.

● आपली ही आकाशगंगा इतकी व्यापक व मोठी आहे की ३ लाख कि.मी. प्रति सेकंदाच्या गतीने प्रवास करणाऱ्या प्रकाशाच्या एका किरणास या आकाशगंगेच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचण्यास १ लाख वर्षे लागतील.

● आपल्या या आकाशगंगेपेक्षा दुप्पट मोठी व शेजारी असलेल्या आकाशगंगेचे नाव अँड्रोमिडा (Andromeda) आहे, जी ६० पटीने मोठी आहे तिचे नाव M-८१ आणि जी ६०० पटीने मोठी आहे तिचे नाव IC-1011. अशाच अनेक आकाशगंगा मिळून एक क्लश्टर बनवितात. आपण ज्या क्लश्टरमध्ये राहतो त्याचे नाव विरगो क्लश्टर आहे. या क्लश्टरमध्ये सुमारे ४७ हजार आकाशगंगा आहेत.

● अनेक क्लश्टर मिळून १ सुप क्लश्टर बनवितात. आपली आकाशगंगा ज्या सुपर क्लश्टरमध्ये आहे त्याचे नाव लोकल सुपर क्लश्टर आहे. यामध्ये १०९० हून अधिक क्लश्टर आहेत. आणि आपल्या ब्रह्मांडात अशे १ कोटीहून जास्त सुपर क्लश्टर आहेत. आणि या सर्व ब्रह्मांडाला एका ईश्वराने बनविले आहे जो या सर्वांपेक्षा मोठा आहे?

आपली ही पृथ्वी आणि आपण ईश्वराच्या महान साम्राज्यात किती लहान आहोत याचा तुम्ही अंदाज लावू शकतो काय? आम्ही जे काही सांगितले ते आपण यू-ट्यूबच्या या लिंकवर पाहू शकता. - https://youtu.be/x7QRVP2JGzM

**ईश्वराच्या महानतेचे श्लोक**

● त्याच वेळी अर्जुनाने ईश्वराचे तेजही पाहिले ते असे होते की जर आकाशात हजारो सूर्य एकत्रितपणे उगवले तरीही त्यांचा प्रकाश त्या महान ईश्वराच्या तेजासारखा होऊ शकत नाही. (११:१२)

अर्जुन म्हणाला, हे ईश्वर,

● हे ईश्वरा! मी आपल्याला आदि, मध्य व अंतरहित पाहात आहे. अनंत सामर्थ्याने युक्त असलेला, अनंत बाहू असणारा, चंद्र आणि सूर्यरूपी नेत्र असणारा, प्रज्वलित अग्निरूपी मुख असणारा, आपल्या प्रखर तेजाने या जगाला जाळून टाकत आहे; असे मी पाहात आहे.

************

# ७. ईश्वर कोण आहे?

● ईश्वर आणि श्रीकृष्णजींना आपण काय समजतो हे अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणून भगवद्‌गीतामध्ये ईश्वर व श्रीकृष्णजींच्या बाबतीत जे श्लोक आहेत आणि इतर अध्यायांमध्येसुद्धा जे श्रद्धेसंबंधी जे श्लोक आहेत त्याचे आपण विस्ताराने अध्ययन करू या. त्यासाठी सुरूवातीला आपण संस्कृतमध्ये मूळ (Original) श्लोक लिहू. मग त्यास वाक्याच्या स्वरूपात लिहू ज्यामुळे श्लोकाचा प्रत्येक शब्द लक्षात येईल. मग प्रत्येक शब्दाचा अर्थ लिहू आणि मग शेवटी त्या श्लोकाचे स्पष्टीकरण देऊ. अशा प्रकारे प्रत्येक श्लोक चार वेळा लिहिला जाईल. असे केल्याने श्लोकाचे स्पष्टीकरण समजण्यात सोपे जाईल आणि तुम्ही स्वत:देखील संसकृत शब्दकोशाच्या साहाय्याने श्लोकाचे स्पष्टीकरण करू शकता, किंवा कमीतकमी ते स्पष्टीकरण बरोबर आहे की चुकीचे याचा अंदाज येऊ शकतो. आपण सर्व जण सत्यज्ञानाचा शोध घेत आहोत. म्हणून उदारतेसह प्रत्येक दृष्टिकोनाने भगवद्‌गीताच्या उपदेशास समजून घेण्याचा प्रयत्न करावयास हवा.

**ईश्वर एक आहे.**

● *तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते।*
*प्रियो हि ज्ञानिनो ऽत्यर्थमहं स च ममप्रियः ।।*

*तेषाम ज्ञानी नित्य-युक्तः एक भक्तिः विशिष्यते।*
*प्रियः हि ज्ञानिनः अत्यर्थम् अहम् सः च प्रियः ।*

(तेषाम) त्या (चौघां) मध्ये, (ज्ञानी) जो ज्ञानी, (नित्य) धैर्य (संयमासह/ निरंतर) (एक) एक ईश्वराच्या, (भक्ती) प्रार्थनेत, (युक्त) मग्न असतो, (विशिष्यते) तो सर्वांत श्रेष्ठ आहे, (हि) कारण, (ज्ञानी) त्या ज्ञानीला, (अहम) मी, (अत्यर्थम) अत्यंत, (प्रिय) प्रिय आहे, (च) आणि, (स) तो, (मम) मला, (प्रियः) (अत्यंत) प्रिय आहे.

**( श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतोः )**

त्या (चौघां) मध्ये, जो ज्ञानी धैर्यासह एक ईश्वराच्या प्रार्थनेत मग्न असतो, तो सर्वांत श्रेष्ठ आहे, कारण त्या ज्ञानीला मी अत्यंत प्रिय आहे आणि तोदेखील मला (अत्यंत) प्रिय आहे. (७:१७)

● *ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते।*
*एकत्वेन पृथत्केन बहुधा विश्वतोमुखम् ।।९-१५ ।*

*ज्ञान-यज्ञेन च अपि अन्ये यजन्तः माम् उपासते।*
*एकत्वेन पृथक्त्वैन बहुधा विश्वतः मुखम् ।।१५ ।।*

(ज्ञान) ज्ञानानुसार (यज्ञेन) भक्ती करणारे (अपि) नि:संदेह (माम्) मला (एकत्वेन) एक मानून एकाग्रतेने भक्ती करतात (च) आणि दुसरे (ज्ञानानुसार भक्ती न करणारे) लोक आणि (अन्ये) दुसरे, (ज्ञानानुसार कर्म न करणारे) लोक (विश्वतः) विश्वातील (बहुधा) अनेक (पृथक्त्वैन) वेगवेगळे (मुखम्) रुप असलेल्या निर्मित वस्तूंची

(यजन्तः) भक्ती करतात.

● ज्ञानानुसार भक्ती करणारे नि:संदेह मला एक मानून एकाग्रतेने भक्ती करतात आणि दुसरे (ज्ञानानुसार भक्ती न करणारे) लोक आणि दुसरे (ज्ञानानुसार कर्म न करणारे) लोक विश्वातील अनेक वेगवेगळे रूप असलेल्या निर्मित वस्तूंची भक्ती करतात. (९:१५)

**ईश्वरनेच या ब्रह्मांडाची निर्मिती केली आहे.**

● *मया ततमिदं सर्व जगदव्यक्त मूर्तिना।*
*मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ।।*

*मया ततम् इदम् सर्वम् जगत् अव्यक्त-मूर्तिना।*
*मत्-स्थानि सर्व-भूतानि न च अहम् तेषु अव्यस्थितः*

(मया) माझ्या, (अव्यक्त) न दिसणाऱ्या, (मूर्तिना) मूर्तीने, (इदम्) शरीर वा रूपाने, (सर्वम्) हे सर्व, (जगत्) विश्व, (ततम्) व्यापलेले आहे. (सर्व) सर्व, (भूतानि) निर्मित वस्तू, (मत्) माझ्या, (स्थानि) ठायी आहेत परंतु (अहम्) मी, (तुषु) त्यांच्यामध्ये, (अव्यस्थितः) स्थित, (न) नाही.

माझ्या न दिसणाऱ्या मूर्तीने शरीर वा रूपाने हे सर्व विश्व विस्तारले आहे. सर्व निर्मित वस्तू माझ्या ठायी आहेत परंतु मी त्यांच्यामध्ये स्थित नाही. (९:४)

**● ईश्वर कोणाच्या आत्म्यात नाही आणि मृत्यूनंतर कोणताही आत्मा ईश्वरात सामावणार नाही.**

*न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम्।*
*भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ।*

*न च मत् स्थानि भूतानि पश्य मे योगम् ऐश्वरम्।*
*भूत-भूत् न च भूत-स्थः मम आत्मा भूत-भावनः ।।*

(च) आणि (मी) निर्मित (भूतस्थः) (सर्व वस्तूंमध्ये) (न) नाही (च) आणि निर्मित (भूतानि) सर्व वस्तू (मत) माझ्यात (स्थानि) स्थित (न) नाहीत. (मे) माझ्या (एश्वरम) प्रकृतीच्या (योगम्) आश्रित (पश्य) (वस्तूंना) पाहा (मम) मी (आत्मा) एकमेव (भूत) निर्मित वस्तूंचा (भावनः) एकटा निर्माता (भूत) त्यांचे पोषण करणारा.

आणि (मी) निर्मित (सर्व वस्तूंमध्ये स्थित) नाही आणि निर्मित सर्व वस्तू माझ्यात स्थित नाहीत. माझ्या प्रकृतीच्या आश्रित (वस्तूंना) पाहा मी निर्मित वस्तूंचा एकमेव निर्माता व त्यांचे पोषण करणारा (आहे.) (९:५)

**● ईश्वराने सर्वांना पहिल्यांदा निर्माण केले. तो प्रलयाच्या (कयामत) दिवशी सर्वांना मृत्यू देईल. मग त्यानंतर दुसऱ्यांदा जिवंत करील. (कर्मांचा हिशोब घेण्यासाठी.)**

● *सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम्।*
*कल्पक्षये पुनस्तानि कल्पोदौ विसृजाम्यहम् ।।*

*सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिम् यान्ति मामिकाम्।*
*कल्प-क्षये पुनः तानि कल्प-आदौ विसृजामि*

*अहम् ।।*

(कौन्तेय) हे कुंतीपुत्र (अर्जुना), (अहम) मी (कल्प) ब्रह्मांडाच्या (आदौ) आरंभी मी (तानि) या सर्व (भूतमात्रां) (विसृजामि) ची निर्मिती केली आहे आणि (कल्प) ब्रह्मांडाच्या (क्षये) प्रलयाच्या वेळी (अंतिम समयी) (मामिकाम्) माझ्या इच्छानुसार (प्रकृतिम्) ईशप्रकृती द्वारा (सर्व) सर्व (भूतानि) मनुष्यांना (पुनः) पुन्हा (यान्ति) (निर्माण केले) जिवंत केले जाईल.

हे कुंतीपुत्र (अर्जुना)! मी ब्रह्मांडाच्या आरंभी मी या सर्व (भूतमात्रां-मनुष्यां) ची निर्मिती केली आहे आणि ब्रह्मांडाच्या प्रलयाच्या वेळी (अंतिम समयी) माझ्या इच्छानुसार ईशप्रकृती द्वारा (सर्व) सर्व (भूतानि) मनुष्यांना पुन्हा (निर्माण केले) जिवंत केले जाईल. (९:७)

## ईश्वराला शरीरधारी मानणे मूर्खपणा आहे.

● *अवजानन्ति मां मूढा मानुषी तनुमाश्रितम् परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।।*

*अवजानन्ति माम् मूढाः मानुषीम् तनुम् आश्रितम्। परम् भावम् अजानन्तः मम भूत महा-ईश्वरम् ।।*

(मम) मला (भूत) सर्व निर्मित वस्तूंचा (महा) सर्वश्रेष्ठ (ईश्वरम्) शासक (परम्) आणि सर्वश्रेष्ठ (भावम्) निर्माता (अजानन्तः) न मानता (मूढाः) मूर्ख लोक (माम्) मला (मानुषीम्) मनुष्यासारखी (तनुम्) शरीरधारी निर्मित वस्तू (अवजानन्ति) मानून (आश्रितम्) (माझा) आश्रय घेतात किंवा भक्ती करतात.

● मला सर्व निर्मित वस्तूंचा (ब्रह्मांड/ सृष्टीचा) सर्वश्रेष्ठ शासक आणि सर्वश्रेष्ठ निर्माता न मानता मूर्ख लोक (माम्) मला मनुष्यशरीरधारी निर्मित वस्तू मानून (माझा) आश्रय घेतात किंवा भक्ती करतात. (९:११)

● *मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनी श्रिताः।*

*मोघ-आशाः मोघ-कर्माणः मोघ-ज्ञानाः विचेतसः। राक्षसीम् आसुरीम् च एरां प्रकृतिम् मोहिनीम् श्रिताः।*

(एव) ईश्वराला (मनुष्य, निर्मित वस्तू, शरीरधारी अथवा मूर्ती समजणे) निःसंदेह (राक्षसीम्) एक राक्षसी (विचेतसः) स्वभाव अथवा दृष्टिकोन आहे (च) आणि (मोहिनीम्) याच भ्रम व गुंतागुंतीमुळे (आसुरीम्) लोकांनी (प्रकृतिम्) राक्षसी प्रकृती व शक्तीचा (श्रिताः) आश्रय घेतला आहे (मोघ ज्ञानाः) म्हणून या लोकांचे ज्ञान निष्फळ ठरले (मोघ-कर्माणः) त्यांचे सर्व कर्म निरर्थक झाली (मोघ-आशाः) आणि त्यांच्या सर्व आशाआकांक्षा व्यर्थ ठरल्या.

ईश्वराला (मनुष्य, निर्मित वस्तू, शरीरधारी अथवा मूर्ती समजणे) निःसंदेह एक राक्षसी स्वभाव अथवा दृष्टिकोन आहे आणि याच भ्रम व गुंतागुंतीमुळे लोकांनी

राक्षसी प्रकृती व शक्तीचा आश्रय घेतला आहे म्हणून या लोकांचे ज्ञान निष्फळ ठरले त्यांचे सर्व कर्मे अर्थहीन झाली आणि त्यांच्या सर्व आशाआकांक्षा व्यर्थ ठरल्या. (९:१२)

**● ईश्वर महान आहे।**

संजय धृतराष्ट्राला म्हणाला,

● *एतच्छुत्वा वचनं केशवस्य कृताज्जलिर्वेपमानः किरीटी।*

*नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ।।११-३५ ।।*

*एतत् श्रुत्वा वचनम् केशवस्य कृत-अञ्जलिः वेपमानः किरीटी।*

*नमस्कृत्वा भूयः एव आह कृष्णम् सगद्गद्म् भीत-भीतः प्रणम्य ।।३५ ।।*

(एतत) अशा प्रकारे (केशवस्य) केशवा (कृष्णा) (ईश्वर) चे, (वचनम) आदेश, (श्रुत्वा) ऐकून, (किरीटी) मुकुटधारी (अर्जुना) ने, (कृत-अन्जलिः) दोन्ही हात जोडून, (ईश्वराला) (नमस्कृत्वा) नमस्कार केला, (भूयः) मग दुसऱ्यांदा, (वेपमानः) थरथरत, (भीत) भीत, (भीतः) भीत, (प्रणम्य) ईश्वराला नमस्कार केला, (एव) आणि मग, (कृष्णम) कृष्णाला, (स-गन्ददम्) सद्गदित, (आह) वाणीने (ईश्वराला म्हणाला.)

अशा प्रकारे केशवा (कृष्णा) द्वारे (ईश्वर) चे आदेश ऐकून, मुकुटधारी अर्जुनाने दोन्ही हात जोडून (ईश्वराला) नमस्कार केला, मग थरथरत भीतभीत ईश्वराला नमस्कार केला आणि मग कृष्णाला सद्गदित वाणीने म्हणाला, (ईश्वराला म्हणाला.) (११:३५)

**संजय ने धृतराष्ट्र से कहा,**

● *स्थाने हृषीक-ईश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च।*

*रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्धसंघाः ।।११-३६ ।।*

*स्थाने हृषीक-ईश तव प्रकीर्त्या जगत् प्रहृष्यति अनुरज्यते च। रक्षांसि भीतानि दिशः द्रवन्ति सर्वे नमस्यन्ति च सिद्ध-सङ्घाः ।।३६ ।।*

हे अंतर्यामी हृषिकेशा, तुझ्या कीर्तीने तुझ्या गुणवर्णाने म्हणजेच तुझ्या महातम्याने अवघे जग आनंदित होते व त्यात ते अनुरक्त होते हे योग्यच आहे. आपल्या अगाध महिम्यामुळे भयभीत झालेले राक्षस दश दिशांना पळत सुटतात आणि आपली महानता पाहून सर्व सिद्धांचा समुदाय आपल्याला नमस्कार करीत असतो.

(हृषीकेश) हृषिकेश (कृष्ण) (स्थाने) च्या स्थानी (इश) ईश्वर (तव) आपल्या (प्रक्रीर्त्या) कीर्तीने (जगत्) अवघे ब्रह्मांड (प्रहृष्यति) आनंदित झाले आहे, (अनुरज्यते) प्रेमात बुडालेला आहे, (रक्षांसि) राक्षस (भीतानि) भयभीत होऊन (दिशः) दशदिशांना (द्रवन्ति) पळत सुटले आहेत (च) आणि (सर्वे) सर्व (सिद्ध) सिद्ध पुरुषांचे (सड्घा) समुदाय (नमस्यन्ति) नमस्कार

करीत आहेत.

हृषिकेश (कृष्णा) च्या स्थानी ईश्वर आपल्या कीर्तीने अवघे ब्रह्मांड आनंदित झाले आहे, प्रेमात बुडालेला आहे, राक्षस भयभीत होऊन दशदिशांना पळत सुटले आहेत आणि सर्व सिद्ध पुरुषांचे समुदाय नमस्कार करीत आहे. (११:३६)

● *कस्माच्च न नमेरन्महात्मन*
*गरीयसे ब्रम्हणो ऽप्यादिकर्त्रे।*

*अनन्त देवेश जगन्निवास*
*त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ।।११-३७ ।।*

*कस्मात् च ते न नेमरन् महा-आत्मान् गरीयसे ब्रम्हण: अपि आदि-कर्त्रे।*

*अनन्त देव-ईश जगत् निवास त्वम् अक्षरम् सत- असत् तत्-परम् यत् ।।३७ ।।*

(गरीयसे) हे महात्मन् ईश्वर (ब्रम्हण:) (निर्माणकार्याची देखरेख करणाऱ्या देवता) ब्रह्मदेवा (अपि) चाही (आदि) आदिकर्ता (कर्त्रे) निर्माता! (देव) हे देवेशा (ईश), (जगत्) ब्रह्मांडास (निवास) आधार अथवा स्थान देणाऱ्या, (यत्) कारण (त्वम्) आपण (सत्) स्थित न राहणारे विश्व (तत्) आणि त्या (असत्) स्थित राहणाऱ्या परलोकाच्याही (परम्) अतिरिक्त जे काही आहे (अक्षर) त्यांचेही (अक्षरम्) अविनाशी निर्माता आहात. (कस्मात्) (मग) का (महा) महान (आत्मन्) पुरुष (म्हणजे कृष्णा) ने (च) देखील (नमेरन्) नमस्कार करू नये.

● हे महात्मन् ईश्वरा (निर्माणकार्याची देखरेख करणाऱ्या देवता) ब्रह्मदेवाचाही आदिकर्ता निर्माता! हे देवेशा, ब्रह्मांडास आधार अथवा निवारा देणाऱ्या, कारण आपण स्थित न राहणारे विश्व आणि त्या स्थित राहणाऱ्या परलोकाच्याही अतिरिक्त जे काही आहे (अक्षर) त्यांचेही अविनाशी निर्माता आहात. (मग) का महान पुरुष (म्हणजे कृष्णा) ने देखील नमस्कार करू नये? (११:३७)

● *त्वम् आदि-देव: पुरूष: पुराण: त्वम् अस्य विश्वस्य परम् निधानम्।*

*वेत्ता असि वेद्यम् च परम् च धाम त्वया ततम् विश्वम् अनन्त-रूप ।।३८ ।।*

(त्वम्) आपणच (आदि देव:) आदिदेव (पुराण: पुरुष:) पुराणपुरुष (ईश्वर) (त्वम्) आणि (अस्य) आपणच (विश्वस्य) ब्रह्मांडाचा (परम्) सर्वांत मोठा (निधानाम्) आधार आहात. (वेत्ता) आपणच सर्व काही जाणणारे (च) आणि (वेद्यम) जाणण्यास योग्य (असी) आहात, (त्वया) आपणच (विश्वम) हे विश्व (अनन्त) असीम निर्मित (रूप) वस्तूंनी (ततम्) व्यापले आहे. (च) आणि, (परम्) सर्वश्रेष्ठ (आपणच) (धाम्) दिव्य स्वर्गाचे निवास आहात.

● आपणच सर्वप्रथम ईश्वर (आणि) आदिदेव पुराणपुरुष आहात. आणि आपणच ब्रह्मांडाचा सर्वांत मोठा आधार आहात. आपणच सर्व काही जाणणारे

आणि जाणण्यास योग्य आहात, आपणच हे विश्व असीम निर्मित वस्तूंनी व्यापले आहे आणि सर्वश्रेष्ठ (आपणच) दिव्य स्वर्गाचे निवास आहात. (११:३८)

*वायुर्यमोऽग्निर्वरुण: शशाङ्क: प्रजापतिस्त्वं प्रतितामहश्च।*

*नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्व: पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ।।३९।।*

● हे सर्वप्रथम जन्मास येणाऱ्या मनुष्याच्या शासका! आपणच वायू, अग्नी, जल, चंद्रमाचे रक्षक आहात. सर्वप्रथम पित्याच्या महान ईश्वरा! आपल्याला मी नमस्कार करतो. आपणासमोर मी नमन करतो, आपणास हजार वेळा नमस्कार करतो आणि पुन्हा नमस्कार करतो, पुन्हा नमस्कार करतो आणि पुन्हा मान तुकवितो. (११:३९)

*नम: पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व।*

*अनन्तवीर्यामिताविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्व:।।४०।।*

● आपल्याला समोरून व मागून नमस्कार असो. हे सर्वात्मन्, आपल्याला सर्व बाजूंनी नमस्कार असो. कारण आपणच सर्व काही आहात. हे अत्यंत प्रकृतीवाल्या ईश्वरा! नि:संदेह आपल्या असीम शक्तीनेच या विश्वाला ते सर्व काही मिळत आहे आणि त्या परलोकातदेखील आपल्या प्रकृतीद्वारेच प्रत्येक वस्तू प्राप्त होईल. (११:४०)

*पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।*

*न त्वस्तसमोऽस्त्यभ्यधिक: कुतोऽन्यो लोक त्रयेऽप्यप्रतिमप्रभाव।।४३।।*

● नि:संदेह आपण अदृश्य, अचिंत आहात. आपली कसलीही मूर्ती किंवा रूप नाही. आपल्यासारखा दुसरा कोणीही नाही. ब्रह्मांडातील सजीव व निर्जीव वस्तूंना निर्माण करणारे आहात. प्रतिष्ठावान आहात आणि गुरू आहात. आपल्यासमान प्रतिष्ठाप्राप्त कोणीही नाही. तिन्ही लोकांमध्ये आपल्यापेक्षा श्रेष्ठ कोणी दुसरा कसा असू शकतो? (११:४३)

*तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम्।*

*पितेव पुत्रस्य सखेव सख्यु: प्रिय: प्रियायार्हसि देव सोढुम्।।४४।।*

● आपण चराचर जगताचे पिता आहात, हे ईश्वरा! म्हणूनच मी माझे शरीर आपल्या चरणक्ष ठेवून प्रणाम करीत आहे आणि स्तुती करण्यास योग्य अशा आपण प्रसन्न व्हावे म्हणून प्रार्थना करत आहे. हे ईश्वरा, आदरणीय पिता जसा पुत्राच्या, मित्र जसा मित्राच्या आणि प्रेम करणारे प्रेम करणाऱ्यांकडून होणारा अपमान सहन करतात; त्याप्रमाणे आपणही माझे दोष सहन करावेत. (आणि मला क्षमा करावी.) (११:४४)

*********

# ८. ईश्वर जन्म घेतो काय?

**● हिंदू धर्मात पैगंबर ( संदेष्टा ) झाले आहेत काय?**

● ईश्वराने सृष्टीची रचना करून जेव्हापासून मनुष्याला पृथ्वीवर वसविले आहे तेव्हापासून मनुष्यांच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळी आपला एखादा प्रतिनिधी पाठविला आहे. ज्यास मनु, संदेष्टा अथवा पैगंबर म्हणतात. मात्र लोक ते गेल्यानंतर ईश्वराच्या आदेश आणि संदेशांमध्ये परिवर्तन करीत होते. ईश्वर दयाळू आहे. तो मानवजातीच्या कल्याणासाठी एकानंतर दुसरा मनु पाठवून बदललेल्या आदेशांमध्ये सुधारणा करीत असे. अशा प्रकारे एक लाखाहून अधिक मनु अथवा ईश्वराचे प्रतिनिधी या धरतीवर मानवांच्या मार्गदर्शनासाठी येऊन गेले आहेत.

ईश्वराच्या सच्चा भक्तांचे हे कर्तव्य आहे की ते ज्या वर्तमान युगात आहेत त्या युगासाठी पाठविण्यात आलेल्या मनुने दिलेल्या शिकवणीनुसारच ईश्वराची भक्ती करावी.

● श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो,

प्राचीन काळातील सात महान ऋषी आणि मनुच्या पिढीतून पाठविण्यात येणारे चौदा (ऋषी) विचार करीत माझ्या इच्छेनुसार वागत होते. या विश्वात ही सर्व मानवजाती सर्वप्रतम निर्माण करण्यात आलेल्या मनुष्यापासून आणि त्या (ऋषींच्या पिढी) पासूनच जन्माला आले आहेत. (गीता अध्याय १०, श्लोक ६)

● काही विद्वानांच्या मते मनुच्या पिढीतून पाठविण्यात आलेले चौदा ऋषीदेखील मनुसारखेच ईश्वराचे संदेष्टा होते. या युगातील आणि सर्वांत अंतिम मनु (संदेष्टा) महामे ऋषी आहेत. काही मनु अथवा ईश्वराचे प्रतिनिधी अथवा संदेष्टा ज्यांच्या बाबतीत वाचण्यात आले आहे ते निम्नलिखित आहेत–

**सर्वप्रथम मनु :–**

भगवद्‌गीताचा एक श्लोक असा आहे;

● हे सर्वप्रथम जन्मास येणाऱ्या मनुष्याच्या शासका! आपणच वायू, अग्नी, जल, चंद्रमाचे रक्षक आहात. सर्वप्रथम पित्याच्या महान ईश्वरा! आपल्याला मी नमस्कार करतो. आपणासमोर मी नमन करतो, आपणास हजार वेळा नमस्कार करतो आणि पुन्हा नमस्कार करतो, पुन्हा नमस्कार करतो आणि पुन्हा मान तुकवितो. (११:३९)

या श्लोकात ज्यास सर्वप्रथम जन्मास येणारा मनुष्य आणि प्रथम पिता म्हटले गेले आहे त्यांना ऋग्वेदात मनु म्हटले गेले आहे, तो श्लोक असा;

जनं मनुजातं। (ऋग्वेद १:४५:१)
सर्व मनुची संतती आहेत.

● या प्रथम मानवास कुरआनमध्ये माननीय

आदम (अ.) आणि बायबल मध्ये Adam म्हटले गेले आहे.

● भविष्य पुराणातदेखील या या प्रथम मानवास आदम म्हटले गेले आहे. भविष्य पुराणात आदमचे वर्णन अशा प्रकारे आहे;

भविष्य पुराणाणात म्हटले आहे की आदम आणि हव्वावतीला विष्णुने चिखलापासून निर्माण केले. प्रदाननगर (स्वर्ग)च्या पूर्वेकडील भागात, ईश्वराने बनविलेले चार कोसचे एक फार मोठे जंगल होते. (कोस- किलोमीटरपेक्षा मोठे, जवळजवळ दोन मैल असते.) आपली पत्नी (हव्वावती) ला पाहण्यास उताविळ झालेले आदम अपराधी वृक्षाच्या खाली गेले. तेव्हा सापाच्या रूप धारण करून तेथे कलि (सैतान) प्रकट झाला. त्या चलाख शत्रूद्वारे आदम व हव्वावती यांना फसविण्यात आले आणि त्या विषवृक्षाचे फळ आदम यांनी खाल्ले आणि त्यांनी विष्णुच्या आदेशाचे उल्लंघन केले. परिणामस्वरूप त्यांना पृथ्वीवर पाठविण्यात आले. त्या दोघांना अनेक अपत्ये झाली. आदम यांचे वय ९३० वर्षे होते. (भविष्य पुराण, ३)

दुसऱ्या मनुचे वर्णन ग्रंथांमध्ये अशा प्रकारे आहे;

**दूसरा मनु :-**

● मार्कण्डेय पुराण, भविष्य पुराण, मत्स्य पुराणात आहे की, मनुच्या कालखंडात (युगात) एक फार मोठा महापूर (Flood) आला होता. ज्यात केवळ मनु आणि एक ईश्वरास मानणारे लोकांना सोडून सर्व लोक या महापुरात बुडून मरण पावले होते.

● मनुने आपल्या हातांनी एक नाव बनविली होती आणि त्यावर ते स्वत: स्वार झाले आणि एक ईश्वराला मानणाऱ्यांना नावेत घेतले आणि प्रत्येक जातीच्या प्राण्यांपैकी दोन-दोन जोड्या घेतल्या. हेच लोक जिवंत राहिले आणि सपूर्ण जग या महापुरात बुडून नष्ट झाली होती. (मत्स्य पुराण, अध्याय १, श्लोक २९-३५)

● हीच गोष्ट कुरआनमध्येदेखील उद्धृत करण्यात आली आहे. (पवित्र कुरआन, सूरह क्र. ११, आयत २५ ते ४८) हीच गोष्ट बायबलमध्येदेखील लिहिण्यात आली आहे. (जेनिसीस ६-८)

● जगातील सर्व धर्मांच्या ईशग्रंथांमध्ये एकाच महापुराचे वर्णन आहे आणि त्या महापुरात एकाच नावेचे वर्णन आहे, ज्यात एक ईश्वराला मानणारे (अनुयायी) आपल्या एका पैगंबरासह बचावले होते.

● म्हणून संस्कृतचेविद्वान डॉ. वेद प्रकाश उपाध्याय म्हणतात की, कुरआनमध्ये ज्या पैगंबरांना माननीय नूह म्हटले गेले आहे त्यांना बायबलमध्ये Noah म्हटले आहे आणि भविष्य पुराणात ज्यांना मनु म्हटले गेले आहे, ती एकच व्यक्ती आहे आणि यांनाच हिंदू धर्माच्या अन्य ग्रंथांमध्ये न्युह या नावानेसुद्धा ओळखले जाते. ('वेदों और पुराणों के आधार पर एकता की ज्योति', लेखक डॉ. वेद प्रकाश उपाध्याय)

● हिंदू धर्माच्या ग्रंथांमध्ये अबी राम (हजरत इब्राहीम) अथवा (हजरत इस्माईल) इत्यादींचे वर्णनदेखील आहे. आणि महामे ऋषी (हजरत मुहम्मद स.) यांची भविष्यवाणी ३१ वेळा आहे. त्यांच्या बाबतीत डॉ. वेद प्रकाश उपाध्याय यांचे पुस्तक 'वेदों और पुराणों के आधार पर एकता की ज्योति'चे वाचन करा. हे पुस्तक माझ्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

**ईश्वर जन्म घेतो काय?**

*यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अद् भूतथानाय अर्धमस्य तदात्म्यम् सृजानम्यहम्। (४-७)*

*परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कताम्। धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।।(४-८)*

या श्लोकाचा अर्थ लोक असा सांगतात की, जेव्हा जेव्हा पृथ्वीवर अधर्माचा फैलाव होईल, तेव्हा धर्माची स्थापना करण्यासाठी मी (ईश्वर) जन्म घेईन. या श्लोकावरून ईश्वराचे जन्म घेणे सिद्ध होत नाही काय?

या प्रश्नाच्या अचूक उत्तरासाठी आम्ही भगवद्गीताच्या या दोन श्लोकांचे भाष्य (स्पष्टीकरण) विस्ताराने करीत आहोत.

**स्वामी सुखराम महाराज यांचे भाष्य:-**

● स्वामी सुखराम महाराज यांनी दोन्ही श्लोकांचे भाष्य आपले पुस्तक 'साधक संजीवनी'मध्ये अशा प्रकारे केले आहे;

● *यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अद् भूतथानाय अर्धमस्य तदात्म्यम् सृजानम्यहम्। (४-७)*

● *यदा यदा हि धर्मस्य ग्लानि भवति भारत। अभ्युत्थानम् अधर्मस्य तदा आत्मानम् सृजामि अहम् ।।७।।*

● (भारत) हे भारतवंशी अर्जुना!, (यदा, यदा) जेव्हा जेव्हा (हि) ही, (धर्मस्य) धर्माची, (ग्लानिः) हानी (आणि) (भवति) होते, (अभ्युत्थानम्) वृद्धी, (अधर्मस्य) अधर्माची (तदा) तेव्हा तेव्हा, (आत्मानम्) स्वत:स (अहम्) मी (सृजामि) (साकार स्वरूपात) प्रकट करतो।

● हे भारतवंशी अर्जुना! जेव्हा जेव्हा धर्माची हानी आणि अधर्माची वृद्धी होते, तेव्हा मी स्वत:स साकार स्वरूपात प्रकट करतो। (४-७)

● *परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कताम्। धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।।(८)*

*परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दृष्कृताम्। धर्म संस्थापन अर्थाय सम्भवामि युगे युगे।।*

(साधूनाम्) साधकां (भक्तां) चे, (परित्राणाय) रक्षण करण्यासाठी, (दुष्कताम्) पापकर्म करणाऱ्यांचा, (विनाशय) विनाश करण्यासाठी, (एद्व) आणि, (धर्मसंस्थापनार्थाय) धर्माची संस्थापना करण्यासाठी (मी), (युगे, युगे) युगायुगाच्या ठिकाणी (सम्भवामी) अवतार घेतो.

साधकांचे (भक्तांचे) रक्षण करण्यासाठी, पापकर्म करणाऱ्यांचा विनाश करण्यासाठी आणि धर्माची संस्थापना करण्यासाठी (मी) युगायुगाच्या ठिकाणी अवतार घेतो. (४-८)

**डॉ. साजिद यांचे भाष्य :-**

● डॉ. साजिद सिद्दीकी यांनी आपल्या पुस्तकात या श्लोकांचे भाष्य अशा प्रकारे केले आहे;

*यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अद् भूतथानाय अर्धमस्य तदात्म्यम् सृजानम्यहम् ।(४-७)*

*यदा यदा हि धर्मस्य ग्लानि भवति भारत। अभ्युत्थानम् अधर्मस्य तदा आत्मानम् सृजामि अहम् ।।७ ।।*

(भारत) हे भारतवंशी (अर्जुना)! (हि) नि:संदेह (यदा) जेव्हा (यदा) जेव्हा (धर्मस्य) धर्मात (ग्लानि:) कमतरता व अधोगती (भवति) होऊ लागते (अधर्मस्य) आणि अधर्म (अभ्युत्थानम्) वाढू लागतो, (तदा) तेव्हा (अहम्) मी (आत्मानम्) स्वत: (सृजामि) (आपला उपदेश आणि आपले ज्ञान) प्रदान करतो.

हे भारतवंशी (अर्जुना)! नि:संदेह जेव्हा जेव्हा धर्मात कमतरता व अधोगती होऊ लागते आणि अधर्म वाढू लागतो, तेव्हा मी स्वत: (आपला उपदेश आणि आपले ज्ञान) प्रदान करतो. (गीता ४-७)

● *परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कताम्। धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे।।(८)*

*परित्राणाय साधुनाम् विनाशाय च दृष्कृताम् ।धर्म संस्थापन-अर्थाय सम्भवामि युगे युगे।।*

(परित्राणाय) संरक्षण करण्यासाठी, (साधूनाम्) कल्याणकारी कर्म करणाऱ्या लोकांची, (दुष्कताम्) बिघाड निर्माण करणाऱ्या लोकांचा, (विनाशय) विनाश करण्यासाठी, (धर्म) धर्माची, (अर्थाय) च्यासाठी, (संस्थापर्न) धर्माला पुन:स्थापित करण्यासाठी, (युगे) युगा, (युगे) युगात, (सम्भवामी) ऋषींशी संभाषण करतो.

कल्याणकारी कर्म करणाऱ्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी, बिघाड निर्माण करणारे कुकर्म करणाऱ्या लोकांचा विनाश करण्यासाठी, धर्माला पुन:स्थापित करण्यासाठी युगायुगात (ऋषींशी) संभाषण करतो.

विश्लेषण (Analysis):-

● श्लोक क्र. ४:७ मध्ये श्लोकाचा अर्थ बदलणारा महत्त्वाचा शब्द आहे 'सृजामि' आणि श्लोक क्र. ४:८ मध्ये 'सम्भवामी'.

● कोलकाता येथे मुद्रित झालेली ईश्वरचंद्र यांच्या हिंदी - संस्कृत डिक्शनरीमध्ये 'सृजामि'चे अनेक अर्थ देण्यात आलेले आहेत. जसे- रचना करणे, निर्माण करणे, जाऊ देणे, परिधान करणे, (उत्सर्ज) दान करणे (प्रदान करणे), फेकणे, त्याग करणे, सोडणे, इत्यादी.

● 'सम्भवामी'चा अर्थ है संभाषण करणे. म्हणजे To Communicate म्हणजे काहीतरी बोलणे.

● 'सम्भवामी'शी मिळताजुळता शब्द आहे 'सम्भाव'. याचे अनेक अर्थ आहेत. जसे- मिलाफ करणे, परिचय देणे, संगती, साथ देणे, जन्म, उत्पत्ती, उगविणे, इत्यादी.

● स्वामी सुखरामजी यांनी ‘सृजामि’ आणि ‘सम्भवामी’ या दोन्ही शब्दांचा अर्थ ‘ईश्वराचे प्रकटणे’ असा लिहिला आहे. आणि डॉ. साजिद यांनी ‘सृजामि’चा अर्थ ‘प्रदान करणे’ आणि ‘सम्भवामी’चा अर्थ ‘संभाषण करणे’ असा लिहिला आहे.

● मी काही तथ्ये आपणासमोर ठेवत आहे, कोणती गोष्ट आपल्या हृदयात उतरते याचा आपण स्वत: विचार करा.

**ईश्वर असफल होऊ शकतो काय? :-**

● भारत देशाची सभ्यता फार प्राचीन आहे. परंतु फक्त एकमेव भारतीय सभ्यताच विश्वातील प्राचीन सभ्यता नाही. इराक, इजिप्त (मिस्त्र) आणि पॅलेस्टाईनच्या जवळपासची सभ्यतादेखील खूप प्राचीन आहे.

सर्व ठिकाणी लोक प्राचीन काळापासून वसलेले होते आणि अधिक समृद्ध व सुखी होते. जेव्हा समाजात समृद्धी वाढते तेव्हा दुराचार, अन्याय आणि अधर्मतादेखील वाढते.

बायबल व कुरआनमध्ये लिहिले आहे की, जेव्हा विविध प्रांतांमध्ये अधर्माची वाढ झाली तेव्हा ईश्वराने आपले प्रतिनिधी पाठविले. त्यांच्यापैकी कोणी ईश्वराच्या लिखित आदेशांसह आला तर कुणी केवळ आपल्या वाणीद्वारे ईश्वराच्या आदेशांना पोहोचविले. मात्र काही ईश्वराचे प्रतिनिधी समाजात धर्माला पुन्हा स्थापित करण्यात सफल झाले नाहीत. काही समाजांनी ईश्वराचा आदेश मान्य केला तर काहींनी अमान्य केला.

माननीय इसा (Jesus christ) जेव्हा धरतीवरून आकाशात गेले त्या वेळी त्यांचे केवळ ७२ अनुयायी होते. आणि त्यांच्या समाजाने त्यांचा वध करण्याचा पूर्ण प्रयास केला होता. म्हणून केवळ ३३ वर्षे वयातच त्यांना ईश्वराने धरतीवरून आकाशात बोलविले.

फार मोठ्या कालावधीपर्यंत ईश्वराचे अनेक प्रतिनिधी मानवजातीला ईश्वराचा उपदेश देत राहिले होते आणि जेव्हा एखाद्या समाजाचे लोक तो मानत नव्हते तेव्हा ते थकून भागून ईश्वरापाशी आग्रह करतात की, “हे ईश्वरा! यांना सुधरविणे मला शक्य नाही. म्हणून आता तू स्वत:च त्यांना मार्गदर्शन कर.”

असे अनेकदा घडले आहे की ईश्वराने अशा सर्व समुदायांना नष्ट केले जे ईश्वराचे प्रतिनिधी आणि ईश्वराची आज्ञा मानत नव्हते. हजारो वर्षांपूर्वी जे समुदाय ईश्वराच्या क्रोधाने नष्ट झाले त्यांच्या निशाण्या आजदेखील आढळतात.

(‘समूद’ नामक समुदाय जो ईशप्रकोपने नष्ट करण्यात आला, त्या समुदायाच्या घरांची चित्रे पृष्ठ क्र. १२ वर आहेत.)

● मनुच्या युगात जो महापूर आला होता तोदेखील ईश्वराचा कोपच होता, कारण काही लोकांना सोडून कुणीही मनुच्या शिकवणींचा स्वीकार केला नव्हता. मग

ईश्वराने मनु आणि मनुच्या अनुयायांना सोडून इतर सर्व अधर्मींना धरतीवरूनच नष्ट करून टाकले.

आता दोन तत्त्वज्ञान (Philosophy) किंवा श्रद्धा किंवा धार्मिक मते (Belief) आपल्या समोर आहेत.

**श्रद्धा क्र. १ )** जेव्हा जेव्हा समाजात अधर्म मोठ्या प्रमाणात वाढतो तेव्हा ईश्वर आपल्या प्रतिनिधीला पुन्हा सत्य धर्माची स्थापना करण्यासाठी पाठवितो. मात्र कधी कधी हा प्रतिनिधी धर्माची पुनर्स्थापना करण्यात समाजाच्या हट्टीपणा आणि विरोधामुळे असफलदेखील होतो.

(असे वास्तवात अनेकदा घडले आहे. आद, समूद, लूत आणि नूह यांचा समुदाय याचे बोलके उदाहरण आहे.)

**श्रद्धा क्र. २ )** जेव्हा जेव्हा समाजात अधर्म मोठ्या प्रमाणात वाढतो तेव्हा ईश्वर स्वत: मानवरूपात धर्माची स्थापना करण्यासाठी जन्म घेतो. मात्र कधी कधी तो समाजाच्या हट्टीपणा आणि बंडखोरीमुळे धर्माची पुनर्स्थापना करण्यात समाजाच्या हट्टीपणा आणि विरोधामुळे असफलदेखील होतो.

वर वर्णन करण्यात आलेल्या दोन गोष्टींपैकी कोणती गोष्ट आपल्या मनात उतरते?

### आपण प्रथम व अंतिम बुद्धाला ओळखता काय?

● गौतम बुद्धानी आपला अनुयायी नंदाला म्हटले, ''हे नंदा! या जगात मी प्रथम बुद्ध नाही आणि अंतिमही नाही. आगामी काळात या जगात आणखी एक बुद्ध येईल, जो सत्य आणि परोपकाराचे मार्गदर्शन करील. शुद्ध आणि पवित्र शिकवण देईल. त्याचे मन निर्मळ असेल. तो ज्ञानी असेल. तो लोकांचे नेतृत्व करील आणि सर्व लोक त्याच्याकडून मार्गदर्शन घेतील. तो सत्य शिकवील. तो जगाला जीवनाचा खरा मार्ग देईल, जो शुद्ध आणि पूर्ण असेल. हे नंदा, त्याचे नाव मैत्रेय असेल.'' (Gospel of Buddha by carus Page 217)

● जर गौतम बुद्ध प्रथम आणि अंतिम बुद्ध नाहीत तर आपण त्यांच्यापूर्वी आणि त्यांच्यानंतर येणाऱ्या एखाद्या बुद्धाचे नाव सांगू शकता काय?

नाही?

का नाही?

आपण या प्रश्नाचे उत्तर यासाठी देऊ शकत नाही कारण तुम्ही प्रथम आणि अंतिम बुद्धाला केवळ बौद्ध धर्मातच शोधाल.

● बुद्धचा भावार्थ आहे Enlightened Person अथवा अशी व्यक्ती जिला ईश्वराने मानवकल्याणासाठी ज्ञान दिले असेल.

आता या दृष्टिकोनासह जर आपण जगात प्रथम अथवा नंतर येणाऱ्या बुद्धाचा शोध घ्याल तर आपणास अनेक बुद्ध प्रत्येक प्रांत व प्रत्येक धर्मात आढळतील.

● ऋग्वेदात म्हटले आहे की;

*अदब्धानि वरुणस्य व्रतानि*

ईश्वराचे विधान बदलत नाही.
(ऋग्वेद ०१-२४-९०)

● अथर्ववेदमध्ये म्हटले आहे;

*न किरस्य प्रभिनन्ति व्रतानि*

ईश्वराचे नियम कोणीही बदलू शकत नाही.
(अथर्ववेद १८-०१-०५)

● हा ईश्वराचा नियम आहे की तो मानवजातीच्या मार्गदर्शन आणि धर्मस्थापनेसाठी वेळोवेळी बुद्धाला (Enlightened Person) पाठवित असतो. आणि ईश्वराचे नियम बदलत नाहीत. अन्य धर्माच्या लोकांसाठी बुद्ध आणि पैगंबर पाठवायचे आणि भारतवासियांसाठी कधी मनु तर कधी स्वत: जन्म घेऊन यायचे असे ईश्वर कधीच करीत नाही. तो संपूर्ण विश्वात केवळ आपले प्रतिनिधीच पाठवितो. ज्यांना आपण अवतार (ईश्वराद्वारे पाठविलेला) देखील म्हणतो.

● आणि हेच मत विद्वान आणि ज्ञानीजनांचे आहे. जसे, स्वामी विवेकानंद, गुरूनानकजी आणि हिंदू धर्माचे महान विद्वान पंडित सुंदरलाल, श्री. बलराम सिंग परिहार, डॉ. वेदप्रकाश उपाध्याय, डॉ. पी. एच. चौबे, डॉ. रमेश प्रसाद गर्ग, पंडित दुर्गाशंकर सत्यार्थी, श्री. केशरी लाल भगत इत्यादी.

● गौतम बुद्धांनी सत्य म्हटले आहे की, मी एकमेव बुद्ध नाही, माझ्यापूर्वीदेखील बुद्ध आलेत आणि माझ्यानंतरदेखील येतील. हे धर्माची स्थापना करणारे ईश्वराचे प्रतिनिधीच असतात; ज्यांना आम्ही अवतार, बुद्ध, मनु, नबी, रसूल किंवा प्रॉफेट म्हणतो आणि ईश्वर मानवजातीशी आपल्या प्रतिनिधीद्वारा अथवा अवतरित ग्रंथांद्वाराच संभाषण करतो. सध्या आपण जी भगवद्‌गीता वाचत आहोत हेदेखील ईश्वराने पाठविलेले संभाषण (Communication) आहे. बायबल आणि कुरआन हादेखील वेगवेगळ्या युगांमध्ये पाठविण्यात आलेला ईश्वराचा आदेशच (Communication) आहे.

● जे धरतीवर धर्माची स्थापना करतात ते ईश्वर नसून ईश्वराचे प्रतिनिधी असतात आणि मानवजातीपैकीच असतात. जे कधी धर्माची पुनर्स्थापना करण्यात सफल होतात आणि कधी असफल होतात. जर ईश्वर मानवजातीच्या सुधारणेसाठी येत असता तर तो कधी विफल झाला नसता. कारण ईश्वर कधी विफल होऊच शकत नाही.

● श्वेतास्वत्र उपनिषदमध्येसुद्धा म्हटले आहे की,

''न चास्य कश्चिज्जनिता न चधिप:''

भावार्थ :- ''ईश्वराचे माता-पिता आहेत आणि न त्याचा कोणी स्वामी आहे.''
(श्वेतास्वत्र उपनिषद ६:९)

● आमचा ईश्वर एक आहे. आम्ही सर्व प्रथम मानव (आदम) ची संतती आहोत. आम्हा सर्वांच्या धर्मागुरूंना एकाच ईश्वराने पाठविले आहे. तर मग आम्ही सर्व जण आपसांत एकमेकांशी इतकी घृणा (द्वेष) का करतो?

*********

# ९. श्रीकृष्णजी कोण आहेत?

**श्रीकृष्णजी कोण आहेत?**

१) श्रीकृष्णजींनी अर्जुनाला म्हटले;

● *अविनाशी विद्यते भावो नाभावो विद्यते सतः। विनाशमव्ययस्यास न कश्चित्कर्तुमर्हति।। २-१७।।*

● *अविनाशी तु तत् विद्धि येन सर्वम् इदम् ततम। विनाशम् अव्ययस्य अस्य न कश्चित कर्तुम अर्हति।।*

● (तु) परंतु, (तत्) (तू) त्याला (ईश्वराला), (अविनाशी) अविनाशी, (विद्धि) समज, (येन) ज्याद्वारे, (इदम्) या, (सर्वम) सर्व (विश्वाचा), (ततम्) विस्तार झाला आहे, (अस्य) त्या, (अव्ययष्य) अविनाशी (ईश्वराचा), (विनाशम्) विनाश, (कर्तुम) करण्याची, (अर्हति) शक्ती, (कश्चित) इतर कुणातही, (न) नाही.

● परंतु (तू) त्याला (ईश्वराला) अविनाशी समज ज्याद्वारे या सर्व (विश्वाचा) विस्तार झाला आहे त्या अविनाशी (ईश्वराचा) विनाश करण्याची शक्ती इतर कुणातही नाही. (२:१७)

● हा श्लोक ही वास्तविकता (Fact) स्पष्ट करतो की ईश्वर एक वेगळे अस्तित्व (Entity) आहे आणि श्रीकृष्णजी एक वेगळे अस्तित्व आहेत. आणि श्रीकृष्णजी ईश्वराच्या महानतेचे वर्णन करीत आहेत.

२) अर्जुनाने श्रीकृष्णद्वारा ईश्वराला विचारले :

*कस्माच्च ते न नमेरन्महात्मन्*
*गरीयसे ब्रह्मणों ऽप्यादिकर्त्रे।*

*अनन्त देवेश जगन्निवास*
*त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ।।११-३७।।*

● *कस्मात् च ते न नेमरन् महा-आत्मन्*
*गरीयसे ब्रम्हणः अपि आदि-कर्त्रे।*

*अनन्त देव-ईश जगत-निवास त्वम्*
*अक्षरम् सत्-असत् तत्-परम् यत् ।।*

● (गरीयसे) हे अपेक्षेहूनही महान, (अनन्त) असीम प्रकृतीवाल्या ईश्वरा! (ब्रम्हणः) ब्रम्हदेवा (अपि) च्याही (आदि) पूर्वीच्या (कर्त्रे) निर्माता (देव) हे देवांच्या (ईश) ईश्वरा, (जगत्) ब्रह्मांडाला (निवास) आधार वा ठिकाणा देणाऱ्या, (यत्) कारण (त्वम्) तू अथवा तुम्ही (सत्) स्थित न राहणारे विश्व (तत्) आणि त्या (असत्) स्थित राहणारे अन्य लोक (परम) (च्या) च्या पलीकडे जे काही आहे त्यांच्याही (अक्षरम्) अविनाशी निर्मात्या! (कस्मात्) मग (का) (ते) तुम्हाला (महा) महान (आत्मन्) पुरुष म्हणजे कृष्णाने (च) देखील (नमेरन) नमस्कार (न) करू नये।

● (१) ‘‘हे अपेक्षेहूनही महान, (२) हे असीम प्रकृतीवाल्या ईश्वरा! (३) (आपण निर्माणकार्याची देखरेख करणाऱ्या देवता!) ब्रम्हदेवाच्याही पूर्वीच्या निर्माता आहात. हे देवेशा!, आपण ब्रह्मांडाला आधार वा ठिकाणा देणारे आहात, कारण आपण स्थित न

राहणारे विश्व आणि त्या स्थित राहणारे अन्य लोका (परलोका) (च्या) पलीकडे जे काही आहे त्यांच्याही अविनाशी निर्माता आहात. तर मग आपणास महान पुरुष (म्हणजे कृष्णाने)देखील नमस्कार का करू नये?'' (११:३७)

● या श्लोकाने प्रमाणित होते की ईश्वर एक वेगळे व महान अस्तित्व (Entity) आहे, ही गोष्ट अर्जुनालादेखील चांगल्या प्रकारे माहीत होती आणि एक महान पुरुष श्रीकृष्णजींनीदेखील महान ईश्वराला नमस्कार (प्रार्थना) केला पाहिजे.

*३) बहुना जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।*
*वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।।७-१९ ।।*

● *बहूनाम् जन्मनाम् अन्ते ज्ञान-वान् माम् प्रपद्यते ।*
*वासुदेवः सर्वम् इति सः महा-आत्मा सुदुर्लभ ।।*

● (इति) अशा प्रकारे, (अन्ते) मृत्यूपर्यंत, (सर्वम्) सर्व कर्मांचा, (माम्) (केवल) माझ्या, (प्रपघते) आश्रयाने करणाऱ्या, (वासुदेव) वासुदेवा (श्रीकृष्णजी), (सः) सारखा, (महाआत्मा) महान मनुष्य, (बहुनाम) अनेक, (जन्मनाम) जन्माला येणारे मनुष्य आणि, (ज्ञानदान) ज्ञानीजनांपैकी, (सु-दुर्लभ) (एखादा महात्मा) अत्यंत दुर्लभ आहे.

● अशा प्रकारे मृत्यूपर्यंत सर्व कर्मांचा (केवल) माझ्या आश्रयाने करणाऱ्या वासुदेवा (श्रीकृष्णजी) सारखा महात्मा अनेक जन्माला येणारे मनुष्य आणि ज्ञानीजनांपैकी (एखादा) अत्यंत दुर्लभ आहे. (७:१९)

● या श्लोकामध्ये ईश्वराने श्रीकृष्णजींची एक महात्मा समजून प्रशंसा केली आहे. म्हणजे श्रीकृष्णजीदेखील मानवच आहेत. मात्र एक महान मानव (महात्मा).

४) संजय धृतराष्ट्रला म्हणाला;

● *इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।*
*संवादमिमश्रौषमभ्दुतं रोमहर्षणम् ।।१८-७४ ।।*

● *इति अहम् वासुदेवस्य पार्थस्य च महाआत्मनः ।*
*संवादम् इमम् अश्रौषम् अभ्दुतम् रोम-हर्षणम् ।।*

● (च) आणि (इति) अशा प्रकारे (अहम्) मी (महा) महान (आत्मनः) मनुष्य (वासुदेवस्य) वासुदेव (कृष्णाचा) (पार्थस्य) पार्थचा (अर्जुनाचा) (अभ्दुतम्) आश्चर्यकारक (रोम) व (हर्षणम्) रोमांचकारी (इमम्) हा (संवादम्) संवाद (अश्रौषम्) ऐकला.

● आणि अशा प्रकारे मी महात्मा वासुदेवा (कृष्णा)चा आणि पार्थ (अर्जुना)चा हा आश्चर्यकारक व रोमांचकारी संवाद ऐकला. (१८:७४)

५) संजय धृतराष्ट्राला म्हणाला;

● *यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।*
*तज्ञ श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।१८-७८ ।।*

● *यत्र योग-ईश्वरः कृष्णः यत्र पार्थः धनुः धरः ।*
*तत्र श्रीः विजयः भूतिः ध्रुवा नीतिः मतिः मम ।।*

● (यत्र) जेथे (ईश्वरः) ईश्वराशी (योग) संपर्क ठेवणारा (कृष्णः) कृष्ण आहे आणि (यत्र) जेथे (धनुः) धनुष्य (धरः) बाळगणारा

(पार्थः) अर्जुन, (तत्र) तेथे (श्रीः) संपूर्ण सुख व शांती, (विजयः) विजय, (भूतिः) उत्तम भाग्य, (नीतिः) योग्य नीती आणि (ध्रुवा) धैर्य असे (मम) माझे (मति) मत आहे.

● जेथे ईश्वराशी संपर्क ठेवणारा कृष्ण आहे आणि जेथे धनुष्य बाळगणारा अर्जुन तेथे संपूर्ण सुख व शांती, विजय, उत्तम भाग्य, योग्य नीती आणि धैर्य असे माझे मत आहे. (१८:७८)

● वर सांगण्यात आलेल्या दोन्ही श्लोकांपैकी एका श्लोकात स्वत: संजय, ज्याने संपूर्ण महाभारत आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे, श्रीकृष्णजींना महात्मा (महान मानव) आणि दुसऱ्या श्लोकात ईश्वराशी संपर्क ठेवणारा म्हणत आहे.

● श्रीकृष्णजी श्री विष्णु पुराणात म्हणतात;

*नाह देवो न गन्धर्वो न यक्षो न च दानवः ।*
*अहं वो बान्धवों जातीनैताच्चिन्त्यमितोहन्यथ ।*

(श्री विष्णु पुराण ५/२३/१२)

अनुवाद : मी न देव आहे न गंधर्व, न यक्ष आहे आणि न दानव. मी तुमच्या बंधू (मित्र) स्वरूपापासूनच निर्माण झालो आहे. तुम्ही याविषयी आणखीन काहीही विचार करू नका.

**सारांश :-**

● वरील सर्व श्लोक वाचल्यानंतर जी गोष्ट स्पष्ट होते ती अशा प्रकारे आहे;

१. श्लोक क्र. २:१७ व ११:३७ नुसार,

ईश्वर महान आहे, ज्याने ब्रह्मांडाची निर्मिती केली आहे.

२. श्लोक क्र. ७:११ नुसार,

श्रीकृष्णजी असे महान पुरुष होते ज्यांची प्रशंसा ईश्वराने केली आहे.

३. श्लोक क्र. १८:७८ के नुसार,

श्रीकृष्णजींनी ईश्वराशी संपर्क ठेवला होता.

४. श्लोक क्र. ७:११ व १८:७८ नुसार,

श्रीकृष्णजी ईश्वराच्या आदेशानुसार कर्म करणारे आणि समाजात धर्म व शांती स्थापित करणारे होते.

*********

# १०. श्रीरामचंद्रजी कोण आहेत?

● भगवद्गीताचा एक श्लोक अशा प्रकारे आहे;

श्रीकृष्णजी म्हणाले, (हे अर्जुना) परंतु वास्तव (Fact) तर हे आहे की कोणतेही असे युग असे झाले नाही की ज्यात मी नव्हतो, तू नव्हतास आणि मानवांवर अत्याचार करणारे ते (दुष्ट लोक) नव्हते. आणि (नि:संदेह) पुढे वर्तमानातही यापुढेदेखील असे घडणार नाही जेव्हा आम्ही सर्व असणार नाही. (२: १२)

● श्रीकृष्णजींनी द्वापर युगात जन्म घेतला. त्यांनी त्या युगात दुष्ट शक्तींशी युद्ध केले आणि त्यांना पराभूत केले. आणि समाजात धर्म व शांतीची स्थापना केली.

● श्रीकृष्णजींच्या पूर्वी श्रीरामचंद्रजींनी त्रेता युगात जन्म घेतला. द्वापर युगात श्रीकृष्णजी ज्या स्थितीत होते आणि समाजासाठी जी जबाबदारी त्यांच्यावर होती, त्याच स्थितीत श्रीरामचंद्रजी त्रेता युगात होते आणि तेथे मानवतेच्या मार्गदर्शनाची जबाबदारी त्यांच्यावर होती.

● श्रीकृष्णजींच्या युगात दुर्योधन अधर्माचे प्रतीक होता, तर श्रीरामचंद्रजींच्या युगात रावण अधर्माचे प्रतीक होता. आणि जसे सदैव सत्याचा विजय होतो तसे सैनिक बळ कमी असूनसुद्धा रामचंद्रजींचा विजय झाला.

● मी रामायण पाहिले आहे, म्हणून मी त्यांच्या जीवनाशी परिचित आहे. मात्र जसे भगवद्गीतामधून श्रीकृष्णजींचे उपदेश कळतात, तद्वत श्रीरामचंद्रजींच्या कोणत्याही उपदेशांचे पुस्तक माझ्या वाचनात आलेले नाही. आणि रामचंद्रजींच्या बाबतीत वेदांमध्ये काहीही लिहिलेले नाही, म्हणून जे काही मला माहीत आहे ते अशा प्रकारे आहे. श्रीरामचंद्रजी राजा दशरथ यांचे आदर्श पुत्र होते. त्यांनी आपल्या माता-पित्याचे नेहमी आज्ञापालन केले. ते एक आदर्श बंधूदेखील होते. त्यांनी आपल्या भावंडांकडे स्वत:पेक्षाही अधिक लक्ष दिले. श्रीरामचंद्रजी एक आदर्श पती आणि एक आदर्श राजादेखील होते. म्हणून त्यांना आदर्श पुरुष म्हटले जाते. माझ्या अंदाजानुसार, जे काही आम्ही श्रीकृष्णजींच्या बाबतीत मागील अध्यायात वाचले ते सर्व रामचंद्रजींच्या बाबतीतसुद्धा असेल.

● श्रीरामचंद्रजींचे दोन उपदेश मला माहीत आहेत. त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की भले ही सर्व हिंदू बांधव श्रीरामचंद्रजींना ईश्वर मानत असले तरी खुद्द श्रीरामचंद्रजींनी स्वत:ला ईश्वर म्हटलेले नसून त्यांनीदेखील एक निराकार ईश्वराची प्रार्थना करण्याची शिकवण दिली होती. ते दोन उपदेश अशा प्रकारे आहेत;

१) १४ वर्षांच्या वनवासात हनुमानजींनी श्रीरामचंद्रजींना विचारले की मी ईश्वराची प्रार्थना कशी करू? तेव्हा श्रीरामचंद्रजी म्हणाले;

● *प्रथम: ताराक: चयवादितिय दंड मुच्यते तीतय कुंडला कारमचतुर्थ अर्धे चन्द्रक: पंच बिल्दु संयुक्त ओउ्म मित्यज्योती रुपका।*

*(श्री रामतत्वामृत)*

● अर्थात :- सर्वप्रथम सरळ उभे राहा. मग दंडवत (सजदा) करा, मग सरळ बसा. मग अर्धचंद्रासारखे पुढे झुका. मग सरळ बसा आणि ईश्वराच्या स्मरणार्थ ध्यानस्थ व्हा. (म्हणजे एक निराकार ईश्वराची प्रार्थना करा.)

● हा श्लोक लक्षपूर्वक वाचा. चौदा वर्षांच्या वनवासात जेव्हा हनुमानजींनी श्रीरामचंद्रजींना विचारले की, मी ईश्वराची प्रार्थना कशी करू? तेव्हा श्रीरामचंद्रजींनी असे उत्तर दिले नाही की तुम्ही स्वत: ईश्वर आहात, कारण भविष्यात लोक तुमची पूजा करतील. त्यांनी असेही म्हटले नाही की, तुम्ही माझी प्रार्थना करा, कारण मीदेखील ईश्वर आहे. याऐवजी श्रीरामचंद्रजींनी एक निराकार ईश्वराची प्रार्थना करण्याची पद्धत शिकविली.

२) श्रीरामचंद्रजींनी आपल्या अनुयायींना एक मंत्र सांगितला होता, त्यास श्रीरामचंद्रजींचा उद्धार करणारा मंत्र किंवा मुक्ती देवविणारा मंत्र किंवा 'तारक मंत्र' म्हणतात. तो मंत्र पुढीलप्रमाणे आहे;

''रां रामयनम'' ''तारक मन्त्र'' (नालन्दा विशाल सागर पं. ११७५)

'रां'ला राम असे वाचतात. कारण वर दिलेला अनुस्वार 'मां'च्या स्वरात वाचला जातो. या मंत्राचा अर्थ आहे की, ''रामा (श्रीरामचंद्रजीं) च्या रामा (ईश्वरा) ची प्रार्थना करा.''

● या राम तारक मंत्रात श्रीरामचंद्रजीं यांच्याबरोबर ईश्वरालादेखील राम म्हटले आहे. अशा प्रकारे ऋग्वेदातील श्लोकात एक पैगंबर अथवा ऋषीलासुद्धा राम म्हटले आहे. नालंदा विशाल शब्द सागर (शब्दकोश) मध्ये रामचा अर्थ ईश्वरदेखील आहे. म्हणून मला असे वाटते की राम (शब्द) हे ईश्वराचे त्याच्या स्वभावानुसार नाव आहे.

● ऋग्वेदाच्या पुढील श्लोकामध्ये एक पैगंबर अथवा ऋषीला राम म्हटले आहे;

प्र तद् दुशीमें पृथवाने वेने प्र रामे वोचमसुरे मघवत्सु। (ऋग्वेद १४-९३-१०)

संस्कृत शब्दांचे अर्थ पुढीलप्रमाणे आहेत.

प्रतद् : तो, त्या (३)

दुशीमे : अजिंक्य (३)

पृथवाने : पृथ्वीचे वन

वेन : धरतीचे केंद्र (Center of earth) (२)

प्र राम : विदेशी राम किंवा परलोकातील राम, दैविक राम

प्रवोचम : वर्णन करू, म्हणू (३)

सुर : ऋषी (१)

मघ : एका विभागाचे नाव जेथे आर्येतर (मलिच्छ) राहात होते. (१)

(मख) मक्का

वत्सु : पुत्र, सपूत (१)

या मंत्राचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे;

(मी) त्या अजिंक्य ऋषी, धरतीचे केंद्र, मक्केचा सपूत (दैविक अथवा) विदेशी रामाचे वर्णन करू.

(या मंत्राच्या स्पष्टीकरणासाठी तीन शब्दकोशांचे साहाय्य घेण्यात आले आहे. त्यांचे क्रमांक शब्दाच्या अर्थापुढे लिहिलेले आहेत.

(१) नालन्दा विशाल शब्द सागर

(२) सर मोनियर संस्कृत-इंग्लिश डिक्शनरी

(३) वेदों का आर्य समाज की व्याख्या।)

ऋग्वेदातील निम्नलिखित श्लोकामध्ये धरतीचे केंद्रावर 'मख' म्हटले गेले आहे. म्हणून या श्लोकात धरतीच्या केंद्राला मक्का समजण्यात आले आहे.

● श्रीरामचन्द्रजी कधीही अरब देशांमध्ये गेले नाहीत. म्हणून या मंत्रामध्ये त्यांचे वर्णन नाही. आणि 'राम' शब्दाचा प्रयोग ईश्वरासाठी करण्यात आलेला नाही. म्हणून येथे 'राम' या नावाने एखाद्या ऋषी वा पैगंबराला उद्देशून म्हटले गेले आहे.

● अयोद्धेचा राजा, राजा दशरथ यांना या 'राम' नावाचा अर्थ माहीत होता. म्हणून त्यांनी आपल्या थोरल्या पुत्राचे नाव 'राम' ठेवले नाही, तर 'रामचंद्र' ठेवले अर्थात 'रामाचा चंद्र' (अथवा रामाचा प्रिय किंवा ईश्वराचा प्रिय).

(आपल्या प्रियजनांना लोक आदराने 'चंद्र' म्हणतात.)

श्रीरामचंद्रजींचे नाव फक्त राम नसून श्रीरामचंद्रजी होते. आणि 'तारक मंत्र'मध्ये श्रीरामचंद्रजींनी त्याच रामाची (ईश्वराची) प्रार्थना करण्यास सांगितले आहे, ज्याचे ते प्रिय होते.

● मंदिरांमध्ये सकाळी सर्वप्रथम जो मंत्रोच्चार केला जातो त्यास 'सुप्रभात मंत्र' म्हणतात. तो पुढीलप्रमाणे आहे;

*कौसल्यासुप्रजा राम पूरवा संध् या प्रवर्तते।*
*उत्तष्ठि नरशार् दूल कर्त्तव्यं दैवमाह्नकिम् ।।*

*(वाल्मिकी रामायण अध्याय नं २४,*
*बाला कन्द १-२३-२)*

भावार्थ:- हे राम! कौशल्याचे पवित्र पुत्र. पूर्वेकडील आकाशात सकाळचा उजेड पसरत आहे. हे पुरुषोत्तम उठा (जागे व्हा). ईश्वराच्या प्रार्थनेसाठी.

श्रीरामचंद्रजींच्या बालपणात ज्या ईश्वराच्या प्रार्थनेसाठी सकाळी उठविले जायचे. प्रत्येक दिवशी त्याच ईश्वराची आम्हीदेखील प्रार्थना केली पाहिजे.

**नावाचे रहस्य :-**

● ऋग्वेदाचा एक श्लोक असा आहे;

● *एकं सद्विपा बहुधा वदन्त्यग्नि यमं मातरिश्वानमाहुः । (ऋग्वेद ११:१६४:४६)*

● तोच अग्नि, यम आणि मातरिश्वा आहे, त्या एक ब्रह्मदेवाला विद्वान लोक अनेक नावांनी बोलवितात.

● एक ईश्वराचे अनेक नावे आहेत. यात ईश्वराच्या निर्माता, पालनकर्ता, इत्यादींसारख्या गुणांशी संबंधित काही विशेष नावे आहेत. अशी नावे ईश्वराव्यतिरिक्त इतर कुणाचीही असू शकत नाहीत.

परंतु ईश्वराची काही नावे त्याच्या स्वभावानुसार आहेत. जसे- कृपाळू, दयाळू इत्यादी. आपल्या स्वाभाविक नावाने ईश्वर कधी कधी महापुरुषांनादेखील संबोधित करतो, ज्यात तो स्वभाव वा गुण असेल.

● 'अग्नी' हे ईश्वराचे नाव आहे. ऋग्वेदाचा पहिला श्लोक असा आहे;

''सर्व प्रशंसा व प्रार्थना अग्नीसाठी आहे.'' (ऋग्वेद १:१:१)

● ईश्वराने ऋग्वेदात अनेकदा एका महापुरुषालादेखील 'अग्नी' नावाने

संबोधित केले आहे. जसे-

● ''आम्ही अग्नीला दूत निवडले आहे.''(ऋग्वेद १-१२-१)

● ''ईश्वराची प्रार्थना करणाऱ्यांवर प्रसन्न होणारे मनुष्य अग्नी आहेत.'' (ऋग्वेद १-३१-१५)

● अशा प्रकारे ब्रह्मा हे ईश्वराचे नाव आहे. मात्र ईश्वराने या नावाने 'अबी राम' (माननीय इब्राहीम अ.) यांनादेखील संबोधित केले आहे. अथर्ववेदमध्ये पुरुषमेधाच्या आठ मंत्रांमध्ये 'अबी राम'ला ब्रह्मा म्हटले गेले आहे. (अथर्ववेद १०-२-२६ ते ३३)

● मुस्लिमांच्या धर्मगुरूचे नाव आदरणीय मुहम्मद (स.) आहे हे सर्वश्रुत आहे. ईश्वरानेदेखील या नावाने कुरआनमध्ये त्यांना संबोधित केले आहे. (उदा. सूरह क्र. ४७ आयत क्र. २)

मात्र याच कुरआनात ईश्वराने आपल्या नावानेदेखील आदरणीय मुहम्मद (स.) यांना संबोधित केले आहे. सूरह क्र. ९ ची आयत क्र. १२८ मध्ये ईश्वराने आदरणीय मुहम्मद (स.) यांना 'रऊफ' (कृपाळू) व 'रहीम' (दयाळू) म्हटले आहे. परंतु दोन्ही आदरणीय मुहम्मद (स.) यांची नावे नाहीत. कुणीही त्यांच्या हयातीत त्यांना या नावांनी बोलविले आहे. मात्र कुरआनमध्ये ईश्वराने आपल्या या नावांनी त्यांचा उल्लेख केला आहे. कारण आदरणीय मुहम्मद (स.) अत्यंत दया करणारे आणि क्षमा करणारे होते.

लक्षात असू द्या की धर्मग्रंथांमध्ये ईश्वराची नावे ऋषी, महापुरुष व पैगंबरांसाठीसुद्धा वापरली जातात. आणि हे पठण करणाऱ्यांनी लक्षात ठेवणे आणि समजून घेतले पाहिजे की कुठे त्या नावाचा अर्थ ईश्वर आहे आणि कुठे महापुरुष अथवा पैगंबर आहे.

ऋग्वेदातील श्लोक क्र. १४-९३-१० मध्ये एका पैगंबरासाठी 'राम' नावाचा प्रयोग करण्यात आला आहे. आणि 'तारक मंत्रा'त एकेठिकाणी 'राम' हे नाव श्रीरामचंद्रजींसाठी वापरण्यात आले आहे आणि दुसऱ्या ठिकाणी 'राम' नावाचा प्रयोग 'ईश्वरा'साठी करण्यात आला आहे. नालन्दा विशाल शब्द सागर (डिक्शनरी)मध्ये 'राम' या शब्दाचा अर्थ श्रीरामचंद्रजींच्या नावाबरोबरच ईश्वराचे नावदेखील असल्याचे म्हटले आहे. म्हणून अनेक श्लोकांमध्ये राम नावाचा अर्थ आपण श्रीरामचंद्रजी घेतो तर राम हे नाव ईश्वरासाठीदेखील असू शकते.

भगवद्‌गीताचा एक श्लोक असा आहे;

(संजय धृतराष्ट्राला म्हणाला,) ''जेथे ईश्वराशी संपर्क ठेवणारा कृष्ण आहे आणि जेथे धनुष्य बाळगणारा अर्जुन तेथे संपूर्ण सुख व शांती, विजय, उत्तम भाग्य, योग्य नीती आणि धैर्य असे माझे मत आहे.'' (१८:७८)

जे पद श्रीकृष्णजींचे आहे तेच पद श्रीरामचंद्रजींचेदेखील आहे. जसा श्रीकृष्णजींचा ईश्वराशी संपर्क होता तसा श्रीरामचंद्रजींचासुद्धा ईश्वराशी संपर्क होता. ते ईश्वराचे आदेश मानवजातीला सांगत होते. ते एक आदर्श पुरुष होते. म्हणून जो समाज त्यांच्या आदेशांचे व उपदेशांचे अनुसरण करील त्या समाजातदेखील सुख, शांती आणि उन्नती होईल. अथवा त्या समाजात रामराज्य असेल.

*******

# ११. देवता कोण आहेत?

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● *कामैस्तैस्तैर्हृतज्ञाना: प्रपद्यन्ते ऽन्यदेवता: । तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियता: स्वया ।।७-२० ।।*

● *कामै: तै: तै: हृत ज्ञाना: प्रपद्यन्ते अन्य देवता: । तम् तम् नियमम् आस्थाय प्रकृत्या नियता: स्वया ।।२० ।।*

(कामै:) वासनांच्या अभिलाषेमुळे (ज्ञाना:) (अनेक लोक) ईशज्ञानापासून, (हृत) भरकटतात, (प्रकृत्या) आणि मग ईश्वरी प्रकृती (ला), (नियता:) वर ताबा मिळवून अथवा नियंत्रित करून, (अन्य) (आपल्या वेगवेगळ्या इच्छा पूर्ण करण्यासाठी एक ईश्वराऐवजी) दुसऱ्या, (तै:) ज्या, (तै:) ज्या, (देवता:) देवतांचा, (प्रपद्यन्ते) आसरा घेतात, (तम्) त्या, (तम्) त्या (देवतांचे), (स्वया) स्वत:हून, (नियमम्) नियम बनवून, (आस्थाय) (त्यांचे) पालन करू लागतात. (७:२०)

१. वासनां (हव्या तशा जीवनशैली) च्या अभिलाषेमुळे (अनेक लोक) ईशज्ञानापासून भरकटतात आणि मग ईश्वरी प्रकृती (ला) वर ताबा मिळवून अथवा नियंत्रित करून (आपल्या वेगवेगळ्या इच्छा पूर्ण करण्यासाठी एक ईश्वराऐवजी) दुसऱ्या ज्या ज्या देवतांचा आसरा घेतात त्या त्या (देवतांचे) स्वत:हून नियम बनवून (त्यांचे) पालन करू लागतात. (७:२०)

● *यो यो यां तनुं भक्त: श्रद्धया अर्चितुम् इच्छति । तस्य तस्य अचलाम् श्रद्धाम् ताम् एव विदधामि अहम् ।।७-२१ ।।*

● *य: य: याम् याम् तनुम् भक्त: श्रद्धया अर्चितुम् इच्छति । तस्य तस्य अचलाम् श्रद्धाम् ताम् एव विदधामि अहम् ।।२१ ।।*

(य:) जो (य:) जो, (भक्त:) भक्त, (याम्) ज्या, (याम्) ज्या, (तनुम्) निर्मित वस्तू वा देवतेवर, (श्रद्धया) श्रद्धा ठेवून, (अर्चितुम) त्याच्या उपासनेची (इच्छति) इच्छा बाळगतो, (अहम्) मी, (ताम्) त्याच्या, (तस्य) त्या, (तस्य) त्या (इच्छेनुसार, (एवं) (त्या निर्मित वस्तू वा देवतेवर) च, (श्रद्धाम्) त्याच्या श्रद्धेला, (अचलाम्) आणखी दृढ (विद्धामी) करतो. (७:२१)

२. जो भक्त ज्या निर्मित वस्तू (ईश्वराने बनविलेला निसर्ग वा जीव वा देवते) वर श्रद्धा ठेवून त्याच्या उपासनेची इच्छा बाळगतो, मी त्याच्या त्या (इच्छेनुसार) त्या (निर्मित वस्तू वा देवते) वरच त्याच्या श्रद्धेला आणखी दृढ करतो. (७:२१)

● *स तया श्रद्धया युक्तस्तस्या राधनमीहते । लभते च तत: कामान्मयैव विहितान्हि तान् ।।७-२२ ।।*

● *स: तया श्रद्धया युक्त: तस्य आराधनम् ईहते । लभते च तत: कामान् मया एव विहितान् हि तान् ।।२२ ।।*

(स:) तो (तस्य) त्या (निर्मित वस्तू) वर, (श्रद्धया) श्रद्धा ठेवून, (तया) त्यात, (युक्त:) आपले विचार आणि बुद्धीने,

(आराधनम्) (त्या निर्मित वस्तूची) उपासना सुरू करून, (ईहते) तिच्याकडून (आपल्या इच्छा पूर्ण करण्याची) अपेक्षा करतो, (हि) तेव्हा नि:संदेह (लभते) (निर्मित वस्तू वा देवतेकडे मागितलेले फळ) प्राप्त करून घेतो, (च) मात्र, (एवं) सत्य असे आहे की, (ततः) त्या (निर्मित वस्तू वा देवते) कडे, (कामान्) मागितलेले फळ, (मया) माझ्याकडूनच, (तान्) त्याला, (विहितान्) दिले जाते. (७:२२)

३. तो त्या (निर्मित वस्तू) वर श्रद्धा ठेवून त्यात आपले विचार आणि बुद्धीने (त्या निर्मित वस्तूची) उपासना सुरू करून तिच्याकडून (आपल्या इच्छा पूर्ण करण्याची) अपेक्षा करतो तेव्हा नि:संदेह (निर्मित वस्तू वा देवतेकडे मागितलेले फळ) प्राप्त करून घेतो, मात्र सत्य असे आहे की त्या (निर्मित वस्तू वा देवते) कडे मागितलेले फळ माझ्याकडूनच त्याला दिले जाते. (७:२२)

● *अन्तवत्तु फलं तेषां तभ्दवत्यल्पमेधसाम्। देवान्देवयजो यान्ति मभ्दक्ता यान्ति मामपि।।७-२३।।*

● *अन्त-वत् तु फलम् तेषाम् तत् भवति अल्प-मेधसाम्। देवान् देव-यजः यान्ति मत् भक्ताः यान्ति माम् अपि ।।२३।।*

(तु) परंतु (अपि) हेदेखील खरे आहे की, (देव- यजः) देवतांच्या प्रसन्नतेचे कर्म करून त्यांची उपासना करणारे, (देवान्) (मृत्यूनंतर) देवतांकडे, (यान्ति) जातील आणि, (तत्) या, (अल्प) अल्प, (मेधसाम्) बुद्धिधारक लोकांचे (फलम्) फळ, (तेषाम्) त्यांचा, (अन्त-वत) विनाश, (भवति) होईल, (मत) (आणि) माझी, (भक्ताः) उपासना करणारे, (माम्) (मृत्यूनंतर) माझ्याकडे, (अपि) च, (यान्ति) येतील. (७:२३)

४. परंतु हेदेखील खरे आहे की, देवतांच्या प्रसन्नतेचे कर्म करून त्यांची उपासना करणारे (मृत्यूनंतर) देवतांकडे जातील आणि या अल्पबुद्धी लोकांचे फळ त्यांचा विनाश होईल आणि माझी उपासना करणारे (मृत्यूनंतर) माझ्याकडेच येतील. (७:२३)

● *त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्रा स्वर्गतिं प्रार्थयन्ते। ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकम् अश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान्।।९-२०।।*

● *त्रै विद्याः माम् सोम-पाः पूत पापाः यज्ञैः इष्ट्वा स्व-गतिम् प्रार्थयन्ते। पुण्यम् आसाद्य सुर-इन्द्र लोकम् अश्नन्ति दिव्यान् दिवि देव-भोगान् ।।२०।।*

(त्रै) (जे लोक) तिन्ही (विद्याः) वेदांमध्ये (सांगितलेल्या), (सोम) स्वर्गात (मिळणारे) सोमपान (जामे कौसर), (पाः) पिण्यासाठी, (स्वः) आणि स्वर्गाचे, (गतिम) लक्ष्य गाठण्यासाठी, (प्रार्थयन्ते) प्रार्थना करतात, (पापः) ते लोक (जगातील) पापांपासून (पूत) पवित्र होऊन, (यज्ञैः) सत्कर्म करून, (माम्) (केवल) माझी, (इष्ट्वा) उपासना करून, (पुण्यम्) आणि मग कर्माच्या फळस्वरूप (आसाद्य), (दिवि) स्वर्गात, (सुर) देवतां (देवदूतां) च्या, (लोकम्) लोकात, (इन्द्र)

राजांसारखे, (देव) देवतांद्वारा, (भोगान्) देण्यात आलेल्या भोगांपासून, (दिव्यान) दिव्य, (अश्नान्ति) आनंद घेतात. (९:२०)

५. (जे लोक) तिन्ही वेदांमध्ये स्वर्गात (मिळणारे) सोमरस (अमृतप्याला) पिण्यासाठी आणि स्वर्गप्राप्तीसाठी प्रार्थना करतात, ते लोक (जगातील) पापांपासून पवित्र होऊन, सत्कर्म करून, (केवल) माझी उपासना करतात आणि मग पुण्यफलामुळे इंद्रलोक प्राप्त करतात व तेथील स्वर्गीय देवतांसाठी असणारे दिव्य भोग भोगतात. (अर्थात ते भोगदेखील मी देत असतो.) (९:२०)

● *देवान्भवयतानेन ते देवा भावयन्तु वः । परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ।।३- ११ ।।*

● *देवान् भावयता अनेन ते देवाः भावयन्तु वः । परस्परम् भावयन्तः श्रेयः परम् अवाप्स्यथ ।।११ ।।*

● (अनेन) या (आदेशां) नुसार, (देवान्) देवता, (भावयता) (एक ईश्वराची) उपासना करतात, (ते) तर (देवाः) देवतां (सारखी), (वः) तुम्हीदेखील, (भावयन्तु) उपासना करा, (परस्परम्) (मानवजाती व देवतां) मिळून, (भावयन्तः) उपासना केल्याने (परम्) (ईश्वराचा) उत्तम व दिव्य, (श्रेय) आश्रय, (अवाप्स्यथ्) प्राप्त होईल. (३:११)

६. या (आदेशां) नुसार, देवता (एक ईश्वराची) उपासना करतात तेव्हा देवतां (सारखी) तुम्हीदेखील उपासना करा, (मानवजाती व देवतां यांनी) एकत्रित उपासना केल्याने (ईश्वराचा) उत्तम व दिव्याश्रय प्राप्त होईल. (३:११)

● *इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः । तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुड्के स्तेनः एव सः ।।३- १२ ।।*

● *इष्टान भोगान हि वः देवाः दास्यन्ते यज्ञ-भाविताः । तैः दत्तान् अप्रदाय एभ्यः जो भुड्के स्तेनः एव सः ।।१२ ।।*

● (यज्ञ) ईश्वराच्या आदेशांनुसार (भविताः) उपासना केल्याने, (हि) निःसंदेह, (देवा) देवता, (वः) तुम्हाला, (इष्टान्) जीवनोपयोगी, (भोगान्) सर्व वस्तू, (दास्यन्ते) देतील, (तैः) त्यांनी, (दत्तान्) दिलेल्या वस्तू, (अप्रदाय) इतरांना न देता अथवा इतरांच्या कल्याणास्तव न वापरता, (यः) जो, (एभ्यः) त्यांचा, (भुडेंल) उपभोग घेईल, (सः) तो, (एव) खरे पाहता, (स्तेनः) चोर आहे. (३:१२)

७. ईश्वराच्या आदेशांनुसार उपासना केल्याने निश्चितच देवता तुम्हाला जीवनोपयोगी सर्व वस्तू देतील त्यांनी दिलेल्या वस्तू इतरांना न देता अथवा इतरांच्या कल्याणास्तव त्या न वापरता जो त्या वस्तूंचा उपभोग घेतो तो खरे पाहता चोर आहे. (३:१२)

● *न मां दुष्कृतिनो मूढोः प्रपद्यन्ते नराधमाः । माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ।।*

● *न माम् दुष्कृतिनः मूढा प्रपद्यन्ते नर-अधमाः मायया अपहृत ज्ञानाः आसुरम् भावम् आश्रिताः ।।७-१५ ।।*

● (मामया) या परीक्षा वा ईशयोजनेतून (यश मिळवून) देणारे (ज्ञानाः)

धर्मज्ञान, (आसुरम्) आसुरी (राक्षसी), (भावम्) प्रकृतीचा, (आश्रिताः) आश्रय घेणाऱ्यांकडून, (अपहृत) असुर (राक्षसाने) चोरले आहे, (मुढाः) (कारण) हे मूर्ख, (दुष्कृतिनः) पापकर्म करणारे, (अधमाः) आणि (नरकात) पडणारे, (नर) मनुष्य, (माम्) माझी, (प्रपद्यन्ते) (उपासना करीत माझा) आश्रय वा आधार, (न) घेत नाहीत. (७:१५)

८. या परीक्षा वा ईशयोजनेतून (यश मिळवून) देणारे धर्मज्ञान आसुरी प्रकृतीचा आश्रय घेणाऱ्यांकडून असुराने चोरले आहे (कारण) हे मूर्ख, पापकर्म करणारे, आणि नरकात पडणारे मनुष्य माझी (उपासना करीत माझा) आश्रय वा आधार घेत नाहीत. (७:१५)

**सारांश :**

वर उद्‌धृत श्लोक वाचून जी गोष्ट ध्यानात येते ती अशी;

● श्लोक क्र. ३:१२ मध्ये म्हटले आहे की ईश्वराच्या आदेशांनुसार उपासना केल्याने निश्चितच देवता तुम्हाला जीवनोपयोगी सर्व वस्तू देतील. या श्लोकाद्वारे ही गोष्ट लक्षात येते की ईश्वर व देवता हे वेगवेगळे आहेत. आणि देवता ईश्वराचा आदेश पाळतात.

● श्लोक क्र. ९:२० मध्ये म्हटले आहे की कर्मांचे फळस्वरूप स्वर्गात इंद्रलोकात राजांसारखे, देवतांद्वारे देण्यात आलेल्या भोगांपासून दिव्यानंद घेतात. बायबल व कुरआनमध्ये ईश्वराच्या अशा जीवांना जे स्वर्गात मृतकांची सेवा करतात त्यांना देवदूत (Angels) म्हटले जाते. म्हणून भगवद्‌गीतामध्ये ज्यांना देवता म्हटले गेले आहे ते देवदूत आहेत.

● श्लोक क्र.७:२३ मध्ये म्हटले गेले आहे की देवतांची उपासना करणारे नष्ट होतील.

● ईश्वराचे आदेश आणि ईशज्ञान मनुष्यांना सांगणाऱ्या मनुष्याची भगवद्‌गीतामध्ये नावानिशी चर्चा करण्यात आली आहे. जसे- श्रीरामचंद्रजी, श्रीकृष्णजी वगैरे. भगवद्‌गीतामध्ये त्यांना देवता म्हटलेले नाही. लोक स्वतःहून त्यांना देवता म्हणतात. असे नाव घेऊन संबोधित करणाऱ्या श्लोकाचे एक उदाहरण पुढीलप्रमाणे आहे;

● अशा प्रकारे मृत्यूपर्यंत सर्व कर्मांचा (केवल) माझ्या आश्रयाने करणाऱ्या वासुदेवा (श्रीकृष्णजी) सारखा महात्मा अनेक जन्माला येणारे मनुष्य आणि ज्ञानीजनांपैकी (एखादा) अत्यंत दुर्लभ आहे. (भगवद्‌गीता ७:१९)

********

# १२. क्या महाप्रलय होगा?

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● *एतद्योनीनि भूतानि सर्वाणित्युपधारथ। अहंकृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा।।७-६।।*

● *एतत् योनिनि भूतानि सर्वाणि इति उपधारय। अहम् कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयः तथा।।६।।*

(इति) अशा प्रकारे, (मी) (एतत्) या दोन्ही अर्थात हे विश्व आणि परलोकावरील, (सर्वाणि) संपूर्ण, (भूतानि) मानवजातीच्या, (योनीनि) पिढ्यां (च्या सफलता व विफलता), (उपाध्याय) चा आधारदेखील आहे, (च) आणि, (अहम्) मी (एकमेव), (जगत) विश्वाचा, (प्रभव) आदि, (तथा) व, (प्रलय) अंत (महाप्रलय वा कयामत), (कृत्सन) करणार आहे. (७:६)

● अशा प्रकारे मी या दोन्ही म्हणजे हे विश्व आणि परलोकावरील संपूर्ण मानवजातीच्या पिढ्यांच्या सफलता व विफलतेचा आधारदेखील आहे आणि विश्वाचा आदि व अंत (महाप्रलय) करणारा मीच आहे. (७:६)

● या श्लोकात स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की एकेदिवशी महाप्रलय येईल. आणखीन काही श्लोकांमध्ये महाप्रलयाचे वर्णन आले आहे, ते असे–

● *पुरुषः स परः पार्थ भक्तया लभ्यस्त्वनन्यया।*

*यस्यान्तःस्थानि भूतानिन येन सर्वमिदं ततम् ।।८-२२।।*

● *पुरुषः सः परः पार्थ भक्त्या लभ्यः तु अनन्यया। यस्य अन्तः-स्थानि भूतानि येन सर्वम् इदम् ततम् ।।२२।।*

(पार्थ) हे पार्थ! (अर्जुना) (सः) तो (पुरुषः) मनुष्य होणे (परः) शक्य नाही (तु) परंतु (अननन्या) दुसऱ्या एखाद्या निर्मित वस्तू वा देवताची (भक्त्या) उपासना न केल्यानेच (लभ्यः) त्याला प्राप्त केले जाऊ शकते (येन) (हा तो ईश्वर आहे) ज्याद्वारे (सर्वम्) सर्व निर्मित वस्तूंचा (इदम्) हा (ततम्) फैलाव आहे (यस्य) आणि ज्याद्वारे (भूतानि) निर्मित वस्तूंचा (अन्तः) अंत म्हणजे प्रलय (स्थानि) होणार आहे. (८:२२)

हे पार्थ! (अर्जुना) तो मनुष्य होणे शक्य नाही परंतु दुसऱ्या एखाद्या निर्मित वस्तू वा देवताची उपासना न करताच त्याला प्राप्त केले जाऊ शकते. या ईश्वराद्वारे सर्व निर्मित वस्तू विस्तारल्या आहेत आणि त्याद्वारेच निर्मित वस्तूंचा अंत म्हणजे प्रलय होणार आहे. (८:२२)

(ईश्वराने निर्माण केलेल्या सर्व वस्तूंना या श्लोकात निर्मित वस्तू म्हटले आहे. उदाहरणार्थ धरती, आकाश, प्राणी वा संपूर्ण ब्रह्मांड इत्यादी.)

● *सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम्। कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम्।।*

● *सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिम् यान्ति मामिकाम् कल्प-क्षये पुनः तानि कल्प-आदौ विसृजामि अहम् ।।९-७।।*

● (कौन्तेय) हे कुंतीपुत्र (अर्जुना)! (अहम) मी (कल्प) ब्रह्मांडाच्या (आदौ) प्रारंभी (तानि) या सर्वां (मनुष्यां) ची (विसृजामि) निर्मिती केली आहे (कल्प) आणि ब्रह्मांडाचा (क्षये) अंत म्हणजे प्रलयाच्या वेळी (मामिकाम्) माझ्या इच्छेनुसार (प्रकृतिम्) ईश्वरी प्रकृतीद्वारा (सर्व) सर्व (भूतानि) मनुष्य (पुनः) पुन्हा, (यान्ति) उठविले जातील (जिवंत केले जातील). (९:७)

● हे कुंतीपुत्र (अर्जुना)! (ईश्वर म्हणतो) मी ब्रह्मांडाच्या प्रारंभी या सर्वां (मनुष्यां) ची निर्मिती केली आहे आणि ब्रह्मांडाचा अंत म्हणजे प्रलयाच्या वेळी (मृत्यूनंतर) माझ्या इच्छेनुसार ईश्वरी प्रकृतीद्वारा सर्व मनुष्य पुन्हा उठविले जातील (जिवंत केले जातील). (९:७)

● (ईश्वर म्हणतो,)जर मी (ब्रह्मांडास योग्य प्रकारे ठेवण्याचे) कर्म केले नाही तर या ब्रह्मांडात अराजकता व अव्यवस्था माजेल. (प्रलयाच्या वेळी मी ब्रह्मांडातील सर्व वस्तूंना) कचऱ्यासारखे एकमेकांवर आदळून एकत्रित करीन आणि मग सर्वप्रथम निर्मित करण्यात आलेल्या मानवाच्या या सर्वां (वंश/मानवजाती) चा विनाश करणारा होईन. (३:२४)

● ईश्वर, जो निर्मित वस्तूंपेक्षा पूर्णतः वेगळा आहे, तो कुणाच्या सत्कर्माचा आणि दुष्कर्मांचा हिशोब घेण्यास जबाबदार नाही. अज्ञानामुळे मनुष्य असे म्हणतो. कारण त्याच्या (अज्ञानाने) ज्ञानावर पडदा टाकून त्याला लपविले आहे. (५:१५)

**सारांश :**

संपूर्ण भगवद्गीता वाचल्यानंतर प्रलय आणि प्रलयानंतरच्या जीवनाच्या बाबतीत जी गोष्ट लक्षात येते ती अशा प्रकारे आहे;

१. ईश्वराने या ब्रह्मांडाची निर्मिती केली आहे.

२. एके दिवशी तो या ब्रह्मांडाचा अंतदेखील करील.

३. त्यानंतर तो सर्व मानवजातीला पुन्हा जिवंत करील आणि कर्मांचा हिशोब घेईल.

४. कर्मांच्या आधारे ईश्वर लोकांना स्वर्ग अथवा नरकात टाकील. ती स्थिती कायमस्वरूपी असेल. त्यानंतर मृत्यू येणार नाही.

या धरतीवर आणि या जीवनाच्या अंतानंतर आम्ही जेथे असू आणि आमची जी स्थिती असेल तिला परलोकदेखील म्हणतात आणि ती अनंत काळासाठी असेल.

*********

# १३. परलोकचे महत्त्व

● **परलोक कशास म्हणतात?**

मृत्यूनंतर आम्ही महाप्रलयदिनापर्यंत पितृलोकात राहू. जेव्हा ईश्वर आकाश व धरती सर्वांना नष्ट करील, त्या दिवसाला महाप्रलय म्हणतात. त्या दिवशी प्रत्येक मनुष्यास आपल्या कर्मांचा हिशोब द्यावा लागेल. कर्मानुसार ईश्वर प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत स्वर्ग अथवा नरकाचा निर्णय घेईल. त्यानंतरचे जीवन अनंतकालीन (कायमस्वरूपी) असेल. स्वर्गवासी निरंतर ईश्वराच्या कृपाछायेत आणि नरकवासी निरंतर ईश्वराच्या प्रकोपात राहतील. यालाच परलोक म्हणतात.

● भगवद्‌गीतामध्ये परलोकाच्या बाबतीत जे श्लोक आहेत त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे आहेत.

● *अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धी मे पराम् ।जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ।।७-५।।*

● *अपरा इयम् इतः तु अन्याम् प्रकृतिम् विद्धि मे पराम् । जीव-भूताम् महा-बाहो यया इदम् धार्यते जगत् ।।५।।*

(तु) परंतु, (महा बाहो) हे शक्तिशाली बाहूवाल्या (अर्जुना), (इयम) या, (अपरा) क्षुल्लक (विश्वा), (इत) (च्या) व्यतिरिक्त, (प्रकृतिम) माझ्या प्रकृतीची निशाणी, (अन्याम) परलोक, (विद्धि) जाणून घेण्याचा प्रयत्न कर, (में) जी माझी, (पराम) सर्वश्रेष्ठ (प्रकृतीची निशाणी), (यया) ज्यावर, (जगत) या विश्वाचा, (इदम) आणि या (जगा) तील, (जीव भूताम्) सर्व निर्मित वस्तूं (च्या सफलता व विफलते), (धार्यत) चा आधार आहे.

● परंतु हे महाबाहो (अर्जुना)! (ईश्वर म्हणतो,) या क्षुल्लक (Insignificant) विश्वाव्यतिरिक्त माझ्या प्रकृतीची निशाणी, परलोक (hereafter) जाणून घेण्याचा प्रयत्न कर, जी माझी सर्वश्रेष्ठ प्रकृतीची निशाणी आहे. ज्यावर या विश्वाचा आणि या विश्वातील सर्व निर्मित वस्तूंच्या सफलता व विफलतेचा आधार आहे. (७:५)

● *ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः । तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ।।१५-४।।*

● *तत् परिमार्गितव्यम् यस्मिन् गताः न निवर्तन्ति भूयः तम् एव च आद्यम पुरुषम् प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ।।४।।*

● (ततः) मग (तत्) ते परलोक (पदम्) निवास (परिमार्गितव्यम्) शोधले पाहिजे (यस्मिन) जेथे (गता) जाऊन (भूयः) (कुणीही) पुन्हा (निर्वतन्ति) (या विश्वात) परत येत नाही (च) आणि (एव) (जेथे जाऊन) निःसंदेह (तम्) त्यास (आद्यम) (त्या) सर्वप्रथम (पुरुषमः) पुरुषा (ईश्वर) चा (प्रपद्ये) आश्रय मिळतो (यत) (याच परलोका) मुळे, (पुराणी) (या) प्राचीन (विश्वाचा), (प्रवृत्तिः) आरंभ, (प्रसृता) व

विस्तार आहे.

● मग ते अन्य निवास (परलोक) शोधले पाहिजे जेथे जाऊन कुणीही पुन्हा (या विश्वात)परत येत नाही आणि (जेथे जाऊन) नि:संदेह त्याला त्या सर्वप्रथम पुरुषा (ईश्वर) चा आश्रय मिळतो. (याच परलोका) मुळे या प्राचीन विश्वाचा आरंभ व विस्तार आहे. (१५:४)

● परंतु या इहलोकाव्यतिरिक्त अन्य लोक म्हणजे परलोकाची निर्मिती आहे, ते न पाहू शकणाऱ्यांपेक्षाही अधिक न दिसणारे आहे. ते सदैव स्थिर राहणारेदेखील आहे. म्हणून ईश्वराने सर्व निर्मित वस्तूंचा नाश झाला तरीही नष्ट न होणाऱ्या परलोकाची निर्मिती केली आहे. (८:२०)

● *अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् । यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ।।८-२१।।*

● *अव्यक्तः अक्षरः इति उक्तः तम् आहुः परमाम् गतिम् । यम् प्राप्य न निवर्तन्ते तत् धाम परमम् मम ।।२१।।*

● (तम्) या परलोकाला (ईश्वर) (अव्यक्तः) अदृश्य (अक्षरः) आणि अविनाशी (उक्तः) म्हणत आहे. (इति) अशा प्रकारे (ईश्वर) (परमाम) (यास) सर्वांत (गतिम्) श्रेष्ठ निवास (आहुः) (देखील) म्हणत आहे (यम्) जे (प्राप्य) प्राप्त केल्यानंतर (निवर्तन्ते) (मनुष्य विश्वामध्ये) परत (न) येत नाहीत (तत्) (ईश्वर ईश्वर असेही म्हणतो की) ते (परलोकातील) (परमम्) सर्वश्रेष्ठ निवासच (मम) माझ्या, (धाम) राहण्याचे ठिकाण आहे.

● या परलोकाला ईश्वर अदृश्य आणि अविनाशी म्हणत आहे. अशा प्रकारे ईश्वर यास सर्वश्रेष्ठ निवासदेखील म्हणत आहे, जे प्राप्त केल्यानंतर मनुष्य विश्वामध्ये परत येत नाहीत. ईश्वर असेही म्हणतो की ते परलोकातील सर्वश्रेष्ठ निवासच माझ्या राहण्याचे ठिकाण आहे. (८:२१)

● वरील श्लोक वाचून जी गोष्ट लक्षात येते ती अशी;

ईश्वर न स्वतः दिसतो, न स्वर्ग व नरक दिसतात. तरीही ईश्वर त्या सर्वांवर विश्वास ठेवून सत्कर्म करण्याचा आदेश देतो. यालाच श्रद्धा (विश्वास) म्हणतात आणि परलोकातील सफलता याच श्रद्धेवर अवलंबून आहे.

************

# १४. मुक्ती कशी मिळेल?

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● *अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक्क।*
*साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।।*

● *अपि चेत् सु-दुराचार भजते माम् अनन्यभाक।*
*साधुः एवं सः मन्तव्यः सम्यक व्यसिसतः हि सः ।।*

● (चेतु) जर, (सु-दुराचार) एखादा अत्यंत पापी मनुष्य, (अपिः) देखील, (भाक) अन्य (निर्मित वस्तू वा देवते) ची भक्ती न करता, (माम) माझ्यावर, (भजत) श्रद्धा बाळगत असेल (तर), (एव) निःसंदेह, (सः) तोही (साधु) साधूच, (मन्तेव्यः) समजावा, (हि) कारण, (स) तो, (सम्यक) पूर्ण (आणि खरी), (व्यवसितः) श्रद्धा बाळगणारा आहे.

● जर एखादा अत्यंत पापी मनुष्यदेखील अन्य (निर्मित वस्तू वा देवते) ची भक्ती न करता माझ्यावर श्रद्धा बाळगत असेल तर निःसंदेह तोही साधूच समजावा कारण तो पूर्ण आणि मनापासून श्रद्धा बाळगणारा आहे. (९:३०)

(निर्मित वस्तू म्हणजे ईश्वराने निर्माण केलेल्या सर्व वस्तू. जसे- धरती, आकाश, जीव, जंतू, देवीदेवता, महापुरुष इत्यादी.)

● *क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं। निगच्छति।*
*कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति।। ९- ३१ ।।*

● *क्षिप्रम् भवतित धर्म-आत्म शश्व्त निगच्छति।*
*कौन्तेय प्रतिजानीहि न में भक्तः प्रणश्यति ।।३१ ।।*

(क्षिप्रम) (योग्य व खरी श्रद्धा बाळगल्याने तो) लवकरच, (धर्म) ईश्वराच्या धर्मा (नियम व कर्तव्यां) नुसार कर्म करणारा, (आत्मा) मनुष्य (देखील), (भवति) होईल, (शश्व्त) आणि त्याला (मृत्यूनंतर स्वर्गाची) परम, (शान्तिम) शांती, (निगच्छति) प्राप्त होईल, (कौन्तेयः) (म्हणून) हे कुंतीपुत्र (अर्जुन), (प्रतिजानीहि) निश्चितपणे जाण की, (मेंः) माझे (भक्तः) भक्त, (प्रणश्यति) कधीही अशांती, विनाश आणि तणावाला बळी, (न) पडत नाहीत.

श्रीकृष्णजी म्हणाले :

● योग्य व खरी श्रद्धा बाळगल्याने तो लवकरच ईश्वराच्या धार्मिक नियम व कर्तव्यांनुसार कर्म करणारा मनुष्यदेखील होईल आणि त्याला मृत्यूनंतर स्वर्गाची परमशांती प्राप्त होईल. म्हणून हे कुंतीपुत्र अर्जुन! (ईश्वर म्हणतो,) निश्चितपणे जाण की माझे भक्त कधीही अशांती विनाश व तणावाला बळी पडत नाहीत. (९:३१)

● हे पार्था (अर्जुना)! (ईश्वर म्हणतो,) माझी (उपासना करणारे) माझा आश्रय घेणारे जे कोणी (मनुष्य) आहेत, मग ते (१) पापाचारींपैकी, (२) स्त्रिया, (३) शेती वा व्यापार करणारे अथवा (४) सेवा करणारे मजूर असोत, निःसंदेह हे सर्व जण (स्वर्गाचे) सर्वश्रेष्ठ लक्ष्य गाठतील. (९:३२)

● मग (१) ईश्वरचे ज्ञान असलेले ब्राह्मण, (२) सत्कर्म करणारे, (३) भक्त आणि (४) राजर्षी, या लोकांबद्दल काय सांगू? (म्हणून) या सदैव न राहणाऱ्या, सुख न देणारे विश्व प्राप्त करून (काय साध्य होईल? सदैव सुख देणारा स्वर्ग प्राप्त करण्यासाठी) माझी उपासना करा. (९:३३)

(श्लोक क्र. ९:३२ व ९:३३ वाचून याचीदेखील जाणीव होते की जातियवादाला मनुष्याने स्वत: निर्माण केला आहे. ईश्वरावर श्रद्धा बाळगणाऱ्या सर्वांवर तो प्रेम करतो. आणि जे कोणी स्वर्गाच्या योग्य असतील त्या सर्वांना ईश्वर एकाच स्वर्गात ठेवील. मग तो कोणत्याही जातीचा का असेना!)

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● (१) मला आपल्या मनात ठेवून माझ्या आदेशांचे पालन करणारा बन, (२) माझ्या प्रसन्नतेसाठी सत्कर्म कर, (३) मलाच नमस्कार कर, नि:संदेह अशा प्रकारे (४) स्वत: भक्तीत मग्न होऊन, (५) माझा आधार घेऊन, तू मला प्राप्त करशील. (९:३४)

जो पुरुष इंद्रियांच्या समुदायाचे संयमन करून, मनबुद्धीच्या चिंतनापलीकडे असणाऱ्या म्हणजे अचिंत्य, सर्वव्यापी, अनिर्वाच्य, ईश्वराशी नित्य युक्त असणाऱ्या, अचल, अव्यक्त, आकाररहित आणि अविनाशी अशा ब्रह्माची उपासना करतो; तसेच सर्व प्राणिमात्रांचे हित करण्यात तत्पर असतो व जो सर्वत्र समबुद्धी ठेवणारा असतो, असा योगीदेखील मलाच प्राप्त होतो.

● परंतु जे लोक मला (१) अविनाशी ईश्वर ॐ, (२) अनुपम म्हणजे अद्वितीय, (३) अदृश्य, (४) सर्वत्र आढळणारा, (५) कल्पनेपलीकडे मानून पूर्णत: उपासना करतात आणि (६) हृदयाला एकेश्वरात एकाग्र ठेवून, (७) सर्व वस्तूंपासून इच्छांना निश्चितपणे नियंत्रित करून, (८) पर्वतासम एकेश्वरावर स्वत:ला स्थिर करून, (९) दुसऱ्या कोणत्याही निर्मित वस्तू वा देवताकडे मनला न भटकविता, (१०) सर्व निर्मित वस्तूंच्या कल्याणकारी कार्यात मग्न राहतात, असे लोक निश्चितच मला प्राप्त करतात. (१२:३-४)

● (जे लोक) तिन्ही वेदांमध्ये स्वर्गात (मिळणारे) सोमरस (अमृतप्याला) पिण्यासाठी आणि स्वर्गप्राप्तीसाठी प्रार्थना करतात, ते लोक (जगातील) पापांपासून पवित्र होऊन, सत्कर्म करून, (केवल) माझी उपासना करतात आणि मग पुण्यफलामुळे इंद्रलोक प्राप्त करतात व तेथील स्वर्गीय देवतांसाठी असणारे दिव्य भोग भोगतात. (अर्थात ते भोगदेखील मी देत असतो.) (९:२०)

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● जो मनुष्य, दुसऱ्या एखाद्या निर्मित वस्तू वा देवताला कसलाही विचार न करता माझी एक ईश्वराची पूर्णत: उपासना करतात, त्या धैर्याने उपासनेत मग्न असलेल्या लोकांच्या आवश्यकता पूर्ण करण्याची आणि त्यांच्या प्राण व वित्ताच्या सुरक्षेची जबाबदारी मी स्वत: उचलतो. (९:२२)

● अनेक (ईश्वरांच्या) उपासनांऐवजी, मला- एक ईश्वराला शरण ये. (अनेक ईश्वरांना सोडून देताना) चिंता करू नकोस, कारण मी तुला मागील सर्व पापांपासून मुक्त करीन. (१८:६६)

एक ईश्वराची उपासना करणे हाच मुक्तीचा मार्ग होय.

********

# १५. कुणाचा विनाश होईल?

● *एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते। ये चाप्यक्षरमव्यक्तंतेषां के योगवित्तमाः।।*

● *एवम् सतत युक्ताः ये भक्ताः त्वाम् पर्युपासते। ये च अपि अक्षरम् अव्यक्तम् तेषाम् के योगवित्त माः ।।१२-१।।*

● (एवंम्) अशा प्रकारे, (ये) (दिसणारी निर्मित वस्तू मानून), जो (भक्ताः) भक्त, (सतत) सदैव, (पर्युपास्ते) पूर्णतः, (त्वाम्) आपल्या, (युक्ताः) उपासनेत मग्न असतो, (च) आणि, (अपि) निःसंदेह , (य) जो (भक्त), (अक्षरम्) आपणास अविनाशी ईश्वर म्हणजे ॐ, (अव्यक्तम्) न दिसणारा मानून, (तेषाम्) (आपल्या उपासनेत मग्न असतो) या (दोघां) पैकी, (के) (हे ईश्वर!) कोणता, (योगवित्) भक्त, (तमाः) भटकाव व विनाशाला बळी पडतो?

● (अर्जुनाने श्रीकृष्णद्वारा ईश्वराला विचारले की, हे ईश्वर!) अशा प्रकारे दिसणारी निर्मित वस्तू मानून जो भक्त सदैव, पूर्णतः आपल्या उपासनेत मग्न असतो आणि निःसंदेह जो (भक्त) आपणास अविनाशी ईश्वर म्हणजे ॐ न दिसणारा मानून (आपल्या उपासनेत मग्न असतो) या दोघांपैकी (हे ईश्वर!) कोणता भक्त भटकाव व विनाशाला बळी पडतो? (१२:१)

● *मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते। श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्तमा मताः।।१२-२।।*

● *मयि आवेश्य मनः ये माम् नित्य युक्ताः उपासते। श्रद्धया परया उपेताः ते मे युक्तःतमाः मताः ।।२।।*

● (ये) जे लोक, (मयि) मला, (परया) निर्मित वस्तू (मखलूक) समजून, (श्रद्धया) श्रद्धा ठेवून, (मनः) मला मनात, (आवेशय) स्थित करून, (नित्य) सदैव, (माम्) माझ्या, (उपासते) उपासनेत, (युत्का) मग्न असतात, (ते) त्या लोकांनी, (मे) अशा प्रकारे मला, (उपेता) निर्मित वस्तू मानून, (युत्क) माझी उपासना करणे, (तमा) भटकाव आणि विनाश आहे. (मता) हा माझा निर्णय आहे.

● श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

''जे लोक मला निर्मित वस्तू समजून (जसे चित्र, मूर्ती इ. मानून), श्रद्धा ठेवून मला मनात स्थित करून सदैव माझ्या उपासनेत मग्न असतात, त्या लोकांनी अशा प्रकारे मला निर्मित वस्तू मानून माझी उपासना करणे भटकाव आणि विनाश आहे. हा माझा निर्णय आहे.'' (१२:२)

● *अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुध्दयः। परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम्।।*

● *अव्यक्तम् व्यक्तिम् आपन्नम् मन्यन्ते माम् अबुद्धयः। परम् भावम् अजानन्तः मम अव्ययम् अनुत्तमम् ।।७-२४।।*

● (मम) माझ्या, (परम्) सर्वश्रेष्ठ (अव्ययम्) अपरिवर्तित, (अनुत्तमम्) आणि अविनाशी, (भावम्) प्रकृतीस, (अजानन्तः) न समजता, (अबुद्धयः) मूर्ख लोक (बुद्धिहीन), (माम्)

मला, (अव्यक्तम्) अदृश्याला, (व्यक्तिम्) दिसणारा, (आपन्नम्) आणि दोषी वस्तू वा मनुष्य, (मन्यन्ते) समजतात.

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● माझ्या सर्वश्रेष्ठ अपरिवर्तित आणि अविनाशी प्रकृतीस न समजता मूर्ख लोक (बुद्धिहीन) मला, अदृश्याला दिसणारा आणि दोषी वस्तू वा मनुष्य समजतात. (७:२४)

● *नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः । मूढो ऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ।।*

● *न अहम् प्रकाशः सर्वस्य योग-माया समावृतः । मूढः अयम् न अभिजानाति लोकः माम् अजम् अव्ययम् ।।७-२५ ।।*

● (मूढः) मूर्ख लोकांना, (अयम्) हे, (न) नाही, (अभिजानाति) माहीत की, (समावृत) (माझे) दिसणे वा न दिसणे, (माया) (मनुष्यांची) परीक्षा घेण्याशी, (योग) संबंधित आहे, (अहम्) आणि मी, (सर्वस्य) प्रत्येकाला, (प्रकाशः) आपले तेजदेखील, (न) नाही (दाखवत), (माम) (आणि हे लोक) मला, (लोकः) विश्वात, (अजम्) न जन्मणारा, (अव्ययम्) आणि अविनाशीदेखील (मानत नाहीत.)

● (ईश्वर म्हणाला,) मूर्ख लोकांना, हे माहीत नाही की, माझे दिसणे वा न दिसणे, मनुष्यांची परीक्षा घेण्याशी संबंधित आहे आणि मी प्रत्येकाला आपले तेजदेखील दाखवत नाही, आणि हे लोक मला विश्वात न जन्मणारा आणि अविनाशीदेखील मानत नाहीत. (७:२५)

● *अन्तवत्तु फलं तेषां तभ्दवत्यल्पमेधसाम् देवान्देवयजो यान्ति मभ्दक्ता यान्ति मामपि ।।७-२३ ।।*

● *अन्त-वत् तु फलम् तेषाम् तत् भवति अल्पमेधसाम् । देवान् देव-यजः यान्ति मत् भक्ता यान्ति माम् अपि ।।२३ ।।*

● (तु) परंतु (अपि) हेदेखील खरे आहे की, (देव- यजः) देवतांच्या प्रसन्नतेचे कर्म करून त्यांची उपासना करणारे, (देवान्) (मृत्यूनंतर) देवतांकडे, (यान्ति) जातील आणि, (तत्) या, (अल्प) अल्प, (मेधसाम्) बुद्धिधारक लोकांचे (फलम्) फळ, (तेषाम्) त्यांचा, (अन्त-वत) विनाश, (भवति) होईल, (मत) (आणि) माझी, (भक्ताः) उपासना करणारे, (माम्) (मृत्यूनंतर) माझ्याकडे, (अपि) च, (यान्ति) येतील. (७:२३)

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● परंतु हेदेखील खरे आहे की, देवतांच्या प्रसन्नतेचे कर्म करून त्यांची उपासना करणारे (मृत्यूनंतर) देवतांकडे जातील आणि या अल्पबुद्धी लोकांचे फळ त्यांचा विनाश होईल आणि माझी उपासना करणारे (मृत्यूनंतर) माझ्याकडेच येतील. (७:२३)

************

# १६. पुण्य करणारे नरकात का जातील?

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● मरण पावणारे नैसर्गिक गुणांनुसार नरकात अशा प्रकारे ठेवले जातील; (श्रद्धेशिवाय सद्‌गुण बाळगणारे) पुण्य करणारे नरकात वरच्या पातळीवर ठेवले जातात. दुर्गुणी लोक मध्ये निवास करतात आणि मार्गभ्रष्ट असलेले अज्ञानी वा धर्मद्रोही (ढोंगी) अगदी खालच्या तळाला ठेवले जातात. (१४:१८)

● या श्लोकात म्हटले आहे की, पुण्य करणारेदेखील नरकात जातील. मात्र पुण्य करून कुणी नरकात का जाईल? नरकात केवळ पाप करणारे जायला हवेत. याविषयी येथे ठिकाणी चर्चा करण्याचा उद्देश असा की, पुण्य करणारेदेखील नरकात जातील, ही गोष्ट आपल्याला समजावी. होय! ते सर्वात वरच्या नरकात असतील, जेथे शिक्षा सर्वांत कमी आणि क्षुल्लक असते. ही क्षुल्लक शिक्षा काय असते हे आपणास माहीत आहे काय? त्या व्यक्तीच्या पायात आगीचे बूट घातले जातील, त्यामुळे तिचा मेंदू हांड्यातील पाणी उकळावे तसा उकळेल.

पुण्य करणारे नरकात का जातील?

चला, याचे उत्तर आपण शोधू या!

श्रीकृष्णजी म्हणाले,

● हे शक्तिशाली बाहूवाल्या (अर्जुना!) (ईश्वर म्हणाला,) शरीरधारक मनुष्याचे शरीर निर्माण करून अविनाशी ईश्वराच्या प्रकृतीने ज्या तीन गुणांद्वारा परीक्षा घेण्यासाठी मनुष्याला जखडून ठेवले आहे, ते असे आहेत. सद्‌गुण, दुर्गुण आणि भरकटविणारा गुण. (१४:५)

● हे पापरहित (अर्जुना)! त्याच्या (ईश्वरा) कडून प्रदान करण्यात आलेल्या गुणांपैकी सद्‌गुण हा पावित्र्य प्रदान करणारा, प्रकाश देणारा, मनुष्याला पापारहित ठेवणारा गुण आहे. कारण हा धर्मज्ञानासह मनुष्याला सुख, तृप्ती आणि शांती यांच्या संगाने बांधून ठेवतो. (१४:६)

● हे कुंतीपुत्र (अर्जुना)! दुर्गुणधारक शरीर असणाऱ्या (मनुष्या) चा संबंध लोभापासून निर्माण होतो आणि तो त्यास (मनुष्यास) कर्म व त्यापासून प्राप्त होणाऱ्या फळाच्या आसक्तीमध्ये बद्ध करीत असतो. तो जीवात्म्याला कर्मामध्ये प्रवृत्त करीत असतो आणि ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घे की जेव्हा अपेक्षा पूर्ण होत नाहीत तेव्हा मनुष्याच्या मनात क्रोध, घृणा व हिंसा जन्म घेतात. (१४:७)

● हे भारत (अर्जुन)! परंतु भरकटविणाऱ्या गुणास सर्व मनुष्यांच्या विनाश व समस्येचे कारण समज, कारण तो अज्ञानामुळे निर्माण होतो आणि तो मनुष्याला आळस, कल्पना आणि दुष्कृत्यांनी बद्ध करतो. (१४:८)

● आता आपण श्लोक क्र. १४:१८ चे अध्ययन पुन्हा करू. या श्लोकात फक्त पुण्य करणारांचा उल्लेख आहे. सद्‌गुणी व्यक्ती नरकात जाण्याचा उल्लेख नाही. पाप आणि पुण्याची व्याख्या स्वत:च निश्चित केलेली असेल अशा पथभ्रष्टतेच्या गुणधारकांनी केलेले ते पुण्य असेल.

● पुण्य करूनदेखील लोक का नरकात जातील? ही गोष्ट समजावून सांगण्यासाठी मी काही उदाहरणे देत आहे.

● कोणत्याही सजीवास भोजन करविणे एक पुण्यकर्म आहे आणि एखाद्या सजीवाचा प्राण वाचविणे हे त्याहीपेक्षा मोठे पुण्यकर्म आहे. हे दोन्ही पुण्यकर्म आहेत. यात काही शंका आहे काय? नाही! मुंबई शहरात बी.एम.सी.च्या रेकॉर्डनुसार सन २०११-१२ मध्ये सुमारे ७० हजार (७०,०००) लोकांना भटक्या कुत्र्यांनी चावले आणि मालवणी, धारावी, गोवंडी आणि अशाच झोपडपट्टी असलेल्या विभागांमधील लोकांना कुत्र्यांमुळे रात्री प्रवास करण्याची भीती वाटते. तसेच गरिबांना या कुत्र्यांबरोबरच एनजीओसारख्या संस्थांचादेखील त्रास होऊ लागला आहे. कारण या संस्थांनी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त न करण्यासाठी सरकारलादेखील विवश करून ठेवले आहे.

● ईश्वराने या सृष्टीची निर्मिती मानवजातीची सेवा आणि सुखासाठी केली आहे. कुत्रा मानवासाठी एक मोठे वरदान अथवा उपहार आहे. कुत्रा एक वॉचमनपेक्षा अधिक प्रामाणिक आणि मालकासाठी आपले प्राण अर्पण करणारा असतो. मात्र जेव्हा त्यांचा लोकांना त्रास होऊ लागतो तेव्हा त्यांची संख्या नियंत्रित करण्याची आवश्यकता असते. जे कुत्र्यांची संख्या नियंत्रित करू देत नाहीत आणि पुण्य समजून कुत्र्यांना खाऊ घालतात आणि त्यांचे प्राण वाचवितात त्यांचे हे पुण्यदेखील पाप आहे. कारण या पुण्यामुळे लोकांना त्रास होतो. म्हणून अशा प्रकारचे पुण्य करणारे जे मानवांचे सुख व सुरक्षेविरूद्ध काम करतात ते पुण्य करूनसुद्धा नरकात जळतील.

● अशा प्रकारे दोन मानवांचा विवाह करविणे मोठे पुण्यकर्म आहे. जर कुणी पुरुषाचा पुरुषाशी अथवा स्त्रीचा स्त्रीशी विवाह लावून देत असेल किंवा समलिंगी (Homosexual) लोकांच्या अधिकारासाठी संघर्ष करीत असेल तर असले पुण्य करणारादेखील नरकात जाईल. कारण अशा मानवांचे वैयक्तिक स्वातंत्र्य (Personal Freedom) मानवी समाजाला नष्ट करेल.

● अशा प्रकारे सर्व धर्मांमध्ये असे अनेक लोक आहेत ज्यांना आपल्या धर्माच्या ज्ञानात कसलाही रस नसतो. ते लोक पूर्वीपासून चालत आलेल्या परंपरा वा रितीरिवाजानुसार जीवन व्यतीत करतात आणि प्रार्थना करतात. अशा लोकांनीसुद्धा काळजी घेतली पाहिजे. जर पूर्वीपासून लोक चुकीच्या श्रद्धेनुसार उपासना करीत असतील तर ते अशी उपासना व पुण्य करूनदेखील नरकात जळतील.

पुण्य ईश्वरी आज्ञेनुसारच असावे अन्यथा फक्त पुण्य करूनसुद्धा स्वर्गाऐवजी नरक मिळेल. शिक्षा मात्र थोडी कमी होईल.

● म्हणून ईश्वराची आज्ञा जाणून घेणे आणि सत्य धर्माचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे.

************

# १७. ईश्वराची प्रार्थना कशी करावी?

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● भक्ताने नियोजित वेळेनुसार उपासना म्हणजे एक ईश्वराच्या उपासनेत एकाग्रतेसाठी (१) सदैव एकांतात जावे आणि एकाकी व अपरिग्रहशून्य होऊन (२) स्वत:ला निर्माता, शासक व मालक न समजता एखाद्या निर्मित वस्तूकडे आकर्षित न होता (३) आपल्या बुद्धी व चित्तानिशी आत्मानुभवात तल्लीन व्हावे. (६:१०)

● पवित्र व शुद्ध अशा भूमीवर प्रथम दर्भ, त्यावर मृगाजिन, त्यावर वस्त्र (रेशमी वा लोकरीचे) अंथरूण फार खाली नव्हे व फार उंच नव्हे असे आपले आसन स्थापन करावे. (६:११)

● त्या आसनावर बसून मनाला एकाग्र करून, चित्त व इंद्रिये यांच्या क्रियांचे नियमन करून मनात फक्त एक सर्वश्रेष्ठ ईश्वराचे स्मरण करून त्याची प्रसन्नता आणि मनाला कुकर्मांपासून पवित्र करण्यासाठी उपासना करावी. (६:१२)

● शरीर, मान व डोके समान रेषेत करून मनाला (निर्मित वस्तूकडे) न भटकवता एक ईश्वराच्या स्मृतीस स्थिर करून, इकडेतिकडे न पाहता आणि स्वतःच्या नाकाच्या अग्रभागाकडे मनाला केंद्रित करून. (६:१३)

● (ईश्वर म्हणतो) शांत मनाने भीतीरहित, ईश्वराच्या आदेशानुसार जीवन व्यतीत करणाऱ्यासारखे मनात ईश्वराच्या श्रद्धेस स्थिर करून, स्वत:ला नियंत्रित करून, मलाच सर्वश्रेष्ठ मानून, आपल्या बुद्धी व विचार माझ्यातच तल्लीन होऊन बसावे. (६:१४)

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

● या प्रकारे भक्त मनाला नियंत्रित ठेवणारा, नियोजित वेळेनुसार उपासना करून परमशांती व मृत्यूनंतरचे निवास म्हणजे स्वगातील सर्वश्रेष्ठ शांती असलेले निवास प्राप्त करून घेतो. (६:१५)

● हे अर्जुना, खरे तर (१) अतिशय खाणारा आणि (२) मुळीच न खाणारा, (३) अति झोपणारा आणि अति जागरण करणारा भक्ती करू शकत नाही. (६:१६)

● (१) ईश्वराच्या आदेश व नियमांनुसार भोजन केल्याने, (२) जीवनातील प्रत्येक पाऊल ईश्वरी आदेशानुसार ठेवल्याने, (३) जीवनातील सर्व प्रयत्न व कर्मांना ईश्वराच्या आदेश व नियमांशी जोडल्याने, (४) ईश्वरी आदेशानुसार झोपणे व जागरण केल्याने खऱ्या अर्थी उपासना पूर्ण होते. आणि हीच उपासना सर्व अशांती, बेचैनी, दु:ख व विनाशावर उपाय आहे. (६:१७)

● ईश्वर म्हणतो की नि:संदेह अशा प्रकारे (१) जेव्हा भक्त सर्व इच्छा उपासनेवर आधारित कर्म आणि त्यांच्या फळांची

अपेक्षा न करता, (२) ईश्वराच्या श्रद्धेवर आपले चित्त स्थिर करून, (३) ईश्वरी आदेश व नियमांनुसार कर्म करू लागतो, तेव्हा तो खऱ्या अर्थी उपासनेस लागतो. (६:१८)

● ईश्वर आठवण करून देत आहे की, वायुरहित ठिकाणी ठेवलेला दिवा ज्याप्रमाणे अगदी निश्चल राहतो, तीच उपमा नियोजित वेळेनुसार एक ईश्वराचे निरंतर अनुष्ठान करणाऱ्या भक्ताच्या नियमन केलेल्या हृदय व बुद्धीला दिली आहे. म्हणून ईश्वरी आदेशांच्या पालनामुळे (त्याचे मन डगमगत नाही.) (६:१९)

● नि:संदेह या एकाग्रतेच्या अवस्थेत मनुष्यास ईश्वर असल्याचा भास आपोआप होतो, तेव्हा तो अगदी संतुष्ट व शांत होतो आणि अशा स्थितीत दिव्य शांतीमुळे त्याचे चित्त ईश्वराच्या स्मरणाशी जुळणे या गोष्टीचे साधन बनते की तो स्वत:ला सर्व अश्लील व कुकर्मांपासून अलिप्त ठेवू शकावा. (६:२०)

● नि:संदेह जाणूनबुजून इच्छांपासून अलिप्त राहणारा आणि सर्वश्रेष्ठ सुख जाणणारा भक्त एकाग्रतेद्वारे त्या ईश्वराचे स्मरण स्थिर करण्यावाचून आणि सत्यापासून कधीच ढळत नाही. (६:२१)

● आणि मग त्या ईश्वराला प्राप्त करून त्याहून दुसरी कोणतीही वस्तू अधिक लाभदायक वाटत नाही. या ईशप्राप्तीच्या सुखामध्ये तो स्थिरावला म्हणजे कितीही मोठे दुःख सामोरे आले तरी तो डगमगत नाही. (६:२२)

● संसारातील दुःखाच्या संयोग-वियोगापासून अलिप्त असणाऱ्या सुखाला त्या ईश्वराची स्मरणसिद्ध उपासना म्हणतात. (६:२३)

● नि:संदेह विषयचिंतनापासून संकल्पापासून उत्पन्न होणाऱ्या सर्व कामनांचा वासना व आसक्तीसहित त्याग करून, सर्व इंद्रियांचे सर्व बाजूंनी मनाने नियमन करावे. बुद्धी व चित्त (एक ईश्वराशिवाय दुसरीकडे) भटकू न देता दृढ विश्वास व श्रद्धेसह उपासनेत मग्न व्हा. (६:२४)

● बुद्धीचा वापर सांसारिक अनावश्यक कर्मांसाठी न करता, दुसऱ्या कशाचेही (निर्मित वस्तूचे) चिंतन न करता हळूहळू मनाला (उपासनेद्वारे एक) ईश्वराच्या ठिकाणी स्थित करावे. (६:२५)

● नि:संदेह चंचल व अस्थिर असणारे मन ज्या ज्या कारणांमुळे (एक ईश्वराच्या ठिकाणी) स्थित न करता सांसारिक गोष्टीमध्ये मग्न असते, त्या कारणांपासून त्याचे नियमन करून त्याला ईश्वरी आदेश, सिद्धांत व नियमांच्या पालनात गुंतवून, ईश्वराच्या ताब्यात आणावे. (६:२६)

● कारण एक ईश्वराची (उपासना करणारा) मनुष्य आपल्या दुर्गुणांना निष्क्रिय करून पापमुक्त होतो आणि मग असा भक्त संतुष्ट मन व सर्वोच्च

(स्वर्गातील) सुख प्राप्त करतो. (६:२७)

● अशा प्रकारे सदैव नियोजित वेळेनुसार एक ईश्वराची एकाग्रता असलेली उपासना करणारा भक्ताला ईश्वराच्या भयाची जाणीव होते, आणि मग सर्व समस्या आणि पापांपासून मुक्त होऊन सुखी व संतुष्ट होतो आणि (मृत्यूनंतर स्वर्गातील) सर्वोच्च शांती व सुख (असणारे निवास) प्राप्त करतो. (६:२८)

**ईश्वराची प्रार्थना कशी करावी?**

१. तुम्ही भगवद्गीताच्या अध्ययनाद्वारे ईश्वराची प्रार्थना कशी करावी याचे ज्ञान प्राप्त केले. आता मी तुम्हाला प्रत्यक्ष आणि वैयक्तिकरित्या प्रार्थना कशी करावी याबाबत सांगतो.

२. सकाळी सूर्योदयाच्या एक तास अगोदर उठावे.

३. अंघोळ करावी. शरीरावर पाणी ओतण्यापूर्वी गरगरून चूळ (Gargle) भरावी अर्थात घसा स्वच्छ करावा. नाक पाण्याने मऊ हडकापर्यंत स्वच्छ करावे. मग संपूर्ण शरीर चांगल्या प्रकारे धुवावे. शराराचा कोणताही अवयव केसाइतकाही कोरडा राहता कामा नये.

४. जर अंघोळ करणे तुमच्यासाठी आवश्यक नसेल तर फक्त अगोदर चेहरा धुवावा, मग कोपरापर्यंत दोन्ही हात धुवावेत. मग हात ओले करून डोक्या वरून फिरवावेत. हात केसांवर पुढून मागील दिशेने न्यावेत. मग दोन्ही पाय घोट्यां (Ankle) पर्यंत धुवावेत. प्रत्येक प्रार्थनेपूर्वी एवढी स्वच्छता आवश्यक आहे. जर आणखी चांगल्या तऱ्हेने स्वच्छता करू इच्छित असाल तर तीन वेळा चूळ भरावी, तीन वेळा नाक स्वच्छ करावे आणि चेहरा, हात कोपरांपर्यंत आणि पाय घोट्यांपर्यंत तीन तीन वेळा धुवावेत.

५. मग स्वच्छ कापड अंथरून पश्चिमेकडे तोंड करून बसा. (याचे कारण अध्यायाच्या शेवटी सांगेन.)

६. ज्या खोलीत तुम्ही प्रार्थनेसाठी बसाल, त्या खोलीत कसलेही चित्र अथवा प्रतिमा नसावी.

७. प्रार्थनेपूर्वी प्रेतात्म्यांपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी अथर्ववेदाच्या खालील श्लोकाचे पठण करावे.

*अग्नि: प्रात: सवने पात्वस्मान् वैश्वानरो विश्वशंभु: ।*

(अथर्ववेद ०६:४७:०१)

अर्थ:- हे सर्व मानवजातीच्या प्रिय ईश्वरा! ब्रह्मांडाच्या रचयिता. प्रत्येक प्राण्याचा उद्धारकर्ता, प्रात:काळच्या प्रार्थनेत आमचे रक्षण कर.

जर संस्कृतमध्ये पाठ नसेल तर आपल्या मातृभाषेतच ईश्वराचा आश्रय या शब्दांमध्ये घ्यावा, जो श्लोकाचा भावार्थ आहे.

गायत्री मंत्र असा आहे;

ॐ भूर्भुव: स्व:
तत्सवितुर्वरेन्यं

भर्गो देवस्य धीमहि
धीयो यो न: प्रचोदयात् ।।
(ऋग्वेद ३:६२:१०)

८. मग जसे 'ओम'चा उच्चार करण्यास तुम्हाला शिकविले जाते तसाच 'ओम'चा उच्चार करावा. अर्थात हळू हळू श्वास बाहेर काढून मध्यम स्वरात 'ओम' म्हणा.

इल्लोपनिषदनुसार 'ओम'चा अर्थ ईश्वर आहे. 'ओम' म्हणणे म्हणजे 'हे ईश्वर' म्हटल्यासारखे आहे.

९. मग २० मिनिटांपर्यंत अथवा ४० वेळा गायत्री मंत्राचे मध्यम स्वरात पठण करावे. मंत्राचे पठण करण्यापूर्वी एक दीर्घ श्वास (Deep Breath) घ्या. मग मंत्र पठण करते वेळी श्वास बाहेर सोडा. जर पूर्ण मंत्र संपण्यापूर्वी श्वास संपला तर थांबून दीर्घ श्वास घ्यावा, मग मंत्र पठण करत श्वास सोडा. (श्वास आत घेते वेळी मंत्र पठण करू नका.)

१०. मंत्र पठण करते वेळी डोळे बंद ठेवावेत आणि प्राणायाममध्ये जसे बसतात तसे बसा. अथवा मांडी घालून बसा. पाठ ताठ ठेवा आणि आपल्या नाकाच्या टोकावर लक्ष केंद्रित करा. अर्थ मेडिट्रेशनसारख्या अवस्थेत प्रार्थना करा.

११. २० मिनिटे अशा प्रकारे पठण केल्यानंतर 'ओम' म्हणा आणि डोळे उघडा. यानंतर स्वत:साठी, आपल्या कुटुंबासाठी, आपला देश व सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी ईश्वरापाशी प्रार्थना करा.

- प्रार्थना किंवा दुआचे श्लोकदेखील या अध्यायाच्या शेवटी लिहिले आहेत. लक्षात राहात नसेल तर भावार्थ समजून पाठ करा आणि ईश्वरापाशी दुआ (प्रार्थना) आपल्या मातृभाषेच करा.

- प्रार्थनेची जी पद्धत आम्ही शिकलो त्याचे कारण खालीलप्रमाणे आहे.

**आम्ही प्रार्थना का करावी?**

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

या प्रकारे भक्त मनाला नियंत्रित ठेवणारा, नियोजित वेळेनुसार उपासना करून परमशांती व मृत्यूनंतरचे निवास म्हणजे स्वर्गातील सर्वश्रेष्ठ शांती असलेले निवास प्राप्त करून घेतो. (६:१५)

अर्थात आम्ही स्वत: आपल्या या जीवनात आणि मृत्यूनंतरच्या जीवनातील सफलतेसाठी प्रार्थना करतो.

**मंत्राचे पठण करताना श्वास हळू हळू का सोडला जातो?**

जसे एखाद्या बॅटरीला दोन पोल (Pole) असतात. एक पॉझिटिव्ह (धन) आणि दुसरा निगेटिव्ह (ऋण), तसेच या ब्रह्मांडातदेखील दोन प्रकारच्या शक्ती आहेत. पॉझिटिव्ह व निगेटिव्ह. जेव्हा पॉझिटिव्ह ऊर्जेचे प्रमाण शरीरात जास्त होते तेव्हा मानवाचे विचार पॉझिटिव्ह असतात. त्यात उत्साह व शौर्याच्या भावना असतात. त्याचे मन शांत राहते. आरोग्य चांगले

राहते आणि तो जीवनात इतरांपेक्षा अधिक प्रगती करतो.

जेव्हा शरीरात निगेटिव्ह ऊर्जा असते तेव्हा सर्व काही याच्या विपरीत घडते.

जसे एक चुंबक लोखंडावर विशिष्ट तऱ्हेने हळू हळू घासले असता लोखंडामध्येदेखील चुंबकाची शक्ती निर्माण होते. अशा प्रकारे ईश्वराचे नामस्मरण विशिष्ट पद्धतीने केले असता शरीरात Positive Energy निर्माण होते. प्रार्थनेच्या पद्धतीमध्ये आम्ही तुम्हाला स्वत:मध्ये Positive Energy निर्माण करण्याची एक पद्धत सांगितली आहे.

पश्चिमेकडे तोंड करून प्रार्थना का करावी?

ऋग्वेदाचा एक श्लोक असा आहे;

*इलासास्तवा वयं नाभा प्रार्थव्या आधि।*

(ऋग्वेद ३-२९-४)

या श्लोकाचा भावार्थ असा आहे की, ईश्वराचे ठिकाण पृथ्वीच्या केंद्रस्थानी आहे.

आमचा देश भारताच्या पश्चिमेकडे पृथ्वीचे केंद्र आहे. म्हणून आम्ही पश्चिमेकडे तोंड करून प्रार्थना करतो.

पृथ्वीचे केंद्र कुठे आहे? हे माहीत करून घेण्यासाठी माझे पुस्तक 'पवित्र वेद आणि इस्लाम धर्म'चा अध्याय क्र. चारचे पठण करा.

प्रार्थनेपूर्वी स्नान करणे किंवा तोंड, हात धुण्याचे कारण कोणते?

याचे कारण असे की, आपल्या शरीरावर एक दैविक सुरक्षा कवच बनविणे. ज्यामुळे आपले मन व शरीराचे प्रेतात्म्यांपासून रक्षण होते. अशी दैविक सुरक्षा आम्हाला का प्राप्त होते? हे माहीत करून घेण्यासाठी माझे पुस्तक 'Law of success for both the world' मधील अध्याय क्र. ३२ चे पठण करा.

(माझी २० हून अधिक पुस्तके आपण "www.freeeducation.co.in" वरून डाऊनलोड करू शकता किंवा वाचू शकता.)

**दुआचे श्लोक :**

- *अवनो वृजिना शिषी हि।*

(ऋग्वेद १०:१०५:८)

''हे ईश्वरा, तू आमच्या पापांना आमच्यापासून दूर कर.''

- *अवशसा नि:षसा यत् पराशसोपरिम जाग्रतो यत् स्वपन्त:।* (अथर्ववेद ०६:४५:२)

''जे पाप विश्वासघात, घृणा वा अपवादाने आणि जे पाप जागे वा झोपेत असताना आम्ही केले आहेत. हे ईश्वरा! त्या सर्व अप्रिय दुष्कर्मांना आमच्यापासून दूर कर.''

- *शन: कुरु प्रजाभ्य:* (यर्जुरवेद ७:८६:०३)

''हे प्रभू! आमच्या संततीचे कल्याण कर.''

- *यत्रानन्दाश्च मोदाषच् मुद: प्रमुद आसते।*

*कामस्य यत्राप्ताः कामास्तत्र माममृतं कुधी ।।*
(ऋग्वेद १०:१५१:०५)

''हे प्रभू! आनंद व स्नेह जेथे वास करतात, जेथे सर्व आकांक्षा इच्छा होताच पूर्ण होतात, त्याच अमर लोकात मला निवास दे.''

● *स श्रुतेन गमेमहि* (अथर्ववेद ०१:०१:४)

''हे ईश्वरा! आम्हाला ब्रह्मज्ञान लाभलेले असावे.''

● *ऋत्वः समहदीनता प्रतीपं जगमा शुचे मृला सुक्षत्र मुलय ।।* (ऋग्वेद ७:८६:०३)

''हे सर्वशक्तिमान ईश्वरा! आम्ही आमच्या अज्ञानामुळे पथभ्रष्ट असतो. आमच्यावर कृपा कर.

● (पवित्र कुरआनातील पहिल्या अध्याया (सूरह) (१:१-७) चा भावार्थ गायत्री मंत्रासारखा आहे आणि मी (लेखक) या सूरहचे रोज सकाळी १०० वेळा पठण करतो. विद्वान म्हणतात आणि मी स्वत: अनुभवले आहे की यामुळे आरोग्य (Health) चांगले राहते, धन प्राप्त होते आणि सर्व समस्यांचे आपोआप निराकरण (Solve) होते.) गायत्री मंत्राचे पठण केल्याने तुम्हाला हेच लाभ होऊ शकतात.

************

# संपूर्ण भक्ती कशी करावी?

● भगवद्‌गीताचा श्लोक क्र. ६:१७ आम्ही मागील अध्यायात वाचला. त्याचे पुन्हा एकदा पठण करू.

**श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :**

१. ईश्वराच्या आदेश व नियमांनुसार भोजन केल्याने,

२. जीवनातील प्रत्येक पाऊल ईश्वरी आदेशानुसार ठेवल्याने,

३. जीवनातील सर्व प्रयत्न व कर्मांना ईश्वराच्या आदेश व नियमांशी जोडल्याने,

४. ईश्वरी आदेशानुसार झोपणे व जागरण केल्याने खऱ्या अर्थी उपासना पूर्ण होते. आणि हीच उपासना सर्व अशांती, बेचैनी, दु:ख व विनाशावर उपाय आहे. (६:१७)

● या श्लोकाचे वारंवार पठण करा आणि मनात स्थित करा. हेच सफलतेचे सूत्र आहे.

● सकाळी अंघोळ करून ४० वेळा गायत्री मंत्राचे पठण केल्यानंतर किंवा काही काळ दुसरी एखादी प्रार्थना केल्यानंतर संपूर्ण दिवस मनाला वाटेल तसा व्यतीत केल्याने न ईश्वराची संपूर्ण उपासना होते आणि न मृत्यूपश्चात मुक्ती मिळते.

ईश्वराची संपूर्ण उपासना करण्यासाठी आणि मृत्यूपश्चात मुक्ती मिळविण्यासाठी आमचे २४ तासांचे जीवनदेखील ईश्वराच्या आदेशानुसारच असावे. तेव्हाच तिन्ही लोकांत सफलता मिळेल.

**ईश्वराचे काही आदेश असे आहेत;**

● सकाळी लवकर उठा आमि ईश्वराची प्रार्थना करा. (अथर्ववेद ०६-४७-०१)

● खाणेपिणे आणि झोपण्याच्या बाबतीत मध्यम मार्गाचे (Middle Path) अनुसरण करावे. (भगवद्‌गीता ६:१६)

**या विश्वाला आपले कुटुंब समजा :-**

''उदार चरितानान्तु वसुधैव कुटुम्बकम''

● 'हे माझे आहे, हे तुझे आहे' असे विचार तुच्छ नीच लोकांचे असतात. 'हे जग माझे कुटुंब आहे' अशी विचारसरणी केवळ उच्च विचारांनी प्रेरित लोकांचीच असते. (पवित्र वेद)

**जुगार खेळू नका :-**

● जुगार खेळणाऱ्या व्यक्तीचा श्वास त्याची घृणा करतो आणि त्याची पत्नीदेखील त्याला सोडून देते. जुगाऱ्याला कुणी एक फुटकी कवडीदेखील उधार देत नाही. (ऋग्वेद १०-३४-३)

● हे जुगाऱ्या! जुगार खेळण्याऐवजी शेती कर, त्यातून जो लाभ होईल त्यावर संतोष बाळग. (ऋग्वेद १०-३४-१३)

**व्याजाची देवाणघेवाण करू नका :-**

● अधिक धन प्राप्त करण्याच्या आशेपोटी धन उधार देणाऱ्याचे धन (हे ईश्वर) तू हिसकावून घेतोस. (ऋग्वेद ०३-५३-१४)

**वयस्कांचा आदर करा :-**

● (हे मनुष्यांनो!) तुम्ही तुमच्यापेक्षा वयस्कांचा आदर करा आणि आपल्या मनात चांगले विचार निर्माण करा. आपसांत मतभेद बाळगू नका. मैत्री करा आणि एकत्र राहा. सत्कर्म करत माझ्यापाशी या, मी तुमच्यात समज आणि उच्च विचार निर्माण करीन. (ऋग्वेद १०/१९१/३)

● पुत्राने आपल्या पित्याचा सहयोगी असले पाहिजे आणि आईचा आज्ञाधारक असले पाहिजे. (अथर्ववेद ०३/३०/०२)

● ईश्वर मानवजातीला सुमधुर विचार, सहनशक्ती आणि द्वेषरहित भावनांनी पुरस्कृत करील. जशी गाय आपल्या वासरावर प्रेम करते तसेच प्रेम एकमेकांवर करण्याची सूचना ईश्वर देतो. (अथर्ववेद ०३/३०/०१)

**दान करा :-**

● दान करणारे लोक अमर होतात. त्यांना न कोणत्या गोष्टीची भीती असते न दु:ख. विनाशापासून त्यांना अभय मिळेल. दान केल्याने हे दानशूर लोक सफल होतात आणि मृत्यूपश्चात त्यांना स्वर्गप्राप्ती होते. (अथर्ववेद १०/१९७/०८)

● जे आपल्या कष्टाने कमविलेले अन्न स्वत:च खातात (इतरांना दान करीत नाहीत) ते वाईट मार्गाने कमविलेले अन्न खाण्यासारखेच आहे. (अथर्ववेद १०/११७/०८)

● ईश्वराच्या आदेशांनुसार उपासना केल्याने निश्चितच देवता तुम्हाला जीवनोपयोगी सर्व वस्तू देतील त्यांनी दिलेल्या वस्तू इतरांना न देता अथवा इतरांच्या कल्याणास्तव त्या न वापरता जो त्या वस्तूंचा उपभोग घेतो तो खरे पाहता चोर आहे. (३:१२)

**महिलांसाठी आदेश :-**

● ब्रह्माने तुम्हाला नारी बनविल्यामुळे दृष्टी खाली ठेवा, वर नाही, आपले पाय जुळवून ठेवा, असे वस्त्र परिधान करा ज्यातून तुमचे शरीर कुणी पाहू शकणार नाही. (ऋग्वेद ०८-३३-१९)

● पत्नीने नेहमी पतीशी मधुर वाणीत संभाषण केले पाहिजे. (अथर्ववेद ३/३०/०२)

● तेथे तुम्ही सर्वांत कुशल गृहिणी बना आणि पतीच्या घरात राहून नोकरांवर अधिकार गाजवा. हे नारी! पतीच्या घरात माता बनून सुखी व्हा, पतीशी प्रेमळ संबंध प्रस्थापित करा आणि वृद्धावस्थेपर्यंत आपल्या घरात राज्य करा. (ऋग्वेद १०-८५-२५,२६,२७)

● ईश्वराचे आणखीन अनेक आदेश आहेत, ते तुम्ही इतर ग्रंथांमध्ये वाचा.

*********

# पुनर्जन्माची चर्चा कशासाठी?

भगवद्गीताच्या पवित्र ज्ञानासह आम्ही पुनर्जन्माची चर्चा का करीत आहोत?

● पुनर्जन्मच ती श्रद्धा वा आस्था वा विश्वास आहे ज्यामुळे लोक धार्मिक शिकवणीला अधिक महत्त्व देत नाहीत.

● पुनर्जन्मावर विश्वास ठेवणाऱ्यांना वाटते की त्यांनी केलेल्या पापाची शिक्षा त्यांना याच धरतीवर पुन: पुन्हा जन्म घेऊन भोगावी लागेल. मग चिंता करण्याची आवश्यकताच नाही. या जन्मात विलासी (मनाजोगे) जीवन जगू द्या. दुसऱ्या जन्मात पुण्य करून मुक्ती मिळवू.

● मृत्यूनंतर पुण्य करण्याची दुसरी संधी मिळणार नाही आणि मृत्यूनंतर ईश्वराला आपल्या कर्मांचा हिशोब द्यायचा आहे आणि जर पाप जास्त झाले तर कायमचे नरकात जळावे लागेल; हे सत्य जर लोकांना माहीत झाले तर लोक आपली जीवनशैली, आपली श्रद्धा आणि आपल्या कर्मांच्या बाबतीत चिंता करू लागतील. त्यांना धर्मज्ञान माहीत झाले तर त्याचे पालन करण्याचा प्रयत्न करतील. म्हणून पुनर्जन्माबाबतची चर्चा करणे मला आवश्यक वाटली.

# १८. पुनर्जन्म म्हणजे काय?

**पुनर्जन्म म्हणजे काय?**

● 'पुनर्जन्म' दोन शब्दांपासून बनला आहे. 'पुन्हा' आणि 'जन्म'. 'पुन्हा'चा संस्कृत भाषेत अर्थ होतो 'दुसऱ्यांदा' आणि 'जन्म' म्हणजे तुम्हाला माहीतच आहे की एक नवीन जीवन प्राप्त होणे. म्हणून 'पुनर्जन्म' म्हणजे दुसऱ्यांदा नवीन जीवन प्राप्त होणे.

'पुनर्जन्म' या शब्दाच्या अर्थावरूनच आमच्या लक्षात येते की या शब्दाचा उपयोग धार्मिक ग्रंथांमध्ये मृत्यूनंतर फक्त एकदाच दुसरे जीवन प्राप्त होण्याबाबत करण्यात आला असून पुनः पुन्हा जीवन व मृत्यूसाठी त्याचा उपयोग करण्यात आलेला नाही.

● 'पुनर्जन्म'चा अर्थ मृतकाला मृत्यूनंतर फक्त एकदाच पुन्हा कायमस्वरूपी नवीन जीवन प्राप्त होईल. मात्र असे केवळ एकदाच होईल. पुनः पुन्हा नाही. तरीही लोक 'पुनर्जन्म'चा अर्थ 'मृत्यूपश्चात याच धरतीवर पुनः पुन्हा जन्म घेणे' असाच घेतात आणि यास ते 'आवागमन' (जन्ममरण) म्हणतात.

● आता लोक 'पुनर्जन्मा'चा अर्थ 'जन्ममरण' घेतात, जो चुकीचा आहे. मात्र याच चुकीच्या अर्थाला प्रसिद्धी मिळाली आहे. त्यामुळे आम्हीसुद्धा या पुस्तकात जेव्हा कधी 'पुनर्जन्म'चा शब्दप्रयोग करू तेव्हा आम्हीसुद्धा यास 'जन्ममरणा'च्या अर्थासाठीच प्रयोग करू, जेणेकरून लोकांना माझे मत सहजपणे समजावे.

**पुनर्जन्माची विचारधारा (Concept) अशा प्रकारे आहे.**

१) मानव मृत्यूनंतर याच धरतीवर पुन्हा जन्माला येईल. परंतु त्याचा दुसरा जन्म त्याच्या पापांनुसार असेल. पहिल्या जन्मात जेवढे जास्त पाप केले असतील, तेवढ्याच प्रमाणात दुसऱ्या जन्मात त्याला अपमानजनक जीवनशैली प्राप्त होईल.

२) मृत्यूच्या वेळी जर सूर्य दक्षिणेला असेल तर एका सज्जन व पवित्र मृतकालादेखील स्वर्गाचा मार्ग मिळणार नाही. सूर्य जेव्हा उत्तरेकडे होईल तेव्हाच एका सज्जन पुरुषाला स्वर्गाचा मार्ग प्राप्त होईल.

३) बृहदारनायक उपनिषदात लिहिले आहे की ज्या लोकांना पंचाग्नी विद्या येते आणि वनात राहून ईश्वराची प्रार्थना करतात, केवळ त्याच लोकांना स्वर्गप्राप्ती होईल.

उर्वरित सर्व लोक मृत्यूपश्चात जन्ममरणाच्या चक्रात अडकून राहतील.

पुनर्जन्माची आणखीन अनेक विचारधारा आहेत, मात्र या लहानशा पुस्तकात त्या सर्व लिहिणे शक्य नाही.

**पुनर्जन्माचा दृष्टिकोन का चुकीचा आहे?**

● पवित्र वेदच हिंदू धर्माचे सर्वांत प्रमाणिक (Authentic) ग्रंथ आहेत. आणि वेदांमध्ये जन्ममरणा (आवागमन) च्या शिकवणींचे अजिबात वर्णन आलेले नाही. या उलट जन्ममरणाचा वेदांमध्ये विरोध करण्यात आला आहे.

● पुनर्जन्माचे वर्णन खालील तीन ग्रंथांमध्ये आढळते.

१) महाभारत
२) छांदोग्य उपनिषद
३) बृहदारण्यक उपनिषद

● महाराज विकासानंद ब्रह्मचारी हे हिंदू धर्माचे एक विद्वान व प्रसिद्ध आचार्य आहेत. त्यांनी या तिन्ही ग्रंथांचे अध्ययन केल्यानंतर त्यांना आढळले की तिन्ही ग्रंथांमध्ये दोन्ही प्रकारच्या शिकवणी आहेत अथवा पुनर्जन्माचे वर्णन आहे. अर्थात या ग्रंथांमध्ये पवित्र वेदांप्रमाणेच पुनर्जन्म नसल्याचा उल्लेखदेखील आहे आणि पुनर्जन्म असल्याचासुद्धा उल्लेख आहे.

तसेच पुनर्जन्म असलेल्या श्लोकांमध्ये खूपच मतभेद आहेत. अथवा वेगवेगळ्या श्लोकांमध्ये वेगवेगळे मत मांडण्यात आले आहे.

महाराज विकासानंदजी म्हणतात की सत्य स्थिर व समान असते आणि असत्य अस्थिर व बदलत राहते.

जन्ममरणा (आवगमन) चा दृष्टिकोन वा विश्वास वा बोध हे असत्य आहे म्हणून बदलत राहते. (वेगवेगळ्या ग्रंथांमध्ये वेगवेगळे वर्णन आहे.)

तसेच जन्ममरण नसणे ही पवित्र वेदांची शिकवण आहे आणि वेदच सर्वांत प्रमाणित आहेत, त्यामुळे वेदांची शिकवणच खरी मानली जाईल.

महाराज विकासानंदजी यांनी एक पुस्तक लिहिले आहे त्याचे नाव आहे 'पुनर्जन्म एक रहस्य'. या पुस्तकात त्यांनी महाभारत, छान्दोग्य उपनिषद आणि बृहदारण्यक उपनिषदात सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या शिकवणींचे वर्णन केले आहे. अर्थात पुनर्जन्म नसल्याच्या बाबतीत वेदांनुसार शिकवणींचेही वर्णन आहे आणि पुनर्जन्म असल्याच्या शिकवणींचेदेखील वर्णन आहे.

आम्ही महाराज विकासानंद यांच्या पुस्तकाचे पठण करूनच या पुस्तकामध्ये पुनर्जन्माच्या बाबतीत लिहिले आहे.

सर्वप्रथम आपण महाभारताचे अध्ययन करू आणि पाहू या की यात पुनर्जन्माच्या बाबतीत काय लिहिले आहे. मात्र यापूर्वी आम्ही सूर्याचे उत्तर व दक्षिणेकडे असण्याचा मरणाऱ्या व्यक्तीच्या मुक्तीवर कोणता प्रभाव पडतो याबाबतसुद्धा काही सांगू. या माहितीमुळे आपणास भीष्म पितामह यांचे शरशैय्येवर पडून राहण्याचे कारण लक्षात येईल.

********

# १९. सूर्य उत्तरेला असण्याचा काय अर्थ आहे?

● महाभारतातील युद्धासमयी सूर्य दक्षिणेला होता. गंभीर स्वरूपात जखमी होऊनसुद्धा भीष्म पितामह यांनी आपला मृत्यू सूर्य उत्तरेला येईपर्यंत टाळला. तेव्हा आपण या अध्यायात हे समजून घेण्याचा प्रयत्न करू की सूर्य उत्तरेला असण्याचा काय अर्थ आहे?

● हजारो वर्षांपासून उत्तर भारतातील लोकांना पृथ्वीच्या उत्तर भागातील ऋतुंबाबत संपूर्ण माहिती होती.

औरंगाबादमध्ये पवनचक्कीजवळ एका रशियन वली (साधू, महात्मा) ची मजार (कबर) आहे. म्हणजे प्राचीन काळात लोक रशिया (Russia) हून भारतातसुद्धा येत होते. म्हणून भारतीय लोकांना या गोष्टीची माहिती होती की जेव्हा सूर्य उत्तरेला असेल तेव्हा पृथ्वीच्या उत्तर भागात दिवस मोठा व रात्र लहान असते. नॉर्थ पोल (Northpole) वर तीन महिने दिवस २४ तासांचा असतो आणि रात्र नसतेच.

● आमच्या देशातदेखील उत्तर भारतात उन्हाळ्यात जेव्हा सूर्य उत्तरेला असतो तेव्हा दिवस मोठा आणि रात्र लहान असते.

● वर्षातील सहा महिने सूर्य उत्तरेला आणि दिवस मोठा व उज्ज्वलित असतो. म्हणून समजून सांगण्यासाठी वेदांमध्ये हे उदाहरण देण्यात आले आहे की स्वर्गाचे मार्ग उज्ज्वलित आहेत आणि ते इतके उज्ज्वलित आहेत जसा सूर्य उत्तरेला असावा.

● सूर्याचे उत्तरेला असणे हे उज्ज्वलित असण्याचे फक्त उदाहरण आहे. सूर्याच्या उत्तरेला वा दक्षिणेला असण्याचा स्वर्गाच्या मार्गांचा कसलाही संबंध नाही.

● स्वर्गाच्या मार्गाचे वर्णन आले आहे असे श्लोक पुढीलप्रमाणे आहेत.

● ''आम्ही सर्व जण कोणत्या मार्गाने जाणार आहोत तो (मार्ग) यमदेव (अर्थात परलोकाचा मालक वा ईश्वर) अगोदरच दाखवित असतो. तो मार्ग कधीही नष्ट होत नाही. ज्या मार्गाने पूर्वीचे लोक गेले आहेत, प्रत्येक प्राणी आपापल्या कर्मांनुसार त्याच मार्गाने जातील.'' (ऋग्वेद १०-१४-२)

● ''जे लोकांना माहीत आहे, ते इतरांच्या अगोदर जीवन प्रदान करणारा श्वास घेऊन या शरीरातून निघून आकाशात जाऊन आपल्या सर्व सहकाऱ्यांसमवेत राहतात. ज्या मार्गांवरून देवतांनी प्रवास केला होता तेथूनच स्वर्गात पोहोचतात.'' (अथर्ववेद : २-३४-५)

● ''पवित्र करणाऱ्यांद्वारे पवित्र होऊन हाडे नसलेल्या शरीरासह ते प्रतापी व प्रज्वलित होऊन प्रकाशाच्या जगतात पोहोचतात. त्यांच्या प्रकाशनाऱ्या शरीरांना आग जाळत नाही. स्वर्गलोकात त्याच्यासाठी मोठा आनंद आहे.'' (अथर्ववेद : ४-३४-२)

● ''ईश्वराला ओळखणारे आणि त्याची प्रार्थना करणारे मनुष्य मृत्यूनंतर ईश्वराकडे उज्ज्वल मार्गाने (अशा प्रकारे) जातील की तेथे (असे वाटेल जसे) सहा महिने सूर्य उत्तरेला गेला आहे, (ज्यामुळे) दिवस आहे, उजेड आहे आणि प्रकाश पसरला आहे.'' (भगवद्‌गीता ८:२४)

● ''मी वेदांमध्येदेखील मृत्यूनंतर या विश्वातून जाण्यासाठी दोन मार्ग सांगितले आहेत. या दोन्ही मार्गांमध्ये नि:संदेह एक उज्ज्वल मार्ग आहे आणि दुसरा अंधकारमय मार्ग आहे. एक मार्ग जन्म व मृत्यू पुन: पुन्हा न परतविणाऱ्या निवासा (स्वर्गा) कडे जातो आणि दुसरा अंधकारमय मार्ग पुन: पुन्हा जन्म व मृत्यू परतविणाऱ्या नरकाच्या निवासाकडे जातो.'' (भगवद्‌गीता ८:२६)

● वर दिलेल्या श्लोकांवरून आपल्या लक्षात येईल की,

१) यमदूत मृतकाला स्वर्ग व नरकाचा मार्ग अगोदरच सांगून टाकतो.

२) हे स्वर्ग व नरकाचे मार्ग त्या व्यक्तीच्या कर्मांच्या आधारे असतील.

३) स्वर्गाचे मार्ग तसेच उज्ज्वलित होतील जसे सूर्य उत्तरेला असतो तेव्हा दिवस अतिशय उज्ज्वलित असतात.

४) सूर्य उत्तर व दक्षिणायनात असण्याचा स्वर्गाच्या मार्गाशी कसलाही संबंध नाही.

● ''सूर्य उत्तर वा दक्षिणेला असण्याचा स्वर्गाच्या मार्गाशी कसलाही संबंध नाही.'' हे तथ्य (Fact) अनेक विद्वानांना मान्य आहे. जसे- आचार्य शकरजींनी आपले पुस्तक 'वेदान्त दर्शन'मध्ये लिहिले आहे की छान्दोग्य उपनिषदात उल्लेख आहे की आत्मा सूर्यकिरणांच्या साहाय्याने वरच्या दिशेला प्रवास करतो. परंतु जर तुम्ही म्हणाल की रात्री सूर्यकिरणे नसतात, तर ते चुकीचे आहे. कारण सूर्यकिरणे मनुष्याच्या नाडीच्या उष्णतेशी मनुष्य जिवंत असेपर्यंत निरंतर संलग्न असतात.

अथवा मनुष्य जोपर्यंत जिवंत असेल तोपर्यंत त्याच्या नाडीतून निघणारी ऊर्जा सूर्याच्या ऊर्जेच्या निरंतर संपर्कात असते. त्यामुळे कोणत्याही वेळी मृत्यू झाला तरी एका सज्जन मनुष्यास परलोकाचा उज्ज्वलित मार्ग शोधण्यात कसलाही अडथळा येत नाही. म्हणून जेव्हा सूर्य उत्तरेला असेल तेव्हाच मुक्ती मिळेल असा विचार करणे चुकीचे आहे.

('पुनर्जन्म एक रहस्य', पृष्ठ क्र. ११)

********

# २०. महाभारतात पुनर्जन्माचा उल्लेख

● महाकाव्य 'महाभारत'चे लेखक श्री महर्षि वेद व्यासजी यांनी स्वत: या महाकाव्यात पुनर्जन्म होतो असे स्पष्टपणे कुठेही लिहिलेले नाही. परंतु या महाकाव्यात भीष्म पितामह यांचा मृत्यू पुनर्जन्माकडे निर्देश करतो. म्हणून भीष्म पितामह यांच्या मृत्यूच्या बाबतीत जे काही महाभारतात लिहिले गेले आहे ते किती सत्य आहे, याचा आपण शोध घेण्याचा प्रयत्न करू या.

● भीष्म पितामह यांची कथा थोडक्यात अशी आहे. महाभारताच्या युद्धात ते कौरवांचे सेनापती होते. युद्धाच्या सुरूवातीच्या दहा दिवसांत ते अत्यंत वीरासारखे लढले आणि पांडवांच्या लक्षावधी सैनिकांचा वध केला. परंतु जेव्हा भीष्म पितामह युद्धात अर्जुनाच्या बाणांनी जखमी होऊन आपल्या रथावरून खाली पडले तेव्हा त्यांच्या शरीरात इतके बाण आरपार घुसले होते की त्यांचे शरीर जमिनीवर पडण्याऐवजी बाणांवरच अधांतरी राहिले. असे वाटत होते की ते बाणांच्या चटईवर झोपले आहेत.

● महाभारताच्या युद्धाच्या वेळी सूर्य दक्षिणेला होता. अर्थात दक्षिणायन सुरू होते. कथेनुसार भीष्म पितामह यांचा असा विश्वास होता की अशा वेळी जर एका सज्जन पुरुषाचाही मृत्यू होतो तर तोदेखील स्वर्गाचा मार्ग प्राप्त करू शकत नाही. या कल्पनेमुळे भीष्म पितामह यांनी आपल्या पित्याकडे आपल्या मृत्यूला सूर्य उत्तरेला येईपर्यंत अर्थात उत्तरायनापर्यंत पुढे ढकलण्याची आज्ञा मागितली आणि आज्ञा मिळाल्यानंतर ते अनेक दिवसांपर्यंत शरशैय्येवर पडून राहिले, मग देहत्याग केला.

● महाराज विसासानंद ब्रह्मचारीजी यांच्या संशोधनानुसार भीष्म पितामह यांच्या शरशैय्येवरील मृत्यूच्या बाबतीत जे महाभारतात श्लोक आहेत ते प्रक्षिप्त आहेत. अर्थात नंतर जोडण्यात आले आहेत. ('पुनर्जन्म एक रहस्य', पृ.क्र.८)

● महाराज यांच्या संशोधनानुसार भीष्म पितामह जेव्हा गंभीर स्वरूपात जखमी होऊन रथावरून पडले होते तेव्हाच त्यांचा मृत्यू झाला होता.

● महाराज विकासानंद ब्रह्मचारीजी यांच्यानुसार, जेव्हा सूर्य दक्षिणेला असतो तेव्हा मरणाराला मुक्ती मिळत नाही, हा विश्वासदेखील खोटा आहे.

● महाराजजींनी हे दोन्ही चुकीचे असण्याची जी कारणे वेद व स्वयं महाभारतासारख्या महाकाव्यामधून सांगितली आहेत ती पुढीलप्रमाणे आहेत.

**भीष्म पितामह यांच्या मृत्यूचे वर्णन :-**

● महाराज विकासानंद ब्रह्मचारीजी यांच्यानुसार, भीष्म पितामह यांचे पिता

शंतनु यांना इच्छामृत्यूचे वरदान देण्याचा अधिकार नव्हता. कारण शंतनु यांचे दोन पुत्र अगोदरच मरण पावले होते.

जर शंतनु यांना मृत्यू पुढे ढकलण्याचा अधिकार असता तर त्यांचे दोन्ही पुत्र का मरण पावली?

● महर्षी श्री वेद व्यासजी हिंदू धर्माचे सर्वांत श्रेष्ठ विद्वान आहेत. महाभारत महाकाव्य हे त्यांनी लिहिले आहे. भगवद्‌गीताला ग्रंथरूपात त्यांनीच लिहिले आहे. चारी वेदांमध्ये ऋचा व सूक्तांना त्यांनीच क्रमबद्ध केले आहे. त्यांनी १७ पुराण लिहिले आहेत. भविष्य पुराण त्यांपैकीच एक.

● वेद व्यासजींनी केवळ २४००० श्लोक महाभारतात लिहिले होते. आज त्यांची संख्या एक लाखाहून अधिक आहे. नंतर त्यात या ७५००० हून अधिक श्लोकांची भर घालण्यात आली आहे. ('पुनर्जन्म एक रहस्य', पृ.क्र. १४)

● महाभारतातील १८ पर्वांपैकी एका पर्वाचे नाव 'भीष्म पर्व' आहे. या पर्वाचे चार उपपर्व आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत,

१) जम्बुखंड विनिर्माण पर्व
२) भूमी पर्व
३) श्रीमद्‌भगवद्‌गीता पर्व
४) भीष्म वध पर्व

● महाराज विकासानंद ब्रम्हचारीजी म्हणतात की, गंभीर स्वरूपात जखमी होऊन जीवित राहणे ही एक अद्‌भूत व महत्त्वपूर्ण घटना आहे.

जर खरोखरच असे घडले असते तर वेद व्यासजींनी त्याकडे कधीच दुर्लक्ष (Neglect) केले नसते. मात्र असे घडले नव्हते. म्हणून त्यांनीसुद्धा त्या पर्वाचे नाव शरशैय्या पर्व न ठेवता 'भीष्म वध पर्व' असे ठेवले.

● महाभारताच्या सुरूवातीच्या दोन पर्वांचे नाव पर्व संग्रह आहे. या दोन्हींमध्ये 'महाभारत' ग्रंथातील अध्यायांचे व घटनांचे विस्तृत वर्णन (Details of Topics) आहे.

● पर्व संग्रहनुसार भीष्म पर्वात एकूण ११७ अध्याय व ५८८४ श्लोक हवे होते. मात्र सध्या अध्यायांची संख्या १२२ व श्लोकांची संख्या ६१०० आहे. महाराज विकासानंदजी म्हणतात की, हे या गोष्टीचा पुरावा आहे की महाभारतात नंतर श्लोक व अध्यायांची भर घालण्यात आली आहे. ('पुनर्जन्म एक रहस्य', पृ.क्र. ६)

● भीष्म पितामह यांच्या शरशैय्येवर झोपण्याची घटना नंतर घुसडण्यात आली आहे. याचे काही पुरावे पुढीलप्रमाणे आहेत;

● भीष्म पर्वाचे अध्याय १३ व १४ मध्ये संजय धृतराष्ट्राला भीष्म पितामह यांच्या वधाची माहिती सांगत आहेत. मात्र असे असायला हवे होते की दोन्ही अध्यायांमध्ये केवळ भीष्म पितामह

बाणांच्या अंथरुणावर (शरशैय्येवर) पडल्याचे वर्णन आहे. मात्र अध्याय १३ मध्ये चार वेळा आणि अध्याय १४ मध्ये १३ वेळा भीष्म पितामह यांच्या मृत्यूचे वर्णन आले आहे. अध्याय १३ चे ते चार श्लोक पुढीलप्रमाणे आहेत;

*१. निहंत भीष्म भरतानां पितामह ११(१३/२)*

*२. हतो भीष्मः शान्तनवो भरतानां पितामहः ११(१३/३)*

*३. सशेते निहतो राजन संख्ये भीष्मः शिखण्डिना ११(१३/५)*

*४. न हतो जाम दग्न्येन स हनोहृदय शिखण्डिना ११ (१३/२)*

● अशा प्रकारे अगोदर पर्व संग्रहचे श्लोक क्र.१८३ व १८४ मध्येसुद्धा भीष्म पितामह यांच्या शरशैय्येवर पडण्याऐवजी मृत्यूचे वर्णन आहे. ते श्लोक पुढीलप्रमाणे आहेत.

*१) स्वयं मृत्यु विहिंत घार्मिकेम। (महा:आदि पर्व-१/१८३)*

*२) यथोश्रोवं भीष्ममत्यान्तशूरं हतं पार्थे नाह वेष्ब प्रधृश्यम। (आदि-१/८४)*

● महाराज विकासनंदजी लिहितात की, महाभारताचे लेखक श्री वेद व्यासजी यांनी महाभारत महाकाव्यात अनेक महापुरुषांच्या मृत्यूच्या घटनांचे वर्णन केले आहे. जसे अभिमन्यू, द्रोणाचार्य, कर्ण इत्यादी. मात्र श्री वेद व्यासजी यांनी स्वर्गारोहण पर्व, अध्याय ५ मंत्र क्र. २७-२६ मध्ये या सर्वांना स्वर्ग प्राप्त झाल्याचे लिहिले आहे. परंतु त्या समयी सूर्य दक्षिणेला होता. मग भीष्म पितामह यांना गंभीर स्वरूपात जखमी होऊनसुद्धा अनेक दिवसांपर्यंत शरशैय्येवर पडून राहण्याचे काय कारण होते?

काहीही कारण नव्हते.

● श्री वेद व्यासजी यांनी संपूर्ण महाभारतात कुठेही कुणाच्या पुनर्जन्माचे वर्णन केलेले नाही. म्हणून महाभारतात भीष्म पितामह यांच्या पुनर्जन्माच्या भीतीपोटी शरशैय्येवर पडून राहण्याची घटना ही नंतर महाभारतात घुसडण्यात आली आहे.

आणि हे योग्य नाही.

● वर आम्ही जे काही सांगितले त्याचा सारांश असा की हिंदू धर्माचे सर्वांत महान विद्वान महर्षी श्री वेद व्यासजी याचा पुनर्जन्मावर विश्वास नव्हता. त्यांची कुणाला याची शिकवण दिली नाही आणि न त्याबाबत कोणत्या ग्रंथात लिहिले.

● महाभारतात भीष्म पितामह यांचे आपला मृत्यू पुनर्जन्माच्या भीतीपोटी पुढे ढकलण्याच्या ज्या घटनेचे वर्णन आहे, ते महाभारतात नंतर घुसडण्यात आले आहे. ती वेद व्यासजींची शिकवण नाही.

**********

# २१-छांदोग्य उपनिषदमध्ये पुनर्जन्माचा उल्लेख

● महर्षी वेद व्यासजींच्या एका शिष्याचे नाव ऋषी वैश्यंम्पायन होते आणि ऋषी वैश्यंम्पायन यांच्या शिष्याचे नाव ऋषी तांड होते. तांडने सामवेदाच्या एका शाखेचे संशोधन केले, मग त्यावर भाष्य केले त्यास 'तांड शाखा' म्हटले जात होते.

● या तांड शाखेच्या एका भागाचे नाव छांदोग्य उपनिषद आहे. या छांदोग्य उपनिषदात दहा भाग आहेत. पैकी ८ भागांना एका ग्रंथाचे स्वरूप देण्यात आले आहे त्यास 'छांदोग्य उपनिषद' म्हणतात.

● छांदोग्य उपनिषदात ६ अध्याय १६२ खंड आणि ६२८ मंत्र आहेत. या उपनिषदात दोन ठिकाणी परलोकाचे मार्ग आणि पुनर्जन्माचा विस्ताराने उल्लेख आहे.

अध्याय ५ खंड १० च्या सर्व १० मंत्रांमध्ये परलोकाच्या मार्गांची व्याख्या आहे. अध्याय ८ मधील खंड ६ च्या पाचव्या मंत्र्यातसुद्धा परलोकाच्या मार्गांचा उल्लेख आहे.

● छांदोग्य उपनिषदाच्या अध्याय ५ व खंड १० च्या ८ श्लोकांचे वर्णन खालीलप्रमाणे आहे;

**मंत्र क्र.-१**

''*तद्य इत्थं विद्रुर्ये चेमेहरण्ये श्रद्धा तप इरयुपासते ते हर्चिषममि संमवन्चर्चिपोहरह आपूर्यमाण-पक्षमा पूर्यमाण पक्षा धान्श डु दङ् डेति मासांस्तान् ।।*''

**अनुवाद:-** जे पंचाग्नीचे ज्ञान प्राप्त करतात आणि जंगलात राहून खऱ्या श्रद्धेने प्रार्थना करतात ते मृत्यूनंतर तेज प्रकाशकिरणांवर स्वार होतात. किरणांपासून दिवस, दिवसांपासून शुक्ल पक्ष, मग शुक्ल पक्षपासून उत्तरायणचे सहा महिने प्राप्त करतात. (अध्याय ५, खंड १०, श्लोक १)

**मंत्र क्र.- २**

''*मासेभ्य संवत्सर संवत्सरा दादित्य मादित्याच्चन्द्रमसं चन्द्रमसो विद्युतं तत्पुरुषों हमानवः स इनान्ब्रह्म गमयत्येश देवयानः पन्था इति ।।*''

**अनुवाद:-** उत्तरायणाच्या सहा महिन्यांनंतर संवत्सर प्राप्त करतात. संवत्सरापासून आदित्य, मग आदित्यापासून चंद्रमा. मग चंद्रमापासून विद्युत प्राप्त करतात. तेथे असलेला एक पवित्र आत्मा मृतकाची परब्रह्माशी भेट करवितो. तेथेच स्वर्गाचा मार्ग अर्थात देवयान आहे. (श्लोक नं. २)

**मंत्र क्र. १ व २ चा भावार्थ:-**

अर्थात स्वर्गाचा मार्ग त्यांनाच प्राप्त होतो जे जंगलात पंचाग्नी ज्ञानाच्या माध्यमाने प्रार्थना करतात.

**मंत्र क्र.-३**

''*अथ य इमे भ्राम इष्टापूर्ते दन्तमिव्युपासते ते धूममभिसं भवन्ति धूमाद्रत्रिं रात्रेर पर पक्षम परपक्षाद्यान्ष ड्दक्षिणैति मासांस्तान्नैते संवत्सर गभि प्राग्नुवन्ति ।।*''

**अनुवाद:-** आणि जे लोक शहरे व गावांमध्ये राहतात आणि जे ईश्वराच्या प्रार्थनेद्वारा किंवा समाजसेवेच्या माध्यमातून किंवा दानपुण्याच्या माध्यमातून प्रार्थना

करतात, ते मृत्यूनंतर धुरावर स्वार होतात. धुरातून रात्रीत, मग रात्रीतून कृष्णपक्ष प्राप्त करतात. या लोकांना संवत्सर मिळत नाही.

**मंत्र क्र.-४**

*"मासेभ्यः पितृलोकं पितृलोकादाश माकाशाच्चन्द्रमसमेष सोमो राजा तददेवाना मड्नं तं देवा भक्ष्यन्ति ।।"*

**अनुवादः-** कृष्णपक्षातून ते दक्षिणायन ग्रहण करतात. (दक्षिणायन म्हणजे जेव्हा सूर्य दक्षिणेला असतो.) मग ते पितृलोक प्राप्त करतात, मग पितृलोकातून आकाश, मग आकाशातून चंद्रमा प्राप्त करतात. हा चंद्रमाच राजा सोम आहे. तो सर्वांचे अन्न आहे. सर्व देवगण त्याचे भक्षण करतात.

**मंत्र क्र.-५**

*" तस्मिन्या वत्सं पात भुषित्वा थैत मेवाध्यानं पुनर्निबर्तन्ते यथेतमाकाशा द्वायुं वायुर्भूत्वा घूमो भवति घूमो भूत्वाभ्रं भवति ।। "*

**अनुवादः-** जोपर्यंत सत्कर्मांच्या बदल्यात चांगले दिवस व्यतीत करण्याचा काळ असतो, ते चंद्रमंडळात राहतात. मग त्यानंतर सांगितलेल्या मार्गाने परततात. अगोदर ते आकाशात येतात, मग हवेवर स्वार होतात. मग धुरावर स्वार होतात. मग धुरापासून ढग बनतात.

**मंत्र क्र.-६**

*"अभ्रं भूत्वा मेधो भवति मेधो भूत्वा प्रवर्षति त इह व्रीहियवा औषधि वनस्पत यस्ति लाभाषा इति जायन्ते हतो वै खलु दुर्निश्प्रपतरं यो घन्नभन्ति यो रेतः सिन्चति तध्दुय एवं भवति ।। "*

**अनुवादः-** मग ढगांपासून पावसाच्या स्वरूपात बरसतात. त्या वेळी ते सर्व आत्मे या जगात तांदूळ, जव, औषधे, झाडेझुडपे, उडदाची डाळ आणि तीळ वगैरे बनून प्रकट होतात. मग त्या सर्व वस्तू जे सजीव खातात आणि जेव्हा ते अपत्य देतात तेव्हा ते सर्व आत्मे त्याच सजीवांच्या अपत्यांच्या रूपात जन्म घेतात. अशा जन्ममरणा (आवागमन) तून बाहेर पडणे अवघड असते.

**मंत्र क्र.-७**

*"तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापघेरन्ब्रह्मणयोनिं वा क्षत्रिययोनि वा वेश्य यौनिं वाथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमापद्येरन् श्रयोनिं वा सूकरयोनिं व चण्डालयानिं वा ।।"*

**अनुवादः-** त्या सर्व आत्म्यांमध्ये जे सत्कर्म करणारे असतात त्यांना चांगला जन्म लाभतो. जसे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इत्यादी. आणि जे कुकर्म करणारे असतात ते आणखीन वाईट स्थितीत जन्माला येतात. जसे डुक्कर, कुत्रा, चांडाळ.

**मंत्र क्र.-८**

*"अथतयोः पर्थानि कतरेण च न तानिमानि क्षुद्राण्यसकृदावर्तीनी भूतानि भवन्त"*
(छा:-५/१०/८)

**अनुवादः-** ज्या आत्म्यांना हे दोन्ही मार्ग (म्हणजे अंधकार व उज्ज्वलित मार्ग) प्राप्त होत नाहीत, त्यांना तिसरा मार्ग सापडतो, ज्याला तृतीय मार्ग म्हणतात. हा मार्ग प्राप्त करणारे कीड्यामुंग्यांच्या स्वरूपात जन्माला येतात. त्यांच्या जीवनात मरणे आणि जगणे हीच दोन कामे असतात. म्हणून गृहस्थाश्रमाची घृणा केली पाहिजे आणि जंगलातील जीवन अनुसरले पाहिजे. (श्लोक नं ८)

● वर वर्णन करण्यात आलेल्या श्लोकाच्या अनुवादाचे आम्ही जर पुन्हा पठण केले तर तीन गोष्टी लक्षात येतात.

१. व्यक्तीस पंचाग्नी विद्या आली पाहिजे.

२. व्यक्ती पंचाग्नी विद्या प्राप्त करून जंगलात राहणारी असावी.

३. व्यक्ती पंचाग्नी विद्या प्राप्त करून जंगलात राहून श्रद्धेसह उपासना व भक्ती करणारी असावी. अशा व्यक्तीसच मृत्यूनंतर देवयान म्हणजे स्वर्गाचा मार्ग प्राप्त होईल.

● विकासानंद ब्रह्मचारीजी म्हणतात की, स्वर्गाचा मार्ग प्राप्त करण्याच्या तीन अटी भीष्म पितामह यांच्यात होत्या काय? म्हणून कदाचित भीष्म पितामह यांनादेखील स्वर्गाचा मार्ग मिळाला नाही आणि जर भीष्म पितामह यांना स्वर्गाचा मार्ग मिळाला असेल तर या तीन अटी चुकीच्या आहेत.

● महाराजजी म्हणतात, जे लोक समाजात राहून ईश्वराची उपासना करतात आणि मानवसेवेचे कार्य करतात, आणि दानपुण्याचे कार्य करतात, त्यांचे हे कार्य वाईट होते काय ज्यामुळे त्यांना स्वर्गाचा मार्ग मिळाला नाही? समाजात राहून पुण्यकार्य करणे पाप आहे काय?

जर या ब्रह्मांडाच्या विधात्या (ईश्वर) ने मुक्तीचा मार्ग फक्त जंगलात राहून उपासना केल्यानेच ठेवला असता तर आज मनुष्य जन्माला आले नसते, आम्ही आणि तुम्ही जन्मलो नसतो.

● जंगलात राहणे वेदांची शिकवण नाही. म्हणून जुन्या काळात विद्वान गाव व शहरात राहात होते आणि त्यांच्या जीवनातसुद्धा पत्नी व मुलांचे वर्णन आढळते. (उदा. ऋग्वेदाच्या दुसऱ्या मंडलाच्या सर्व मंत्रांमध्ये याचेच वर्णन आहे.)

● अशा प्रकारे ऋग्वेदाच्या सहाव्या मंडलापासून ११, १२, १३, १४, १७, २४ पर्यंत सर्व सूक्तांच्या शेवटी लिहिण्यात आले आहे की, "आम्ही आमच्या पुत्रांबरोबर १०० वर्षांपर्यंत सुखमय जीवन व्यतीत करावे." म्हणजे पत्नी व मुलांबरोबर सुखी जीवन व्यतीत करणे हे ईश्वराचे एक वरदान आहे, त्यासाठी प्रार्थना केली जाते.

वेद सत्य आहेत. आणि जे काही वेदांच्या ज्ञानाविरूद्ध लिहिले आहे ते सत्य असू शकत नाही. म्हणून जंगलात राहून उपासना केल्यानेच स्वर्ग प्राप्त होईल, ही गोष्ट असत्य आहे.

● देवयान व पितृयान या दोन्ही मार्गांव्यतिरिक्त एक तिसरा मार्ग आहे, हे आपण छांदोग्य उपनिषद (८:१०:०५) मध्ये वाचले. ही गोष्टदेखील या उपनिषदात चुकीची आहे, कारण वेद व भगवद्‌गीतामध्ये फक्त दोनच मार्गांचे वर्णन आहे. उदा. भगवद्‌गीतामध्ये लिहिले आहे,

● "मी वेदांमध्येदेखील (मृत्यूनंतर) या विश्वातून (जाण्यासाठी दोन) मार्ग (सांगितले आहेत.) या दोन्ही मार्गांमध्ये नि:संदेह एक उज्ज्वल (सफलतेचा) मार्ग आहे आणि दुसरा अंधकारमय (असफलतेचा) मार्ग आहे. एक मार्ग (जन्म व मृत्यू पुन: पुन्हा) न परतविणाऱ्या निवासा (स्वर्गा) कडे जातो आणि दुसरा (अंधकारमय मार्ग आहे जो) पुन: पुन्हा (जन्म व मृत्यू) परतविणाऱ्या (नरकाच्या) निवासाकडे जातो." (भगवद्‌गीता ८:२६)

जर तिसऱ्या मार्गाचे वर्णन कोणत्याही वेदात नाही तर या उपनिषदमध्ये कुठून आले? छांदोग्य उपनिषदाचे वेदांच्या शिकवणीनुसार असलेले श्लोक छांदोग्य उपनिषदमध्ये आतापर्यंत जे आम्ही वाचले त्या सर्वांमध्ये वेदांच्या उपदेशांविरोधी वर्णन होते. आता आम्ही त्याच उपनिषदमध्ये परलोकाचे आणखी काही वर्णन वाचू जे वेदांच्या उपदेशांनुसार आहे. ते वर्णन पुढीलप्रमाणे आहे;

● *''अथ सत्र एरात् अस्मात भारीरम उत्कामति अथ एतैः एवं रश्मिभिः उर्ध्वम आकमते, सः ओम इति व द्रउत वा मीयते, स यावत क्षिप्यत, मनः तावत् आद्रिव्यम मच्छति। एतत् वै खलू लोक द्वारम विदुषाम प्रपदनम् निरोधः अविदृषाम।''* (छा.-८/६/५)

● याच छांदोग्य उपनिषदात अध्याय ८ मंडल ६ व मंत्र ५ मध्ये वर्णन आहे की, जेव्हा आत्मा शरीरातून निघतो तेव्हा प्रकाशाच्या माध्यमातून वरच्या दिशेने प्रवास करतो. जर एखादा मनुष्याचा मृत्यू ईश्वराचे स्मरण करताना झाल्यास निश्चितच तो वरच्या दिशेने प्रवास करतो. तो आदित्य नामक लोकात तेवढ्याच जलद गतीने पोहोचते जेवढ्या काळात मन एका विचारातून दुसरा विचाराकडे जाते. (म्हणजे अति जलद) हे आदित्य लोकच स्वर्गाचा मार्ग आहे. यात फक्त विद्वान व तपस्वीच प्रवेश करतील. यात अज्ञानी प्रवेश करू शकत नाहीत. ('पुनर्जन्म एक रहस्य', पृ.क्र. २२)

● आता छांदोग्यच्या या उपदेशावर लक्ष द्या. हा उपदेश वेदांशी मिळताजुळता आहे. एकाच उपनिषदात दोन प्रकारच्या शिकवणी कशा असू शकतात? आता आम्ही या उपनिषदात वाचले की पंचाग्नीचे ज्ञान व जंगलात राहून उपासनेशिवाय स्वर्ग मिळत नाही. आणि मृत्यूसमयी जर सूर्य उत्तरेला नसेल तर धरतीवर पुन्हा जन्म घ्यावा लागेल. आणि आता आम्ही वाचले की सज्ज मनुष्य जर ईश्वराचे स्मरण करीत मरण पावला तर तो स्वर्गाच्या दरवाजापर्यंत पोहोचतो. एकाच उपनिषदात दोन प्रकारच्या शिकवणींमुळे तुम्हाला आश्चर्य वाटत नाही? होय! ही अति आश्चयकारक गोष्ट आहे. आणि यासाठी आहे की यात एक सत्य आणि एक असत्य आहे. वेदांशी मिळतेजुळते असलेले ज्ञान सत्य आहे. म्हणजे मनुष्याचा आत्मा मृत्यूनंतर वरच्या दिशेने प्रवास करतो आणि जलद परलोकात पोहोचतो. मात्र पुनर्जन्माची व सूर्याशी संबंधित स्वर्गाच्या मार्गाची शिकवण वेदांची शिकवण नाही. म्हणून त्या सर्व शिकवणींचा या उपनिषदात नंतर समावेश करण्यात आला आहे अथवा त्या घुसडण्यात (Fabricated) आल्या आहेत.

*********

# २२. बृहदारण्यक उपनिषदात पुनर्जन्माचे वर्णन

**बृहदारण्यक उपनिषद**

● बृहदारण्यक उपनिषद ऋषी याज्ञवल्क्य यांनी लिहिले होते. ते ऋषी वैशम्पायक यांचे शिष्य होते आणि ऋषी वैशम्पायक ऋषी महर्षी वेद व्यासजी यांचे शिष्य आहेत. बृहदारण्यक उपनिषद यजुर्वेद भागातील ब्राह्मण शतपथच्या १४ अध्यायांसह बनला आहे. या उपनिषदाचे एकूण ६ अध्याय आहेत. या अध्यायांत एकूण ४७ ब्राह्मण आहेत आणि एकूण ४३५ मंत्र आहेत.

● या उपनिषदात एकूण ३ ठिकाणी परलोकाचे वर्णन आहे.

१) चौथ्या अध्यायाच्या चौथ्या ब्राह्मणात.
२) ५व्या अध्यायाच्या १० व्या ब्राह्मणात.
३) ६व्या अध्यायाच्या दुसऱ्या ब्राह्मणात.

चौथ्या अध्यायाच्या चौथ्या ब्राह्मणात श्लोक क्र. ३ असा आहे;

● जसे गवतावर चालणारा किडा एका काडीच्या तुकड्यावरून दुसऱ्या तुकड्यावर जाण्यासाठी आपले शरीर संकुचित करतो. मग दुसऱ्या काडीच्या तुकड्याचा आधार घेतल्यानंतर पहिल्या काडीला सोडतो. अशा प्रकारे आत्मा पहिल्या शरीराचा आधार सोडून अविद्येचा त्याग करून आपले निवर्तन करीत दुसऱ्या शरीराचा आश्रय ग्रहण करतो. (४/४/३)

चौथा श्लोक असा आहे.

● ज्या प्रमाणे सोनार सोने घेऊन त्यास कल्याणकारी रूप देतो, त्या प्रमाणे हा आत्मा वर्तमान शरीराला चेतनारहित करून अविद्येपासून मुक्ती घेऊन पितर, गंधर्व, देव, प्रजापती, ब्रह्म अथवा इतर प्राण्यांचे नवीन रूप धारण करतो अथवा नूतन रूपांची निर्मिती करतो. (४/४/४)

● महाराज विकासानंदजी म्हणतात की, बृहदारण्यक उपनिषदात वर्णन करण्यात आलेल्या दोन्ही श्लोकांचा उपदेश वेदांमधील खालील मंत्रांच्या उपदेशांपेक्षा वेगळा आहे. वेदांचे दोन्ही मंत्री पुढीलप्रमाणे आहेत.

● परलोकात आत्म्याला नवीन शरीर मिळेल, परलोकात सर्व आत्म्यांना देवतांच्या वंशात राहावे लागेल. परलोकात आत्म्यांना स्वातंत्र्य नसेल आणि त्या आत्म्यांना त्यांच्या कर्माचे फळदेखील तेथेच भोगावे लागेल. (ऋग्वेद २:१६:१०)

● आत्मे कोणत्या मार्गाने परलोकात जातील तो मार्ग यमदूत अगोदरच दाखवितो. ते कधीही नष्ट न होणारे मार्ग असतात. ज्या मार्गाने अगोदरचे लोक गेले आहेत, आपापल्या कर्मानुसार प्रत्येक प्राणी याच मार्गाने जातील. (ऋग्वेद १०:१४:२, रमेशचंद्र दत्त)

('पुनर्जन्म का रहस्य', पृ.क्र. २४)

दोन्ही श्लोकांवरून स्पष्ट होते की आत्मे

आपल्या मर्जीने कोणत्याही रूपात पुन्हा जन्म घेण्यास स्वतंत्र नसतात. आणि या दोन्ही श्लोकांवरून ही गोष्टसुद्धा स्पष्ट होते की;

१. पुनर्जन्म होणार नसून मरणाऱ्यांना परलोकात एक (देवता वा देवदूतांसारखे) नवीन शरीर मिळेल.

२. मृतकास कोणत्या मार्गाने स्वर्ग वा नरकात जायचे आहे ते यमदूत सांगेल आणि कर्मानुसार स्वर्ग किंवा नरकाचा मार्ग मिळेल.

३. परलोकातच त्याला आपल्या कर्माचे फळ भोगावे लागेल.

● इस उपनिषदाच्या चौथ्या अध्यायाच्या चौथ्या ब्राह्मणाच्या सहाव्या श्लोकाचा अध्याय असा आहे की, ज्या लोकांचे मन इच्छांनी भरलेले असते त्यांनी सत्कर्म जरी केले तरी ते आपल्या सत्कर्मानुसार काही दिवस परलोकात आरामात राहतात, मात्र त्या आरामाचा काही काळ लोटल्यानंतर पुन्हा या जगात पुन: पुन्हा जन्म घेण्यासाठी परततात. आणि जो कसल्याही गोष्टी इच्छा बाळगत नाही आणि जे प्रत्येक कार्य फक्त ईशप्रसन्नतेच्या उद्देशाने करतो, त्याचा पुनर्जन्म होत नाही. तो ब्रह्मामध्येच सामावतो.

● वर वर्णन केलेल्या श्लोकानुसार सर्व इच्छा असलेल्या मनुष्यास स्वर्ग मिळणार नाही. महाराज विकासानंदजी म्हणतात की, असा कोणता मनुष्य आहे ज्याच्या मनात कसलीही इच्छा नसेल! फक्त इच्छा बाळगण्याने जर नरक मिळू लागला तर अशा प्रकारे कोणताही मनुष्य सफल होऊच शकत नाही. म्हणून जे काही बृहदारण्यक उपनिषदाच्या तीन श्लोकांमध्ये आहे ते वेदांच्या शिकवणींविरूद्ध आहे. आता आपण बृहदारण्यक उपनिषदाचा एक श्लोक परलोकाच्या बाबतीत वाचू जो वेदांनुसार आहे;

● *यदा वै पुरुषो हस्माल्लोकात्प्रौति स वायुमागच्छति तस्मै स तत विजिहीते यथा रथचक्रस्य एरां तेन स उर्ध्व आक्रमते ख आदित्य मा गच्छति तस्मैं स तत विजिहते यथा लम्बरस्य ख तेन स उर्ध्व आक्रमते स चन्द्रमसमागच्छते तस्मै स तत विजिहते यथा दुन्दुभे: खं तेन स उर्ध्व आक्रमते स लोक मागच्छत्य भाकमहिम तस्मिनवसति भाश्र्वती समा: ।। (बृहदारण्यक उपनिषद ४/१०/१ मन्त्र)*

**अनुवाद:-** जेव्हा मनुष्य मृत्यूनंतर परलोकाच्या दिशेने प्रवास करतो तेव्हा तो सर्वप्रथम वायुलोकात प्रवेश करतो. तेथे वायू आपल्या चादरीत छेद करून त्याला मार्ग देतो. हा छेद रथाच्या चाकासारखा असतो. या मार्गाने तो वरच्या दिशेने सरसावतो. तो सूर्यलोकात प्रवेश करतो. त्या लोकातदेखील लंबर नामक शस्त्ररूप छेदासारखा त्याचा मार्ग असतो. तेथून तो वरच्या दिशेने सरसावतो आणि चंद्रलोकात पोहोचतो. तेथून त्याच्यासाठी नगाऱ्यासारख्या छेदाचा मार्ग दिला जातो. या लोकातून तो वरच्या दिशेने सरसावतो आणि तो अहिम (जेथे मानसिक तनाव

नाही) आणि हम (जेथे शारीरिक पीडा नाही) अशआ लोकात पोहोचतो. तेथे चिरकाल निवास करतो.

● जेव्हा एकाच उपनिषदात दोन वेगवेगळ्या शिकवणी असतील तर वेदांशी मिळत्याजुळत्या शिकवणीचे अनुसरण केले जाईल. वर दिलेल्या श्लोकांमध्ये मृतकाच्या मार्गाचे वर्णन वेदाच्या शिकवणीनुसार आहे. म्हणून त्याचे अनुसरण करून अगोदरच्या सर्व श्लोकांना, ज्यांत पुनर्जन्माचे वर्णन आहे आणि मुक्ती प्राप्त करण्यासाठीचे अनेक अडथळे आहेत, आम्ही ते सर्व सोडून देत आहोत.

● महाराज विकासानंद ब्रम्हचारीजी म्हणतात, सत्य नेहमी एकसारखे आणि नेहमी दृढ असते आणि असत्य वारंवार बदलत असते.

एकाच उपनिषदात अशा प्रकारे मृत्यूनंतर आणि पुनर्जन्माचे दोन किंवा तीन प्रकारचे वर्णन या गोष्टीचा पुरावा आहे की या पुनर्जन्माच्या शिकवणीचा उपनिषदांमध्ये नंतर समावेश करण्यात आला आहे आणि हे मूळ वेदांच्या उपदेशांनुसार नसून प्रक्षिप्त आहे.

● अशा प्रकारे हे सिद्ध झाले की महाभारत, छांदोग्य उपनिषद व बृहदारण्यक उपनिषदात जी पुनर्जन्माची शिकवण आहे तो वेदांचा उपदेश नसून नंतर प्रक्षिप्त करण्यात आलेली आहे अथवा त्यांचा नंतर समावेश करण्यात आला आहे.

ऋग्वेदाचा खालील श्लोक स्पष्टपणे सांगतो की पुनर्जन्माचा दृष्टिकोन पूर्णत: चुकीचा आहे.

● पुन: पुन्हा उत्पन्न होण्याचे वर्णन ससान शुंभ (सैतान) सारख्या प्राचीन काळातील (लोकांद्वारे) केले गेले आहे. म्हणून पापींसारखे त्या प्रमाणेच मानणाऱ्यांना वर्जित करा. मरणारांची देवी आयुष्य जाळते (अर्थात त्वरा करा, जीवनकाळ संपत आला आहे.) (ऋग्वेद १-९२-१०)

वर उद्‌धृत करण्यात आलेला अनुवाद पंडित दुर्गाशंकर सत्यार्थी यांनी केला आहे. या अनुवादात स्पष्टपणे म्हटले आहे की, वेदांनी पुनर्जन्माच्या विश्वासाला (श्रद्धेला) चुकीचे ठरविले आहे आणि असा विश्वास नष्ट करण्यास सांगितले आहे.

********

# २३. भगवद्‌गीतामध्ये पुनर्जन्माची शिकवण आहे काय?

● भगवद्‌गीतामधील खालील श्लोकाचा अर्थ काय आहे?

हे अर्जुना, ईश्वराच्या निवासाजवळ असलेल्या सर्व लोकांमध्ये पुन:पुन्हा जन्म घेणे आणि मरण्याचे चक्र चालत राहते, परंतु कौन्तेया (अर्जुन)! (ईश्वर म्हणतो) मजप्रत आल्यानंतर (स्वर्गात) कुणाचाही पुन:पुन्हा जन्म होत नाही. (८:१६)

● अशा श्लोकाचे स्पष्टीकरण सर्वसाधारणपणे असे केले जाते की, जे लोक जीवनात पाप करतात, ते मृत्यूपश्चात आपल्या पापांची शिक्षा भोगण्यासाठी धरतीवर पुन्हा जन्म घेतात. ते जीवनात पुन्हा पाप करीत राहतात आणि मृत्यूपश्चात पुन्हा जन्म घेतात. अशा प्रकारे त्यांच्या जन्ममरणाचा क्रम जोपर्यंत ते पुण्य करून आपला आत्म पवित्र करीत नाहीत तोपर्यंत चालत राहतो. जेव्हा ते सर्व पापांपासून मुक्त होतात तेव्हा मुक्ती मिळून ईश्वरात सामावतात.

● ईश्वरात सामावण्याची श्रद्धा वा विश्वास बाळगणारे आपल्या विश्वासास खालील उदाहरणाद्वारे समजावतात.

ईश्वर एक महान सागरासारखा आहे. धरतीवर जे पाणी आहे ते सागरातून ढगांद्वारे निघून वर्षविलेले पाणी आहे. आणि धरतीवरील पाणी एके दिवशी पुन्हा चक्र (Water Cycle) पूर्ण करून सागरात सामावते. अशा प्रकारे आमचा आत्मादेखील महान ईश्वरापासून निघाला आहे आणि एके दिवशी पवित्र होऊन आणि मुक्ती प्राप्त करून त्याच्यात सामावला जाईल.

● वर सांगितलेली पुनर्जन्म आणि ईश्वरात सामावण्याचे दोन विश्वास वा श्रद्धा किती खरे आहेत, ते आपण शोधू या.

भगवद्‌गीताचे तीन श्लोक असे आहेत;

● माझ्या न दिसणाऱ्या मूर्तीने शरीर वा रूपाने हे सर्व विश्व विस्तारले आहे. सर्व निर्मित वस्तू माझ्या ठायी आहेत परंतु मी त्यांच्यामध्ये स्थित नाही. (९:४)

(**नोट :-** निर्मित वस्तू म्हणजे ईश्वराने निर्माण केलेल्या सर्व वस्तू. जसे- धरती, आकाश, पशू, पक्षी, मानवजाती इत्यादी.)

● आणि मी निर्मित सर्व वस्तूंमध्ये स्थित नाही आणि निर्मित सर्व वस्तू माझ्यात स्थित नाहीत. पुराव्यासाठी माझ्या प्रकृतीच्या आश्रित (निर्मित वस्तूंना) पाहा, तुमच्या लक्षात येईल की मी स्वत: निर्मित वस्तूंचा एकमेव निर्माता व त्यांचे पोषण करणारा आहे. (९:५)

● हे कुंतीपुत्र अर्जुना! (ईश्वर म्हणतो) मी निर्माण केलेल्या प्रकृतीच्या आदेशानेच सजीव व निर्जीव वस्तू निर्माण होत आहेत. त्यामुळे या संसार वा भूमीचे परिवर्तन करणेदेखील माझ्या प्रकृतीच्या हातात आहे. (९:१०)

● या तीन श्लोकांपासून आम्हाला जी शिकवण मिळते ती अशी आहे की,

१) ईश्वराने सर्वांची निर्मिती केली.

२) ईश्वराच्या आज्ञा व महिमेमुळेच सर्व

मृत्यू व जीवन प्राप्त करतात.

३) ईश्वर कुणात सामावत नाही आणि न कुणी ईश्वरात सामावतो.

● म्हणूनच लोक आपला आत्मा पवित्र करून मुक्ती व मोक्ष प्राप्त करून ईश्वरात सामावतात, हा विश्वास वा श्रद्धा भगवद्‌गीताच्या शिकवणींनुसार नाही.

● आता आम्ही पुन:पुन्हा जीवन व्यतीत करणे आणि मरणे यावरील विश्वास वा श्रद्धेचा शोध घेऊ या. श्लोक क्र. ८:१६ मध्ये लिहिले आहे की ईश्वराच्या निवासाजवळ जे काही लोक आहेत तेथे पुन:पुन्हा जन्म घेणे आणि मरण्याचे चक्र चालत असते.

ईश्वराचे निवास कुठे आहे?

ईश्वराचे निवास स्वर्ग आहे.

स्वर्गाच्या जवळपास काय आहे? आमची धरती?

नाही! ८४ लाख नरक आहेत.

(गरुड पुराण, अध्याय ३, मंत्र-६०)

स्वर्गाच्या चोहीकडे ८४ नरक आहेत. आणि स्वर्ग त्यांच्या दरम्यान एक उंच व विस्तारलेली जागा आहे.

ऋग्वेदात स्वर्गाच्या बाबतीत हा श्लोक आहे.

● ''तुम्ही तेथे आपल्या खरेपणाच्या साहाय्याने अत्यंत विस्तृत दृश्ये असलेले स्थान पाहा.'' (ऋग्वेद १-२१-६)

आचार्य सयान यांनी आपल्या वेदांच्या भाष्यात या विस्तृत स्थानास स्वर्ग म्हटले आहे.

● जसे एखाद्या अभेद्य किल्ल्याच्या चोहीकडे खोल दरी असते, त्याप्रमाणे वर्गाच्या चोहीकडे नरकाची खोल दरी आहे.

नरकाच्या खोल दरीच्या बाबतीत ऋग्वेदात पुढीलप्रमाणे वर्णन आहे.

● ''जे पापी आहेत, त्यांच्यासाठी हे अथांग खोल स्थान अस्तित्वात आले आहे.'' (ऋग्वेद ४-५-५)

आचार्य सयान यांनी आपल्या वेदांच्या भाष्यात या अथांग खोल असलेल्या स्थानाला नरक म्हटले आहे.

(**नोट:-** गरुड पुराण, अध्याय क्र. ४ मंत्र २ नुसार पापी एका नरकातून दुसऱ्या नरकात जातात आणि एकूण ८४ लाख नरक आहेत. यालाच पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे ८४ लाख वेळा जन्म घेणे म्हणतात.)

● गरुड़ पुराणात जे नरकातील यातना व शिक्षेचे वर्णन आहे ते आम्ही या पुस्तकाच्या शेवटी वाचू.

गरुड़ पुराणानुसार नरकात पापीचे शरीर साप गिळतात. किंवा देवदूत पापीला उंच पर्वतावरून ढकलून देतात. त्यामुळे पापीच्या शरीराचे तुकडे तुकडे होतात. किंवा यमदूत त्याला शस्त्राने कापून तुकडे तुकडे करतात. जेव्हा शरीर यातना व शिक्षेलायक राहात नाही तेव्हा ईश्वर त्या पापीला नवीन शरीर प्रदान करतो, जेणेकरून यातना व शिक्षा देण्याचा क्रम चालू राहावा.

● श्लोक क्र. ८:१६ चा उचित अर्थ असा आहे की, ईशनिवासाच्या जवळपास जे ८४ लाख नरक आहेत तेथे जीवन व मृत्यूचे चक्र सुरू असते. आणि जो ईशनिवास प्राप्त करतो त्याला पुन्हा मृत्यू येत नाही. कारण स्वर्गाचे जीवन अमर जीवन आहे. स्वर्गात

कुणाला मृत्यू येत नाही.

● भगवद्गीतामध्ये जेथे जेथे अशा प्रकारे पुन:पुन्हा जीवनमृत्यूच्या बाबतीत लिहिले गेले आहे ते धरतीवर नव्हे तर नरकासाठी लिहिले आहे. म्हणजेच भगवद्गीतामध्ये देखील पुनर्जन्माची शिकवण नाही.

भगवद्गीताच्या श्लोक क्र. १५:४ वरूनदेखील पुनर्जन्म नसल्याची शिकवण मिळते. तो श्लोक असा आहे;

● मग ते (अन्य निवास अर्थात परलोक) निवास शोधले पाहिजे जेथे जाऊन कुणीही पुन्हा या विश्वातपरत येत नाही आणि जेथे जाऊन नि:संदेह त्याला त्या सर्वप्रथम पुरुषा (ईश्वर) चा आश्रय मिळतो. (१५:४)

(हा अन्य निवास तोच आहे) ज्यामुळे या प्राचीन जगाचा आरंभ व विस्तार झाला आहे.

● महाराज विकासानंद ब्रम्हचारीजी म्हणतात की, पुनर्जन्माच्या बाबतीत सर्व लेख वाचल्यानंतर आणि संशोधनांती जी गोष्ट लक्षात येते ती अशी की, महर्षी वेद व्यासजी हिंदू धर्माचे सर्वांत मोठे आचार्य आहेत. त्यांनी महाभारत व १७ पुराण लिहिले. भगवद्गीतेसदेखील पुस्तकाचे रूप दिले. पुर्नजन्म हा एक महत्त्वपूर्ण विश्वास वा श्रद्धा आहे. जर यात जराशीही सत्यता व वास्तविकता असती तर त्यांनीसुद्धा यावर जरूर लिहिले असते. मात्र त्यांनी या बाबतीत काहीही लिहिले नाही.

● छान्दोग्य उपनिषद व बृहदारण्यक उपनिषदाचे लेखक ऋषी तांड व ऋषी याज्ञवल्क्य हे महर्षी वेद व्यासजींचे शिष्य होते. जी शिकवण व विचार गुरूचे असतात तेच त्याच्या शिष्यांचे असतात. मग ऋषी तांड व ऋषी याज्ञवल्क्यसुद्धा पुनर्जन्मावर विश्वास बाळगणारे नव्हते. त्यांच्या उपनिषदांमध्ये दोन्ही प्रकारचे विचार आहेत आणि श्लोक आहेत. अर्थात त्यांच्या उपनिषदांमध्ये वेदांच्या शिकवणींनुसार पुनर्जन्म नसल्याचेदेखील श्लोक आहेत. आणि वेदांच्या शिकवणीविरूद्ध पुनर्जन्म असल्याचेही श्लोक आहेत. मग जे श्लोक वेदांनुसार पुनर्जन्म नसल्याचे श्लोक आहेत तेच लेखकाचे विचार आहेत. आणि जे श्लोक पुनर्जन्म असल्याची शिकवण देतात ते लेखकाचे विचार नाहीत आणि ते नंतर उपनिषदांमध्ये लिहिले गेले अथवा त्यांचा समावेश करण्यात आला आहे. ते प्रक्षिप्त (Fabricated) आहे.

**********

# २४. महाभारत व उपनिषदांमध्ये हस्तक्षेप कुणी केला?

● महाराज विकासनंद ब्रम्हचारीजी यांनी आपले पुस्तक 'पुनर्जन्म एक रहस्य' मध्ये पृ. क्र. ३० वर लिहिले आहे की, वेदांच्या युगानंतर लोक दोन विचारधारांमध्ये विभागले गेले. पहिली कर्मवादी विचारधारा आमि दुसरी ज्ञानवादी विचारधारा.

● कर्मवादी विचारधारेचे लोक कर्मांना अधिक महत्त्व देत होते आणि ज्ञानवादी विचारधारेचे लोक ज्ञानाला.

● कर्मवादाच्या लोकांच समूह देववाद अर्थात देवतांची पूजा करण्याला महत्त्व देत होते. यज्ञवाद अर्थात यज्ञाद्वारे पूजा करीत होते. भोगवाद अर्थात सामाजिक जीवन आणि सांसारिक व कौटुंबिक जीवनाला महत्त्व देत होते. तसेच वेदवाद अर्थात वेदांच्या शिकवणीला महत्त्व देत होते.

● ज्ञानवादाचे लोक त्यागवाद अर्थात सांसारिक व सुखी जीवन त्यागण्याला महत्त्व देत होते. संन्यासवाद अर्थात सामाजिक जीवनापासून संन्यास घेऊन वनात राहून ध्यान, आराधना व तपस्येला अधिक महत्त्व देत होते आणि त्यास मुक्तीचा मार्ग समजत होते.

● हे दोन्ही एकमेकांचा विरोध करीत. मात्र नंतर दोन्ही समुदायांमध्ये समजावणी झाली आणि तिसरा मध्यममार्ग काढण्यात आला. जसे ब्रह्मचर्य इत्यादी. ज्यात समाजात राहूनही सुखाचा त्याग करून उपासना केली जाते. या तिसऱ्या विचारधारेत अगोदरच्या दोन्ही समुदायांची प्रतिष्ठा व भावनांचा आदर करण्यात आला.

● ज्ञानवादींचे ज्ञानावर अधिक वर्चस्व होते. म्हणून कर्मवादींबरोबर ऐक्य होऊनसुद्धा असे लोक ग्रंथांमध्येच अशा शिकवणींचा समावेश करीत असत की ग्रंथांनुसारच त्यांच्या विचारधारेचे समर्थन व्हावे आणि लोकांनी त्यांच्या विचारधारेलाच योग्य समजावे. ही या लोकांची शिकवण आहे की जो पंचाग्री विद्येसह वनात जाऊन तपस्या करील त्यालाच मुक्ती मिळेल. आणि ही याच लोकांची शिकवण आहे की पापी निरंतर जन्म व मृत्यूच्या फेऱ्यात अडकून राहील.

### पुनर्जन्माच्या विश्वासाचा ग्रंथांमध्ये समावेश ( भेसळ ) करून ज्ञानवादींना काय फायदा झाला?

● जेव्हा पापीला भीती घालण्यात येते की त्याला ईश्वर पापांची शिक्षा नरकात जाळून देईल, तेव्हा पापी ईश्वराला भितो. त्याच्याकडे क्षमा मागतो आणि ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी दान देतो, यज्ञ करतो आणि समाजकल्याणाचे कार्य करतो.

● मात्र त्याच व्यक्तीला म्हटले गेले की जर तू पाप केलेस तर आता त्याचा बदला

तुला भोगावाच लागेल. या जन्मात नाही तर पुढच्या जन्मात. आणि जोपर्यंत तू आपल्या पापांची शिक्षा या धरतीवर भोगत नाही तोपर्यंत तुला या जन्म व मृत्यूच्या फेऱ्यातून बाहेर पडणे शक्य नाही. तेव्हा अशी व्यक्ती पाप केल्यानंतर ते पुण्य करून, दानधर्म, यज्ञ व ईश्वराच्या प्रार्थनेने संपुष्टात आणण्याचा प्रयत्न न करता पापच न करण्याचा प्रयत्न करील. जो समाजापासून जितका लांब आणि त्यागवादी व संन्यासवादी लोकांच्या जवळ असेल तितके त्याच्याकडून पाप घडणार नाहीत. म्हणून जर पुनर्जन्माचा विश्वास लोकांच्या मनात बसविण्यात आला तर ते आपोआप त्यागवाद व संन्यासवादाचा अवलंब करतील.

● अशा प्रकारे विचारधारेला महत्त्व देण्यासाठी ज्ञानावादी लोकांनी ग्रंथांमध्ये पुनर्जन्माच्या शिकवणींची भेसळ केली.

*******

# २५. पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे उत्तर देऊ शकणार नाहीत असे प्रश्न.

● पुनर्जन्मावर विश्वास बाळगणारे म्हणतात की, जे कोणी मूल जन्माला येते ते आपल्या अपराधांची शिक्षा भोगण्यासाठी जन्म घेते. जेव्हा मनुष्याचे सर्व पाप संपतील आणि कसलीच शिक्षा शिल्लक राहणार नाही तेव्हा त्याला मोक्ष वा मुक्ती मिळेल. आणि पुन:पुन्हा जन्म घेण्यापासून सुटका होईल.

हा मानवजातीचा समाज ईश्वराने एक पुरुष व एक स्त्रीपासून वाढविला. पुनर्जन्मावर विश्वास ठेवणाऱ्यांना आमचा प्रश्न आहे की जेव्हा त्या जोडप्याच्या पहिल्या मुलाचा जन्म झाला होता तेव्हा तो कुणाचा पुनर्जन्म होता? (म्हणजे कोणत्या पापीने मृत्यूनंतर मुलाच्या रूपात आपल्या पापांची शिक्षा भोगण्यासाठी पुन्हा जन्म घेतला होता?)

● पुनर्जन्मवाल्यांचा दृष्टिकोन असा आहे की, अपराधी मृत्यूनंतर झाडेझुडपे आणि प्राण्यांच्या स्वरूपात जन्माला येतात.

● हे कलयुग आहे आणि या युगात २५ टक्के पुण्य आणि ७५ टक्के पाप आहे. म्हणजेच मरणारांमध्ये गुन्हेगारांची संख्या जास्त आहे. म्हणून असे घडायला हवे होते की दिवसेंदिवस प्राणी व झाडेझुडपांच्या संख्येत वाढ व्हावी कारण मरणारांमध्ये पापींची संख्या सत्कर्मींपेक्षा अधिक आहे. मात्र याविरूद्ध घडत आहे. या युगात प्राणी व झाडेझुडपे धरतीवरून कमी होत चालले आहेत. असे का?

● पुनर्जन्मवाले म्हणतात की अनेक मुलांना लहानपणी पूर्वाश्रमीच्या जीवनातील घटनादेखील आठवतात.

● याचे कारण असे आहे की भूत-पिशाचे व प्रेतात्मे या अज्ञान मुलांवर किंवा पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांवर प्रभाव टाकतात. त्यामुळे मुले अशा प्रकारच्या अद्‌भूत गोष्टी सांगत असतात. मात्र तेच मूल जेव्हा सहा वर्षांचे होते अथवा सज्ञान होते तेव्हा ते आपल्या गतजन्माची कसलीही

घटना वा गोष्ट सांगत नाही.

जर पुनर्जन्मामुळे मुले काही गोष्टी पाच वर्षांच्या वयात लक्षात ठेवू शकतात, तर मग त्यांना जीवनभर लक्षात राहायला हवे. कारण वय वाढल्यानंतर बुद्धी आणखीन विकसित होते. मात्र असे होत नाही. ते मूल सर्व काही विसरून सामान्य व्यक्तीप्रमाणे वागू लागते. लहानपणी त्याला ज्या गोष्टी आठवतात त्या जीवनभर कुणी विसरत नाही. याचे कारण पुनर्जन्मावर विश्वास ठेवणारे सांगू शकत नाहीत.

● पुनर्जन्मावर विश्वास ठेवणाऱ्यांचे मत आहे की ईश्वरात विलीन होणे हे मनुष्याचे अंतिम लक्ष्य आहे. स्वर्ग व नरक काही दिवसांसाठी बक्षीस व शिक्षा देण्यासाठी आहे. यानंतर पुन्हा जन्म घेऊन कर्म करून मुक्ती प्राप्त करून ईश्वरात विलीन होणे आहे. जर एखाद्या मुलाला गतजन्माच्या घटना आठवत असतील तर एखाद्या मुलाला नरकात आपल्याला देण्यात आलेली शिक्षादेखील स्मरणात आहे काय? जर एखाद्याला नरकातील शिक्षा आठवली तर तो या जगात एक सामान्य मनुष्याचे जीवन व्यतीत करेल काय? एखाद्याने नरकातील आपली शिक्षा जन्मल्यानंतर लोकांना सांगितल्याचे कुणी ऐकले आहे काय? मी तर अशी कोणतीही घटना ऐकलेली नाही!

● या युगात जर न्यायालयाने एखाद्या गुन्हेगाराला शिक्षा सुनावली आणि जर तुम्ही काहीही करून त्या गुन्हेगाराची मदत करू इच्छित असाल. जसे त्याला कारागृहातून पळवून मुक्त करू इच्छित असाल तर तुमचे हे कार्य गुन्हा ठरेल.

एक मनुष्य विकलांग किंवा गरीब आहे, जर त्याची ही स्थिती गतजन्मातील अपराधामुळे झाल्याचे मानले तर या जन्मात तो अपराधी आहे. आणि कोणत्याही अपराध्याची मदत करणे कायद्यानुसार अपराध आहे. म्हणून धार्मिक पद्धतीने तर अशा लोकांची मदत करण्यापासून अलिप्त राहण्याचा आदेश असला पाहिजे. मात्र प्रत्येक धर्माच्या धर्मग्रंथांत विकलांग व गरिबांची मदत करण्याच्या कार्यास पुण्य म्हटले आहे. असे का?

● ऐतरेय उपनिषदाचा एक दृष्टिकोन पुनर्जन्माच्या ही एक पाऊल पुढे आहे. या दृष्टिकोनानुसार पित्याचा आत्मा वीर्याद्वारे आईच्या गर्भाशयात प्रवेश करतो आणि अशा प्रकारे वीर्याचे गर्भाशयात प्रवेश करणे हा मनुष्याचा पहिला जन्म आहे. आणि जेव्हा तो जन्माला येतो तो त्याच दुसरा जन्म आणि जेव्हा त्याचा मृत्यू होतो तो त्याचा तिसरा जन्म होय.

● जर हा दृष्टिकोन खरा असल्याचे मानले तर ज्यांच्याकडे मुलगी जन्माला येते तिच्यात कुणाचा आत्मा आहे? ज्यांना अपत्य होत नाही त्याचे काय कारण आहे? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे जेव्हा बापाची आत्मा मुलात असते तर प्रत्येक बाप एक मुलगा असायला हवा. मात्र असे होत नाही. कुणाला एकापेक्षा अधिक पुत्र होतात, कुणाला एकसुद्धा होत नाही, असे का?

पुनर्जन्माचा दृष्टिकोनवाले आमच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देऊ शकत नाहीत, कारण जो दृष्टिकोन मुळात चुकीचा आहे त्याला तुम्ही कशा प्रकारे सिद्ध कराल?

*******

# २६. गीता सार

**( १ ) ईश्वर कोण आहे?**

श्रीकृष्णजी म्हणाले,

परंतु (तू) त्याला (ईश्वराला) अविनाशी समज ज्याद्वारे या सर्व (विश्वाचा) विस्तार झाला आहे त्या अविनाशी (ईश्वराचा) विनाश करण्याची शक्ती इतर कुणातही नाही. (२:१७)

**( २ ) हम क्यों इस संसार में हैं?**

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

ही माझी त्रिगुणातीत अद्‌भुत अशी माया पार करणे अत्यंत दुस्तर आहे, अत्यंत कठीण आहे. परंतु जे साधक मला निरंतर भजतात, मला शरण येतात, अथवा माझ्या आधारे जगतात, तेच ह्या मायेला पार करू शकतात, तेच या मायेला (परीक्षेला) नि:संदेह तरून जातात. (७:१४)

म्हणजे आम्ही या विश्वात आपल्या कर्मांद्वारे परीक्षा देण्यासाठी आलो आहोत.

**( ३ ) मनुष्याचा विनाश होईल का?**

श्रीकृष्णजी म्हणाले,

(ईश्वर म्हणतो) की,

अविनाशी, अमर्याद आणि नित्य अशा जीवात्म्यांचे फक्त भौतिक शरीर नाशवंत असते आणि म्हणून हे भारत (अर्जुना)! तू युद्ध कर. (२:१८)

(म्हणजे जन्माला येणाराचे मरण अटळ आहे. मात्र आत्मा नष्ट होत नसून मागे उरतो. या मर्यादित जीवनानंतर आणखी एक अनंत जीवन आहे ज्याला परलोक (अन्य लोक) म्हणतात. यातील सफलतेसाठी आम्हाला चिंता केली पाहिजे.)

**( ४ ) प्रलय ( कयामत ) येईल काय?**

श्रीकृष्णजी म्हणाले,

हे पार्थ!(अर्जुना) तो मनुष्य होणे शक्य नाही परंतु दुसऱ्या एखाद्या निर्मित वस्तू वा देवताची उपासना न करताच त्याला प्राप्त केले जाऊ शकते. या ईश्वराद्वारे सर्व निर्मित वस्तू विस्तारल्या आहेत आणि त्याद्वारेच निर्मित वस्तूंचा अंत म्हणजे प्रलय होणार आहे. (८:२२)

(म्हणजे या ब्रह्मांडाची निर्मिती करणारा ईश्वर ते एके दिवशी नष्टदेखील करील आणि तो दिवस कयामत अथवा प्रलयदिन असेल.)

**( ५ ) प्रलयानंतर काय होईल?**

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

निर्मित वस्तूंपेक्षा पूर्णत: वेगळा असलेला ईश्वर कुणाच्या सत्कर्माचा आणि दुष्कर्माचा हिशोब घेण्यास जबाबदार नाही. अज्ञानामुळे मनुष्य असे म्हणतो. कारण त्याच्या (अज्ञानाने) ज्ञानावर पडदा टाकून त्याला लपविले आहे. (५:१५)

(म्हणजे 'ईश्वरासमोर आपल्या कर्मांचा हिशोब द्यावा लागणार नाही,' असे म्हणणारे लोक अज्ञानी आहेत. प्रलयाच्या दिवशी ईश्वर प्रत्येक मनुष्याकडून त्याच्या कर्मांचा हिशोब अवश्य घेईल.)

**(६) ईश्वर निर्णय कसा करील?**

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

मरण पावणारे नैसर्गिक गुणांनुसार नरकात अशा प्रकारे ठेवले जातील; (१) (श्रद्धेशिवाय सद्‌गुण बाळगणारे) पुण्य करणारे नरकात वरच्या पातळीवर ठेवले जातात. (२) दुर्गुणी लोक मध्ये निवास करतात आणि मार्गभ्रष्ट असलेले अज्ञानी आणि (३) धर्मद्रोही (ढोंगी) अगदी खालच्या तळाला ठेवले जातात. (१४:१८)

(अशा प्रकारे) मला प्राप्त केल्याने महान पुरुष सदैव स्थित न राहणारे, दुःखाचे आगर असणाऱ्यांना (नरकाच्या निवासात) पुनर्जन्म प्राप्त होत नाही; परंतु पूर्णत: माझी उपासना करून (स्वर्गाचे) सर्वांत मोठे लक्ष्य प्राप्त करू शकतात. (८:१५)

(म्हणजे ईश्वराच्या आदेशाविरूद्ध स्वनिर्मित श्रद्धेनुसार जो पुण्यकर्म करील तो नरकात वरच्या म्हणजे अल्प शिक्षेच्या स्थानी असेल. आणि जो पाप व पथभ्रष्ट (Miss guided) जीवन व्यतीत करेल ते सर्व मध्य आणि नरकाच्या खालच्या बाजूला असतील. एका ईश्वरावर श्रद्धा बाळगून त्याची प्रार्थना करणारा स्वर्गात जाईल.)

**(७) ईश्वराची प्रसन्नता कशी प्राप्त करावी?**

श्रीकृष्णजी म्हणाले, ईश्वर म्हणतो :

(१) मला आपल्या मनात ठेवून माझ्या आदेशांचे पालन करणारा बन, (२) माझ्या प्रसन्नतेसाठी सत्कर्म कर, (३) मलाच नमस्कार कर, नि:संदेह अशा प्रकारे (४) स्वत: भक्तीत मग्न होऊन, (५) माझा आधार घेऊन, तू मला प्राप्त करशील. (९:३४)

परंतु जे लोक मला (१) अविनाशी ईश्वर ॐ, (२) अनुपम म्हणजे अद्वितीय, (३) अदृश्य, (४) सर्वत्र आढळणारा, (५) कल्पनेपलीकडे मानून पूर्णत: उपासना करतात आणि (६) हृदयाला एकेश्वरात एकाग्र ठेवून, (७) सर्व वस्तूंपासून इच्छांना निश्चितपणे नियंत्रित करून, (८) पर्वतासम एकेश्वरावर स्वत:ला स्थिर करून, (९) दुसऱ्या कोणत्याही निर्मित वस्तू वा देवताकडे मनला न भटकविता, (१०) सर्व निर्मित वस्तूंच्या कल्याणकारी कार्यात मग्न राहतात, असे लोक निश्चितच मला प्राप्त करतात. (१२:३-४)

********

# २७. गरुड पुराण

**● गरुड पुराणाच्या ज्ञानाचे महत्त्व :-**

प्राचीन काळात लोक सकाळी उठून ईश्वराची प्रार्थना करीत होते. आज आम्ही सकाळी उठून सर्वप्रथम वर्तमानपत्र किंवा टी.व्ही.वर न्यूज पाहतो. जेव्हा वेळ मिळतो तेव्हा आम्ही टी.व्ही.च्या समोरच असतो. वर्तमानपत्र धर्मज्ञानी छापत नाहीत की टी. व्ही. चॅनल स्वर्गातून प्रसारित होत नाही. हे दोन्ही माध्यमे त्या लोकांच्या हातात आहेत जे धन कमविण्यासाठीच जगतात-मरतात. म्हणून ते या दोन्ही माध्यमांमध्ये तेच दाखवितात जे विकले जाते.

आणि सर्वाधिक लोकांची रुची कशात आहे हे तुम्हाला माहीत आहे काय?

व्याभिचार (Sex) आणि हिंसा (Violence)!

हेच दोन विषय वर्तमानपत्र आणि टी. व्ही.वर दिवसभर प्रसारित होत असतात. टी.व्ही.वरील प्रत्येक सुंदर तरुणी सर्वांत आकर्षित (Hot) दिसू पाहते. तसेच तरुण पिढी आणि व्होटबँकेचे रक्त खवळण्याइतके वर्तमानपत्राचे मथळे भडकाऊ व सांप्रदायिक शब्दांनी रंगविलेले असतात. त्याचप्रमाणे सकाळ-संध्याकाळ ही दोन्ही माध्यमे पाहून पाहून आता लोकांना याची जाणीवदेखील होऊ लागली आहे की हे करण्यानेदेखील काही पाप घडते.

म्हणून आज महिलांप्रति हिंसाचारात वाढ होत आहे आणि सांप्रदायिक दंगली सामान्य घटना बनल्या आहेत.

● भगवद्गीतानंतर सर्वाधिक मनाला प्रभावित करणारा ग्रंथ म्हणजे गरुड पुराण होय. हे पुराण धनाची नशा उतरवितो. संसारात मग्न व निद्रावस्थेतील मनाला जागृत करतो.

जोपर्यंत नरकयातना किती भयानक असतात हे तुम्हाला माहीत नसेल तोपर्यंत त्याची तुम्हाला अजिबात भीती वाटणार नाही.

आणि जर पाप काय आहे हे तुम्हाला माहीतच नसेल तर तुम्ही त्यापासून संरक्षण करणारच कसे?

म्हणून या अध्यायात मी सुरूवातीला काही नरकांचे वर्णन केले आहे (जे गरुड पुराणातील आहेत). मग ते दोन पाप ज्यांना आज 'पाप' समजले जात नाही, त्यांचे वर्णन करतो; जेणेकरून आम्ही त्यापासून बचाव करू आणि ज्या भगवद्गीताच्या उपदेशांचे आम्ही अध्ययन केले आहे त्यांचे गांभीर्याने पालन करता यावे.

**नरकाचे वर्णन :-**

गरुड पुराणातील अध्याय क्र. १ ते ३ चा सारांश-

● त्या मार्गात पडतो आणि थकलेल्या

मृतकास तेथे पोहोचविले जाते, आणि दूत त्यास अति भयानक नरकाकडे घेऊन जातात. यापुढे यमाचे क्षेत्र आहे. बारा सूर्य प्रलयाच्या शेवटी तळपल्यासारखे तळपतात.

हे परलोकाच्या पथिका! तुला यमराजाचे बळ ठाऊक नाही. आणि यमाच्या मार्गात तुझ्यासारख्या प्राण्यांबरोबर जाणाऱ्या यमदूतांचे बळदेखील तुला माहीत नाही. यमराजाने यातना देऊ नयेत यासाठी तू प्रयत्नसुद्धा केले नाहीस. तुझे त्या मार्गाने जाणे निश्चित आहे. ज्या मार्गावर क्रयविक्रय नाही. हा मार्ग बालकांनादेखील माहीत आहे. हे मनुष्या! तू हे ऐकले नव्हते काय?

● धर्मराजाचे ते दूत मनुष्याची शुभाशुभ मनवाणी आणि शराराद्वारे घडणारे कर्म पूर्णत: जाणतात. व्रत, दान व सत्यवाणीद्वारे जो मनुष्य ईश्वराला प्रसन्नत करतो, ते त्या मनुष्याला स्वर्गात पाठविणारे असतात. पापींचे पापकर्म जाणून सत्यवादी ते धर्माराजासमोर सांगावे लागणार असल्यामुळे दु:खी होतात. कर्मांच्या नोंदीमध्ये चित्रगुप्ताकडून कसलीही चूक होत नाही की ते कुणाची शिफारसदेखील करीत नाहीत.

● जो मनुष्य शुभकर्माऐवजी अशुभ कर्म करण्यातच मग्न असतात, ते एका नरकातून दुसऱ्या नरकात जातात. तिन्ही दरवाजे ओलांडून धर्मात्मा यमपुरात प्रवेश करतात. आणि पापी दक्षिण दरवाजातूनच यमपुरात जातात. या महादु:ख देणाऱ्या मार्गात वैतरणी नदी आहे, त्यातून जे पापी जातात, त्यांचे त्यात कायमचे वास्तव्य असते.

● उस नरकलोकात ईश्वराचे सेवक त्याच्या आदेशानुसार आपल्या दूतांकरवी तेथे आणलेल्या मृत प्राण्यांना त्यांच्या दुष्कर्मांनुसार पापाचे फळ शिक्षा देतात.

● **तामिस्त्र नरकात –** त्याला अन्नपाणी न देणे, काठीने मारणे आणि भीती दाखविणे इत्यादी अनेक प्रकारच्या उपायांनी पीडित केले जाते. त्यामुळे अत्यंत दु:खी होऊन तो अचानक मूर्च्छित होतो.

● **अंधतमिस्त्र नरकात –** तेथील यातना असह्य होऊन तो मुळासकट तुटून पडलेल्या वृक्षासमान वेदनाशून्य होऊन पूर्ण शुद्ध हरपतो आणि त्याला काहीही सुचत नाही.

● **रौख नरकात –** 'रुरु', सर्पापेक्षाही अधिक क्रूर अशा एका जीवाचे नाव आहे. तेथे कच्चे मांस खाणारे रुरु मांसाच्या लोभाने त्याचा चावा घेतात.

● **कुंभीपाक नरकात –** यमदूत मृतकाला नेऊन उकळत्या तेलात फेकून देतात.

● **कालसूत्र नरक –** याचा परिघ दहा हजार योजन आहे. याची जमीन तांब्याची आहे. यात तापलेले मैदान वरून सूर्य आणि खालून अग्नीच्या निखाऱ्यात जळत राहते. तेथे पोहोचविण्यात आलेला पापी जीव अन्नपाण्यासाठी व्याकूळ होतो. आणि त्याचे शरीर अंतरबाह्य जळू लागते. त्याची

बेचैनी इतकी वाढते की तो कधी बसतो, कधी जमिनीवर आडवा होतो, कधी तडफडू लागतो, कधी उभा राहतो आणि कधी इकडेतिकडे पळू लागतो. अशा प्रकारे नर पशूच्या शरीरात जेवढी छिद्रे (रोम) असतात, तेवढ्या हजार वर्षांपर्यंत त्याची (पापीची) दुर्गती होत राहते.

● **असिपत्रवन नरकात –** जेव्हा मारापासून वाचण्यासाठी पापी इकडेतिकडे पळू लागतो, तेव्हा ताडवनासारख्या तीक्ष्ण व दुधारी पानांनी त्याच्या सर्व अवयवांचे तुकडे तुकडे होऊ लागतात. तेव्हा तो अत्यंत वेदनांनी ''मेलो! मेलोऽऽ!'' असे ओरडत पावलोपावली मूर्छित (बेशुद्ध) होऊन पडू लागतो. ईश्वराने पाठविलेल्या धर्माऐवजी अधार्मिक मार्गाचा अवलंब केल्याने त्याला अशा प्रकारे आपल्या कुकर्माचे फळ भोगावे लागते.

● **सुकरमुख नरकात –** जेव्हा महाबली यमदूत पापीचे अवयव तुडवितात तेव्हा ते घाण्यात सरकत जाणाऱ्या ऊसासमान पीडित होऊन जसे इहलोकात (या जगात) त्याच्या अत्याचाराने पीडित निरपराध प्राणी रडत-ओरडत होते, तसा कधी आर्त स्वरात टाहो फोडतो आणि कधी मूर्छित होतो.

● **अंधकूप नरक –** तेथील पशू, मृग, पक्षी, साप आदी सरपटणारे जंतू, मच्छर, ऊ, ढेकूण पापीचा सर्व बाजूंनी चावा घेतात. त्यामुळे त्याची झोप व शांती भंग होते आणि स्थान न मिळाल्यानेसुद्धा तो बेचैन होऊन त्या दृढ अंधकारात अशा प्रकारे भटकत राहतो जसे रोगग्रस्त शरीरात जीव गुदमरला जातो.

● **कृमी भोजन नरकात –** एक लाख योजन लांब-रूंद एक किड्यांचा कुंड आहे. त्यात त्यालासुद्धा किडा (समान) बनून राहावे लागते. आणि तेथे किडे त्याला कुरतडतात आणि तो किडे खाऊ लागतो.

● **संदेश नरकात –** तप्त लोखंडाच्या गोळ्यांनी पापीला डागण्यात येते आणि मोठ्या चिमट्यांनी त्याची त्वचा ओरबडतात.

● **तप्तसूर्मी नरकात –** पापीला कोडे मारले जातात तसेच पुरुषाला तप्त लोखंडी स्त्री-मूर्तीने आणि स्त्रीला तप्त पुरुष प्रतिमेने आलिंगन करवितात.

● **वज्रकंटकशाल्मली नरकात –** वज्रासमान कठीण काटे असलेल्या सेमर वृक्षावर पापीला चढवून मग खालच्या दिशेने ओढतात.

● **वैतरणी नदीत –** ही नदी नरकांच्या दरीसमान आहे. यात मल, मूत्र, पू, रक्त, केश, नख, हाडे, चरबी, मांस आणि मज्जा आदी घाण वस्तू भरलेल्या आहेत. तेथे पडल्यानंतर पापीला त्या पाण्यातील जीव कुरतडतात. मात्र त्यामुळे त्यांचे शरीर सुटत नाही. पापामुळे प्राण त्याला वाहून नेतात आणि तो त्या दुर्गतीला आपल्या करनीचे फळ समजून मनातल्या मनात संतप्त होत राहतात. मृत्यूनंतर पापी विष्ठा, मूत्र, कफ आणि मलाने भरलेल्या पूयोद

नामक समुद्रात पडून त्या अत्यंत घृणित वस्तूच खातात.

● **प्राणरोध नरकात –** यमदूत त्यांना लक्ष्य बनवून बाणांनी छेदतात.

● **वैशस ( विशसन ) नरकात –** टाकून तेथील अधिकारी अतिशय त्रास देऊन कापतात. वीर्याच्या नदीत टाकून वीर्य पाजतात.

● **सरमेयादन नरकात –** वज्रासारखे दात असलेले सातशे वीस यमदूत कुत्र्याचे रूप धारण करून अति वेगाने पापीचा चावा घेतात.

● **अवीचिमान नरकात –** शंभर योजन उंच पर्वताच्या शिखरावरून खाली डोके करून पापीला ढकलून दिले जाते. या नरकाची दगडी जमीन पाण्यासारखी वाटते. तेथे ढकलून दिल्यामुळे त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे होऊसुद्धा प्राण जात नाहीत. म्हणून त्याला पुन:पुन्हा वर नेऊन खाली आपटले जाते.

● **अय:पान नरकात –** पापीच्या छातीवर पाय ठेवून त्याच्या तोंडात अग्नीने वितळविलेला गोळा घालतात.

● **क्षार कर्दम नरकात –** खाली डोके करून ढकलून दिले जाते आणि तेथे त्याला अनंत पीडा भोगाव्या लागतात.

● **रक्षोगणभोजन नरकात –** खाटकासारखे कुऱ्हाडीने कापून त्याचे रक्त पितात.

● **शूलप्रोत नरकात –** शूळाने छेदले जाते. त्या वेळी जेव्हा ते तहान-भुकेने व्याकूळ होतात आणि कडक, होला आदी टोकदार चोच असलेले नरकातील भयानक पक्षी बोचकारू लागतात तेव्हा त्याच्या हातून घडलेले पाप त्यांना आठवतात.

● **दंद शकु नरकात –** पाच-पाच सात-सात तोंडे असलेले साप पापीच्या जवळ येऊन त्याला उंदीर गिळल्यासारखे गिळून टाकतात.

● **अवटनिरोधन नरकात –** परलोकात यमदूत पापीला विषारी आगीच्या धुरात घोटतात म्हणून या नरकाला 'अवटनिरोधन' म्हणतात.

● **पर्यावर्तन नरकात –** जो पापी जातो तेव्हा त्या पापदृष्टी नेत्रांना गिधड, कडक, कावळा आणि होला आदी वज्रासारखी कठीण चोच असलेले पक्षी बळजबरीने गिळून टाकतात.

● **सूची मुख नरकात –** त्या अर्थपिशाच पापी आत्म्याचे सर्व अवयव यमराजचे दूत शिंप्यासारखे सुईदोऱ्याने शिवतात.

अशा प्रकारे हजारो नरक आहेत. त्यापैकी काहींचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला आहे. (गरुड पुराण, अध्याय क्र. ३ चा सारांश)

**कलियुगातील दोन पाप :-**

१) महिलांप्रती हिंसा

२) सांप्रदायिक दंगली

हे दोन्ही प्रकारचे पाप करणाऱ्यांच्या बाबतीत गरुड पुराणात काय वर्णन करण्यात आले आहे याचे आपण अध्ययन करू या.

गरुड पुराणातील अध्याय ४ मध्ये या पापांचे वर्णन आले आहे. या अद्यायाच्या काही श्लोकांचे भावार्थ अशा प्रकारे आहेत.

**महिलांप्रती हिंसेचे पाप :-**

**मंत्र क्र. ५ :-** ब्राह्मणांचा वध करणारे, मद्यपान करणारे, कर्जदारांचा वध करणारे, महिलांचा वंध करणारे, मातेच्या गर्भात शिशुला मारणारे (Destroyer of the embryo), आणि गोपनीय पद्धतीने पाप करणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. ६ :-** गुरू, मंदिरे, महिला आणि बालकांच्या धनसंपत्तीची चोरी करणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. १४ :-** माता-पिता, गुरू, शुभचिंतक आणि धार्मिक शिक्षण देणाऱ्यांना धोका देणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. १५ :-** आपल्या पवित्र, साथ देणाऱ्या, चांगला वंश व आचरण असलेल्या पत्नीला चुकीच्या पद्धतीने आणि कारणांनी सोडून देणारा नरकात जाईल.

**मंत्र क्र. २२ :-** सरदाराच्या पत्नीला चुकीच्या पद्धतीने प्राप्त करू इच्छिणारा, दुसऱ्याच्या पत्नीचे अपहरण करणारा, ज्यांचे विचार व व्यवहार कुमारिकांच्या बाबतीत कामातुर (Lustful) असणारे आणि पवित्र महिलांवर व्यभिचाराचा आरोप करणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. ३४ :-** स्वत: पोटभर खाऊन पत्नी, मुले, नोकर आणि गुरूंच्या बाबतीत निष्काळजीपणा बाळगणारा (त्यांना पोटभर जेवण न देणारा), पूर्वजांसाठी दान न करणारा नरकात जाईल.

**मंत्र क्र. ३०:-** आपल्या पतीचा अपमान करणारी (त्याच्याप्रती कृतज्ञता न बाळगणारी) आणि दुसऱ्या पुरुषांकडे आकर्षित होणारी महिला नरकात जाईल.

**सांप्रदायिक दंगलींमध्ये होणारे पाप :-**

**मंत्र क्र. १२:-** ज्यांना पाप करणे आवडते आणि जे पुण्यकर्मांपासून दूर पळतात, ते एका यातनेतून दुसऱ्या यातनेत, एका भयातून दुसऱ्या भयात आणि एका नरकातून दुसऱ्या नरकात जात राहतात.

**मंत्र क्र. ९ :-** जो धार्मिक स्थळाचा, सत्कर्म करणाऱ्या पवित्र लोकांचा, शिक्षण देणाऱ्यांचा आदर न करणारे आणि धार्मिक ग्रंथांचा अपमान करणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. १० :-** जीवनात अडथळे निर्माण करणारे, पीडितांना त्रास सहन करताना पाहून प्रसन्न होणारे, विनाशाच्या बाबतीत बोलणारे व विचार करणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. ११ :-** अहिंसा और सत्कर्मांच्या गोष्टी न ऐकणारे आणि ग्रंथांच्या उपदेशांना न मानणारे, स्वत:चेच खरे म्हणणारे,

आपल्या हट्टीपणावर अटळ राहणारे आणि मूर्ख असूनसुद्धा स्वत:ला विद्वान समजणारे लोक नरकात जातील.

**मंत्र क्र. १६ :-** सद्‌वर्तनींना वाईट म्हणणारे आणि त्यांचा अपमान करणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. २८ :-** खोटी साक्ष देणारे, आपले कर्तव्य न पार पाडणारे, धोका देऊन धन कमविणारे, चोरी करून उदरनिर्वाह कमविणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. २९ :-** मोठी झाडे तोडणारे, वन व वृक्षांना नष्ट करणारे, आपले वचन न पाळणारे, पवित्र स्थळांची यात्रा न करणारे आणि विधवांशी लैंगिक संबंध ठेवणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. ३३ :-** विहिरी व तलावांना नष्ट करणारे, धार्मिक स्थळांना नष्ट करणारे, लोकांची घरे पाडणारे निश्चितच नरकात जातील.

**मंत्र क्र. ४३ :-** तलवार व धनुष्य-बाण (शस्त्रे) बनवून अत्याचारींना विकणारे नरकात जातील.

**मंत्र क्र. ४४ :-** निराश्रितांना दिलासा न देणारा, सत्याचा द्वेष करणारा, निर्दोषांना शिक्षा देणारा निश्चितच नरकात जाईल.

**मंत्र क्र. ४७ :-** प्रत्येक व्यक्तीवर संशय घेणारा, त्यांच्यासाठी निर्दयी असणारा, प्रत्येकाला मार्गभ्रष्ट करणारा, निश्चितच नरकात जाईल.

**मंत्र क्र. ५० :-** मित्रांना मैत्री तोडणारा, आशा-आकांक्षा संपुष्टात आणणारा नरकात जाईल.

**मंत्र क्र. ५२ :-** घरे जाळणाऱ्यांना, गाव जाळणाऱ्यांना आणि जंगलांना आगी लावणाऱ्यांना यमदूत पकडून नरकाच्या आगीत भाजतात.

**मंत्र क्र. ५५ :-** असे पापी जेव्हा तहानेने व्याकूळ होऊन पाणी मागतात तेव्हा यमदूत त्यांना पिण्यासाठी उष्ण उकळते तेल देतो.

**मंत्र क्र. ५६ :-** असे पापी जेव्हा ते पितात तेव्हा त्यांच्यातील उकळत्या तेलामुळे खाली कोसळतात.

**मंत्र क्र. ५७ :-** ते कसेबसे पुन्हा उभे राहतात आणि पीडेने ओरडू लागतात. मग त्यांची अशी दुर्दशा होते की शरीरात त्राण उरत नाही की त्यांना श्वासदेखील घेता येत नाही आणि बोलूही शकत नाहीत.

गरुड पुराणात आणखीन खूप काही वर्णन करण्यात आले आहे, मात्र या लहानशा पुस्तकात ते सर्व लिहिणे शक्य नाही.

**नरकातून बाहेर पडणे शक्य आहे काय :-**

भगवद्‌गीतेतील श्लोक क्र. १५:४ नुसार नरकातून बाहेर पडणे अशक्य आहे.

● अथर्ववेदचा एक श्लोक असा आहे, ईश्वराचे नियम कोणीही बदलू शकत नाही. (अथर्ववेद १८-१-०५)

● ईश्वराने ज्या पापासाठी ज्या नरकाची शिक्षा निर्धारित केली आहे, तेव्हा त्या पापासाठी त्या नरकात त्याची शिक्षा अवश्य मिळेल.

● भगवद्‌गीतेतील श्लोक क्र. ३:११ नुसार, देवतादेखील एक ईश्वराची प्रार्थना करतात आणि ईश्वराचे आदेशच पाळतात, म्हणून त्यांना प्रसन्न करूनसुद्धा नरकापासून मुक्ती मिळणार नाही. कारण देवतादेखील ईश्वराच्या आदेशाविरूद्ध काहीही करणार नाहीत.

● गरुड पुराणातील श्लोक क्र. ३:४५ असा आहे :

यमदूत म्हणाला, ''जसे ईश्वर आम्हाला आदेश देतो तसे आम्ही पापीला शिक्षा देतो. पापांना क्षमा केवळ ईश्वर करतो (आम्ही नाही).'' (गरुड पुराण, अध्याय क्र. ३, मंत्र क्र. ४५)

● तेव्हा यमदूताला प्रसन्न करूनसुद्धा नरकापासून मुक्ती लाभणार नाही. म्हणून नरकापासून वाचण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे आम्ही असे कर्म करू नये ज्यामुळे ईश्वर आमच्यावर क्रोधित होऊन आम्हाला नरकात टाकावे.

● नेहमी सत्कर्म करीत राहण्याची ईश्वर आम्हा सर्वांना सद्‌बुद्धी देवो.

*******